RNI NO. MAHMUL 03498

ISSN 2456-9504

# RESEARCH AWAKENING

National Multi-Disciplinary Peer Reviewed & Refereed Journal
(Bi-Annual Journal)

Volume : 04

ISSUE: Oct. 2020
to
March. 2021

-: Published by :-
Principal: Dr. Smita R. Deshmukh
Shri Shivaji Arts & Commerce College,
Morshi Road, Amravati. (M.S.) India

**Our Inspiration**



Dr. Bhausaheb Panjabrao Deshmukh

© All rights are reserved with publisher.

Research papers for publication in Research – Awakening must confirm to the MLA/APA style sheet and should not exceed 3000 (Three thousand words, soft copy should be sent in text format along with a hard copy to the Chief Editor/ Executive Editor or through E-mail attachment to researchawakening@gmail.com. Every Contribution should be accompanied by declaration that it is an original work and has not been published before.

*Chief Editor*
**Dr. Smita R. Deshmukh**
Principal
Shri Shivaji Arts and Commerce College,
Amravati

*Executive Editor*
**Prof. Dr. B.S. Zare**
Professor
Department of Commerce & Managment
Shri Shivaji Arts and Commerce College,
Amravati

*Published by :*
**Dr. Smita R. Deshmukh, Principal,**
Shri Shivaji Arts and Commerce College,
Amravati

*Graphic Designing & Printing*
**Net Log Xerox & Printing**
Rathi Nagar, Amaravati
Mob.9595758142

Published at :
**Dnyanpath Publication,**
Above Jio Communication,
Shegaon Naka, Amravati
E-mail : infor@dnyapath.com, dnyapathpub@gmail.com
Mob. No. 8600353712, 950323780

**Rs. 300/-**

## Message from Editor in Chief

It gives me immense joy to welcome and congratulate all the researchers to "Research Awakening". Our college has always laid a premium on excellence in every field- academics, sports, extension and cultural activities and research. Our excellence is reflected in the A grade that we received in the third cycle of NAAC. Research is gaining importance in today's world and taking this into consideration, we have always promoted research culture. The aim of research in higher education is to create and disseminate knowledge to people through students and professors.

I personally feel, that research is the backbone of a college. In this platinum jubilee year, we have made this platform open for students, research scholars and guides to contribute to our journal "Research Awakening" and to open new vistas of knowledge. Our aim in launching "Research Awakening" was to support research in higher education and to enhance and enable the capability of the faculty members in the field of research. I extend my good wishes and warm greetings to the researchers.

**Dr. Smita Deshmukh**
(Principal)
Shri Shivaji Arts and Commerce College,
Amravati

# Research Awakening

Research Awakening, A Biannual Multi Disciplinary National Peer Reviewed and referred Journal, aims at providing sound platform for scholarly views and discussion on broad commerce and management, social, political, economical, cultural and literary issues of contemporary significance as found in art, literature, cinema and television with special emphasis on creative innovation and recreation.


*Chief Editor*

**Dr. Smita R. Deshmukh**

Principal,

Shri Shivaji Arts and Commerce College, Amravati

*Executive Editor*

**Prof. Dr. B.S. Zare**

Professor,

Department of Commerce & Management

Shri Shivaji Arts and Commerce College, Amravati

*Editorial Board*

| | |
|---|---|
| Principal Dr. S. R. Deshmukh | Chief Editor |
| Prof. Dr. B. S. Zare | Executive Editor |
| Prof. Dr. V. N.Chikhle | Member |
| Prof. Dr. A. D. Bobade | Member |
| Prof. Mahendra Mete | Member |
| Dr. Sujata Sabane | Member |
| Dr. Kishor Sable | Member |

**Peer Review Committee**

Dr. M. V. Jagtap (Commerce)
Dr. G. Bharti (Economics)
Prof. Dr. Vandana Deshmukh (Geography)
Dr. U.V. Kadu (English)
Dr. Vaishali Takode (English)
Dr. Suvarna Gadge (Marathi)
Dr. S.S. Bhuyar (Political Science)
Dr. S.P. Gawande (Physical Education & Sports)
Dr. J.V. Gaikwad (Economics)
Dr. N.V. Changole (History)
Dr. D.S. Namurte (Sociology)
Dr. V.R. Deshmukh (English)
Dr. A.T. Sarode (English)
Dr. Manoj Joshi (Hindi)
Dr. Kumar Bobade(Journalism)

# ‘केशव मेश्राम यांच्या ललितगद्य लेखनातील स्त्री जीवन ’

**संशोधक विद्यार्थी : एन.डी.राऊत मार्गदर्शक : प्रा.डॉ.वर्षा चिखले**
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

**प्रस्तावना:-**

साहित्य प्रकारांच्या नव्याने केलेल्या मांडणित ललित वाङ्मयाच्या मुशीतून लेखकाच्या अनुभवाविष्कारावर आधारित निबंध, लघुनिबंध, गुजगोष्टी, ललित निबंध, ललित लेख या वेगवेगळ्या नावांतून आणि वाङ्मयीन रुपांतून वाटचाल करीत रूपाबरोबर आशयाचे बदलते स्वरूप स्वीकारून ते आपल्या अंगी बाणवत हा वाङ्मय प्रकार आता ललितगद्य या नावाने मराठी साहित्यात स्थिर झाला आहे. मुळात ललितगद्य हा लालित्याचा गाभा असलेला अभिव्यक्तीचा लेखनप्रकार असूनही या साहित्य प्रकाराकडे अभ्यासकांचे पहिजे तसे लक्ष नाही. त्या अनुषंगाने ललित गद्य या लेखन प्रकाराचा एका वेगळ्या अंगाने परिचय व्हावा म्हणून सदर विषयाची निवड केली आहे. महाराष्ट्रातील साहित्यिकांच्या तुलनेत विदर्भातील साहित्यिक प्रसिध्दी, प्रचार, प्रसार, प्रकाशन सुविधा आणि समीक्षा या दृष्टीने कमालीचा उपेक्षित आहे. म्हणूनच आपल्या मातीशी नाळ जोडलेले; दारिद्रय, जातीयता, नोकरीतील खस्ता इत्यादींचे चटके खात घडलेले ललितगद्यकार केशव मेश्राम यांच्या कलाकृतीचा अभ्यास केला आहे.

कोरोना महामारीमुळे वारंवार होणाऱ्या टाळेबंदीच्या काळात घरूनच काम करण्याची पद्धत आल्याने, नवरा अधिक काळ घरी असल्यामुळे साहजिकच बायकोला त्याचा त्रास व कटकट वाटत आहे. परिणामी परस्परांतील वादविवाद पराकोटीला जाऊन घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे.

त्या अनुषंगाने काळाची गरज म्हणून स्त्री-पुरूष या दोघांच्याही सहनशील वृत्तीत वाढ व्हावी. एकमेकांना समजून घेण्याची वृत्ती वृद्धींगत व्हावी म्हणून केशव मेश्राम यांच्या ललितगद्य लेखनातील स्त्री जीवन समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्टे**: -

1. महाराष्ट्रातील इतर ललितगद्यकारांच्या तुलनेत उपेक्षित असलेल्या विदर्भातील ललितगद्यकाराच्या कलाकृतीचा आशय समजून घेणे.
2. लालित्याचा गाभा असलेल्या अभिव्यक्तीच्या लेखनप्रकाराकडे अभ्यासकांचे लक्ष वेधणे.
3. आपल्याच परिसरातील लेखकाचे वास्तव जीवन जाणणे.
4. केशव मेश्राम यांच्या ललितगद्यातील समजूतदार, सुसंस्कारी, धैर्यवान, स्त्रियांचे जीवन समजून घेणे.
5. पुरुषप्रधान संस्कृतीच्या बळी पडलेल्या स्त्रियांचे वास्तव जीवन अभ्यासणे,
6. विभक्त कुटुंबातील नैराश्याने ग्रासलेल्या स्त्रियांना जगण्याची नवी उमेद देणा-या स्त्रियांचे जीवन समजून घेणे.

**विषय प्रतिपादन:**

‘केशव मेश्राम यांच्या ललितगद्य लेखनातील स्त्री जीवन’ या विषयाचा अभ्यास करण्यास्तव ‘छायाबन’, ‘गाळ आणि आभाळ’ व ‘रुतलेली माणसे’ या तीन ललितगद्य संग्रहांचा अभ्यास केला आहे. या अगोदर भी.गु.रामटेके यांनी ‘केशव मेश्राम यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास’ ह्या विषयावर संशोधन केले.

प्रस्तुतच्या या संशोधनपर लेखामध्ये केशव मेश्राम यांच्या ललितगद्य लेखनातील स्त्री जीवन याविषयी संशोधन करून मतप्रतिपादन केले आहे. केशव मेश्राम यांचे बालपण विदर्भातील अकोला आणि बडनेरा या परिसरात गेले. तिथल्या वातावरणाचा - सामाजिक वास्तवाचा वेध त्यांनी आपल्या ललित लेखनातून वस्तुनिष्ठपणे

घेतला. कौटुंबिक जीवनात त्यांना संस्काराचे बाळकडू पाजून सुसंस्कारी करणाऱ्या, प्रसंगी धीर देणाऱ्या, जगण्याची उमेद देणाऱ्या, नीतीमत्ता शिकवणाऱ्या नातेवाईक स्त्रियांचे वास्तव चित्रण करणाऱ्या मेश्रामांनी आपल्या आजूबाजूच्या माणसांचे विराट विश्व तटस्थपणे रेखाटले आहे. केशव मेश्राम यांच्या ललितगद्य लेखनातील स्त्रियांची आपल्या व परकीयांकडून होणारी पिळवणूक, अन्याय, अत्याचार, सासुरवास, कौटुंबिक हिंसाचार, पुरुषप्रधान संस्कृतीने तोडलेले त्यांचे लचके, व्यसनाधीन नातेवाईकांकडून होणारे शोषण इत्यादींचे वास्तवचित्रण मन विदीर्ण करणारे आहे. पराकोटीच्या विपरित परिस्थितीतही 'स्व' अस्तित्वासाठी झगडणाऱ्या तळागाळातील स्त्रिया ह्या आजच्या सुखवस्तू जीवनात कमालीच्या आदर्श वाटतात.

केशव मेश्राम यांनी 'साधना' साप्ताहिकातून ललितगद्य लेखनास प्रारंभ केला. सुरुवातीला त्यांच्या लेखनातून सौंदर्यवादीवृत्ती आणि निसर्गप्रेम व्यक्त झाले. १९७३ साली प्रकाशित झालेल्या 'छायाबन' या ललितगद्य संग्रहातून कलात्मक जाणिवेसोबतच अवतीभवतीच्या स्त्रीजीवनाचे वास्तव चित्रण आले आहे. 'हुंकार' या लेखात एका कुमारवयीन मुलीचे तरल भावविश्व रेखाटताना, तिच्यात होणारे अंतर्बाह्य स्थित्यंतरे, रंगलेल्या स्वप्नावस्थेतून वेळीच जाग आल्याने वास्तवतेचे भान अंत:करण भेदून जाते. 'लग्नाच्या काळजीने खंगून भगभगणारे जन्मदाते आणि त्यांच्याच बाजूला कांबळ्यावर ओळीने पसरलेल्या वयात आलेल्या, येऊ घातलेल्या पाच- सात बहिणी तिला दिसतात! स्वप्नातले स्वप्न तापल्या वाळूवर तळमळत राहते'.१. वास्तवाची जाण आल्याने मिटलेल्या डोळ्यातून दरवळत जाण्याची खोड जडलेली ही परी डोळे उघडे ठेवून घरातून निघून जाते.

भुकेल्या पोटी गाढ झोप येत नाही. अशा अठराविश्व दारिद्रयात कसे-बसे जीवन कंठणाऱ्या बेघर स्त्रिया, व्यसनाधीन, अनैतिकवृत्तीच्या, व्याधीव्याप्त देहाच्या वासनेला

राजरोस बळी पडतात. येथे पोटाची भूक स्त्रीयांना किती खालच्या पातळीवर नेते याचे विदारक सत्य 'हुंकार' मधून जाणवते. याच लेखातून श्रीमंत स्त्रीचा स्वतःच्या नवऱ्यासोबतचा फसवा प्रणय लेखकाने शब्दबद्ध केला आहे. नवरा घराबाहेर गेल्यानंतर मागच्या दाराने राकट परपुरुषाला घरात घेऊन त्यांच्याशी मनसोक्त रत होते. स्त्रीचं हे सुखवस्तू कुटुंबातील व्याभिचारी रूप नीतीला व नात्याला काळीमा फासणार आहे.

'आवेगिनी' या लेखात मेश्रामांनी आपल्या जीवनात आलेली देशपांड्यांची वीणा, जी त्यांच्यावर जीवापाड प्रेम करते, त्यांच्या भावनांची कदर करते. तिच्या भोवती गुरफटणाऱ्या स्वतःच्या भावनांचे चित्रण लेखकाने केले आहे. याचक्षणी स्वतःच्या पत्नीचे लाहावी वर्तन, काहीसे वीणासारखेच; तिचेही नवऱ्याशी जुळनारे भावविश्व लेखकाने रेखाटले आहे.

'क्षणगंधा' या लेखात मेश्रामांनी सुधाचे व्यक्तिचित्रण दोन पातळ्यांवर केले आहे. सुधाची आई वेडसर असते. सुधा ही मुलगी असूनही मुलाच्याच अविर्भावात वाढलेली असते. पण अचानक बापाचे वर्तन बदलते. त्यामुळे घरी वैभव असूनही जगण्यातला रस संपतो. 'पण हा बदल तिच्या मनाला पेलवत नाही. रस शोषलेल्या आंब्यासारखी ती खंगत जाते. पीकून गळणाऱ्या पपईसारखी क्षीण आणि खोटे खोटे हसते' २ मोगऱ्याच्या फुलात व सुखसंपन्न श्रीमंतीत ती रमत नाही. उलट दिवसेंदिवस निरस होत जाते. बापाच्या दुसऱ्या संसारामुळे भावकोमल कळी न उमलता सुकून जाते. आई-वडिलांच्या संसारात आलेल्या वितुष्टांचा मुलीच्या जीवनावर झालेला आघात लेखकाने वास्तवपणे चित्रण केला आहे.

'छायाबन' या लेखातून सासुरवाशीण मोहणा गावोगावच्या पिढ्यान-पिढ्या सासुरवासाच्या बळी पडलेल्या स्त्रियांची प्रतिनिधी वाटते. चारभावांच्या या लाडाकौतूकात वाढलेल्या एकुलत्या एका बहिणीचा सासरी जनावरासारखा छळ होतो. वैऱ्याशी वागावे तसे

सासू- सासरा, दीर- जावा, नंणदा- नवरा तिच्याशी अमानुषपणे वागतात. अशा बिकट परिस्थितीतही बापाचे नाव, त्याच्या कुळाचे नाव, समाजात याची इभ्रत राहावी म्हणून ती अनन्वीत छळ सोसूनही जगत असते. पण एके दिवशी दारूड्या नवऱ्याने तिला मरेपर्यंत मारले व डोहात टाकून देऊन आत्महत्या केल्याचा कागावा केला. सासुरवाशीणीचे दुःख मेश्रामांनी असे वेशीला टांगून कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रश्नाला वाचा फोडली.

'गाळ आणि आभाळ' या ललितलेख संग्रहातून लेखकाची बहीण 'तारा' आई 'नानी' यांच्या आठवणी अंतःकरणातून शब्दरूप घेतात. 'नवऱ्याच्या जाचामुळे स्वतःला पेटवून घेणाऱ्या बहिणीच्या ताराच्या आठवणीने लेखक बेचैन होतात. प्रवासात पाच-सात वर्षांची गुलाबी फ्रॉक घातलेली एखादी काळीसावळी मुलगी दिसताच लेखकाच्या मनातील भावना करपून जातात'. ३ बहीण आणि आईचा मृत्यु लेखकाला विव्हळ करतो.

'मानमोडी' या लेखात अशाच एका निष्पाप मुलीच्या आयुष्यात आलेला भोगवटा लेखकाने चित्रित केला आहे. वडिलांच्या मृत्यूनंतर उपवर मुलगी उजवायची कशी? या विवंचनेत दुसऱ्या पुरुषाशी आई घरोबा करते. जनाचा हा सावत्र बाप अट्टल दारुड्या असतो. तो दारू गाळून विकतो. जनाचा सावत्र भाऊ गुंडप्रवृत्तीचा असतो. सगळे सुरळीत चालले असताना आई लोकलच्या अपघातात मेल्याने जनाच्या जीवनाचे मातेरे होते. तिचे फुलणारे तारुण्य व्यसनाधीन बाप व गुंडगिरी करणारा भाऊ यांच्या दबावात करपून जाते. सावत्र बाप व भावाच्या संसारासाठी ओढगस्तीने जगताना ती कमालीची एकाकी होते. तिच्या जगण्यातली उमेद नाहीशी होते. चार घरी धुणी-भांडी करणारी जना नैराश्याने ग्रासते. अशातच भावाचा खून होतो; ती एकाकी पडते. नशेने झिंगलेला सावत्र बापच एका रात्री तिच्यावर श्वापदासारखा तुटून पडतो; तिचा उपभोग घेतो. यामुळे ती मनाने व शरीराने खंगत जाते. जीवनाची

कुतरओढ झाल्याने मती व गती हरवलेली जना ट्रक खाली चिरडली जाते. ती संपते पण असंख्य प्रश्न जन्माला घालूनच!

'कालुआ' या लेखातून काळ्यासावळ्या तरतरीत वडारणीचे दुःख लेखकाने तपशीलवारपणे रेखाटले आहे. दारुड्या बेलदार नवऱ्याच्या संसाराला हातभार लागावा म्हणून ती माती - गोठ्याच्या बांधकामावर जाते. तिचा नवरा व्याभिचारी असूनही ती न कुरकुरता संसार नेटाने रेटते. तिची संशयी व दारुडी नणंद मात्र तिच्या जाचाला कारणीभूत असते. स्त्रीच कशी स्त्रीची खरी शत्रू असते याचे प्रत्ययकारी दर्शन येथे घडते. तिची नणंद तिच्या विषयी आपल्या बहिऱ्या व दारुड्या आईजवळ चुगल्या लावायची. मग सासू कालुआच्या सात पिढ्यांचा उद्धार करायची. आपला तीळमात्र दोष नसताना नवऱ्याचा बेदम मार खाणे, नेहमीची भांडणे, सगळ्यांचे आवरून संसारासाठी राबराब राबणे, बाजार हाट बघणे, सगाई- लग्न, पाठ- तोडवणूक, मयत –तेरवी, देवधरम, जत्रा, उपास-तापास, आले-गेले यांचे भागवणे; यामुळे कालुआ धुमसत असायची. कालुआच्या रूपाने पुरुषप्रधान संस्कृतीच्या बळी पडलेल्या कष्टकरी महिलांच्या दाहक विश्वाची वास्तवता प्रकट होते.

'आठवणी झाडा पाखरांच्या' या लेखातून अंधश्रद्धेच्या विळख्यात गुरफटलेल्या सासुरवासाने मेताकुटीस आलेल्या, नवऱ्याच्या रोजच्या छळाला कंटाळलेल्या स्त्रिया देव अंगात आल्याचे सोंग घेऊन छळ करणारा नवरा, सासू- सासरा, दीर- नणंद, यांना झोडपून बदला घेणाऱ्या स्त्रियांचे वर्णन खुमासदार शैलीने लेखकाने केले आहे. 'दहापाच बाया हातात- हात गुंफून कंबर हलवित, तालावर घुमू लागायच्या. शीळ घुमल्यासारखे ध्वनी त्यांच्या तोंडून बाहेर पडायचे. अशक्त हातावरच्या निळसर नसा, त्यांचे तळाशी खोल पाणी साचल्यासारखे दिसणारे, नजर नसलेले डोळे... कधी कधी झाड चिडायचे, केस पिंजरारायचे, गरगरा हात फिरवायचे, सासरा, दीर, नवरा

यांचे भेदभाव न करता, लाथाबुक्क्यांनी तुडवायचे, थोबाडून काढायचे'.४

'देह साडेतीन हातांचा' या लेखात मेश्रामांनी मुमताज रहिमतपुरे या लेखिकेचे भावविश्व, लेखनसंपदा, वाङ:मयीन कर्तुत्व आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन चितारताना मानवी जीवनाची क्षणभंगुरता मोठ्या ताकदीने साकारली आहे. मुमताज रहीमतपुरे विषयी 'अंधाराचा; भीतीचा, एकटेपणाचा लवलेशही त्यांच्या चेहऱ्यावर नव्हता. देहात बेपर्वाई नव्हती. पण काळजीही नव्हती पूर्ण आत्मविश्वासी स्वयंपूर्ण स्त्रीचा उमदेपणा, मुमताज बाईत त्यावेळी मला जाणवला' ५ अशा शब्दात लेखक मत व्यक्त करतात.

'रुतलेली माणसे' या ललितलेख संग्रहात मेश्रामांचे 'गणगोत' आपल्याला भेटते, भावते. संपन्नतेत संसार फुलवणारी आजी काही कारणास्तव बदललेल्या बिकट परिस्थितीतही वडाच्या झाडासारखी धीर गंभीर उभी राहात संसाराचा गाडा रेटत असते; नातवाला नीतीने वागण्याचे धडे देणारी आजी कायम स्मरणात राहते. लेखकाला नोकरीच्या निमित्ताने घर सोडावे लागते त्यावेळी आजी नातवाला जीवनाचे तत्त्वज्ञान सांगते. "जातोस बेटा, जायबापा, पाणलोटाले कसा थांबवाव गा? काऊन अटकवावा? कोठेही राहा, पण उडून खा, बुडू नोका माह्या पिलाच्या पिलानु: हिमतीन राहा. माही उमर घेऊन जा!" ६ या आजीच्या उपदेशाने लेखक भारावून जातो.

लेखक अगदी लहान असताना घरची श्रीमंती लयास जाते. श्रीमंतीत वाढलेल्या स्त्रियांना पुरुषांपेक्षाही हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. मिलमध्ये चाकरी करून संसाराचा गाडा रेटने क्रमप्राप्त होते: 'बिताई' या लेखात मेश्रामांनी मोठ्या काकूचे व्यक्तिचित्रण केले आहे. ती आरोग्याविषयी नेहमी कुरबुरी करते, सतत आजारी असते तिने लेखकाला मायेने वाढवले; त्याच्यावर संस्कार केले. बिताई नेहमी कामात व्यस्त असते. पै-पाहुण्यांचा पाहुणचार, शेतवाडी,

बैलबागांचे काम पाहते. पंचवीसतीस माणसांच्या घरात सगळ्यांचे कार्य करताना तेव्हाचा सासुरवासही सोसते. संयुक्त कुटुंबाचा गाडा बिनतक्रारपणे ओढणारी बिताई सोशिकतेचे मूर्तीमंत उदाहरण तर आहेच शिवाय आपण कुटुंबाचे देणे लागतो ही बाब तिच्या रूपाने उजागर होते.

'नानी' या लेखातून मेश्रामांनी स्वतःच्या आईचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. गंडमाळेच्या रोगाने त्रस्त असूनही चेहरा हसरा व प्रसन्न ठेवणारी आई परिस्थितीवर मात करून सकारात्मकतेने जगायला शिकवते. सतत कामात व्यस्त असूनही उत्साह कायम टिकवणे हा तिचा स्थायीभाव असतो. घरचे सगळे काम करून, दूरचे पाणी भरून मिलात कामाला जाणारी नानी कमालीची सोशीक वाटते. ती स्वभावाने हळवी व मानी आहे. अकाली सोडून गेलेल्या भावंडांची चिंता तिला त्रस्त करते. वारंवार होणाऱ्या गर्भपाताने ती खंगून गेली आहे. आपल्या नवऱ्याने नाकासमोर पाहून जगावे, व्यसनाधीन असू नये, बचत करावी, राजकारणात पडू नये अशी तिची रास्त अपेक्षा असते. तिला वाईट-ओंगळ बोलणे आवडत नाही. कोणाची निंदानालस्ती करणे तर दूरच पण ती अशा गोष्टी ऐकत सुद्धा नाही. शिकलेल्या पोराविषयीची तिची व्यथा सुशिक्षितांना अंतर्मुख करते.

केशव मेश्राम यांना एकट्या, एकाकी पडलेल्या स्त्रीचे दुःख मांडण्याची ओढ आहे. या स्त्रियांबद्दल त्यांना खूप सहानुभूती वाटते. आपल्यापरीने या एकाकी स्त्रियांना ते दिलासा देऊ पाहतात. या एकाकी स्त्रियांबद्दल त्यांचे मन करूणामय होते.

**निष्कर्ष :-**

1. केशव मेश्राम यांनी आजूबाजूचे स्त्री विश्व वस्तुनिष्ठपणे रेखाटले आहे.
2. विपरित परिस्थितीत जीवन व्यथित करताना सुद्धा या स्त्रिया 'स्वत्व' जपतात.
3. वास्तवाचे भान ठेऊन वेळीच सावध होणाऱ्या स्त्रिया आदर्श वाटतात.

4. पोटाची दाहक भूक कधी कधी स्त्रियांना हतबल करते.
5. मेश्रामांच्या ललितगद्यातील स्त्री धैर्याने एकटेपणावर मात करते; ती सकारात्मकता जपते.
6. केशव मेश्रामांच्या ललितगद्यातील स्त्री अन्यायाचा प्रतिकार करणारी व भविष्याचा वेध घेणारी आहे.

## संदर्भ सूची-

१) केशव मेश्राम 'छायाबन' – कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे-३०. प्र.आ.ऑक्टो १९७३ पृ.क्र.१३.

२) तत्रैव पृ.क्र..४३-४४

३) गीता मांजरेकर (संपादक) 'अक्षरांचे आभाळ', प्र.आ.१५ ऑगस्ट २००९ डिंपल पब्लीकेशन, ठाणे, पृ.क्र..१६१

४) केशव मेश्राम –'गाळ आणि आभाळ', प्र.आ.जुलै १९८७, सुरेश एजन्सी पुणे, पृ.क्र..९०-९१

५) तत्रैव – पृ.क्र. ११५

६) केशव मेश्राम – 'रुतलेली माणसे' प्र.आ.जाने २००५ डिंपल पब्लीकेशन, ठाणे, पृ.क्र. १७.

# वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार- एक चिंतन

**संशोधक विद्यार्थी : श्री शैलेश सुरेंद्र सोनोने**

**मार्गदर्शक : प्रा.डॉ.वर्षा चिखले**

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

## प्रस्तावना-

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे.आधुनिक भारताच्या जडणघडणीत अनेक संत समाज सुधारकांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. समाजाला लागलेली अनिष्ट प्रथा परंपरा अशिक्षितपणा जातीयता यासारखी कीड नष्ट करण्याचे कार्य संतांनी वेळोवेळी केले. वैदर्भीय भूमीत वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वैराग्यमूर्ती श्री संत गाडगेबाबा, डॉ. पंजाबराव देशमुख या तीन महान विभूती जन्मास आल्या. या महापुरुषांनी महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारत भूमीत समाजप्रबोधनाचे हे

शस्त्र आपल्या वाणीतून आणि लेखणीतून जनसामान्यांच्या गळी उतरवले. प्रत्येक प्राणीमात्रांविषयी भूतदया, मानवता आणि लोककल्याणाचा दृष्टिकोन या संतांकडे होता. शतकानुशतके ओलांडली तरी या महापुरुषांच्या कार्याचा प्रभाव कधीही कमी होणार नाही.

बुडती हे जन। न देखवे डोळा
म्हणुनी कळवळा। येत असे ॥[1]

या उक्तीप्रमाणे आपले सर्वस्व समाजासाठी खर्ची घालणाऱ्या अनेक संतांनी आपले योगदान दिले. त्यातीलच एक थोर संत म्हणजे वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज होय.30 एप्रिल 1909 रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली या छोट्याशा गावात झोपडीवजा घरात त्यांचा जन्म झाला. मानवता हाच खरा धर्म असल्याचे त्यांनी जगाला पटवून दिले. तसेच त्यांनी आपल्या विचारांनी अनेकांना प्रेरित करून मानवतेची कास धरण्याची सदैव शिकवण दिली. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ महाराज, संत गाडगे महाराज, गुलाबराव महाराज या सर्व संतांच्या साहित्याचा, त्यांच्या विचारांचा आणि त्यांच्या कार्याचा विचार केल्यास एकसमान तत्त्व त्यांच्या चरित्रात दिसते. अशा या महान संतांची परंपरा विसाव्या शतकात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी पुढे नेली. भजन-कीर्तन, राष्ट्रविकास व्याख्यानाद्वारे लोकशिक्षण, ग्रामोध्दार, मानवतावादी संकल्पना या मौलिक विचारांवर लक्ष केंद्रित करून आपले जीवन समर्पित केले. संतांच्या कार्याचा समाजव्यवस्थेला कसा फायदा झाला ? समाजासाठी संतांनी थोर समाज समाजसुधारकांनी आपले जीवन कसे खर्ची घातले ? या त्यांच्या कार्याची ओळख व्हावी यासाठी केलेला हा अल्पसा प्रयत्न.

**उद्दिष्टे-**

1. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचे श्रेष्ठत्व पटवून देणे.
2. राष्ट्रसंतांच्या शिक्षणविषयक दृष्टिकोनाचे विश्लेषण करणे.
3. सामाजिक वास्तवाचे चित्रण करणे.
4. स्त्री-पुरुष समानतेचे महत्त्व विशद करणे.

5. वंदनीय राष्ट्रसंत यांच्या साहित्यामधून संस्काराची रुजवणूक करणे.

**संशोधन पद्धती -** वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक

**विषय विवेचन -**

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणजे विसाव्या शतकातील एक क्रांतिकारी झंझावात. राष्ट्रसंतांच्या कार्याचा त्यांच्या चिंतनाचा विषयच मुळात सामाजिक परिवर्तनाचा असल्यामुळे इतर अवलिया संतांप्रमाणे साधूचा वेश परिधान करून ते बसले नाहीत. त्यांच्या समाजपरिवर्तनाच्या विचारामुळे अंधश्रद्धा, रूढी-परंपरा, जातीयता, अज्ञान, हिंसाचार, पशुहत्या, कुसंस्कार याविरुद्ध लढणारे ते संत होते. आज आधुनिक काळात विज्ञानाने लक्षदीपक प्रगती केली आहे त्यामुळे अनेक सुविधा निर्माण होऊन जीवन अधिक समृद्ध झाले. जगात विज्ञानाने प्रगती केली आहे. मनुष्य भौतिक सुखाच्या मागे लागला आहे पण आपल्याच देशातील ग्रामीण भागात मात्र अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या जीवनावश्यक गरजा सुद्धा भागविणे कठीण होत आहे. शहरातील विकास व त्यामानाने खेड्यातील विकासामध्ये प्रचंड तफावत दिसून येत आहे. त्यामागील कारणे शोधण्याचा प्रयत्न अनेक महापुरुषांनी केला आहे. सामाजिक जागृती व प्रगतीचे पंख धारण करून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाजाच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी घेतलेली वैचारिक गरूड भरारीच म्हणावी लागेल.

गावा गावासी जागवा ।
भेदभाव समुळ मिटवा ।।
उजळा ग्रामोन्नतीचा
दिवा। तुकड्या म्हणे ।। [5]

भारत हा खेड्यापाड्यानी बनलेला देश आहे. गावाची उन्नती झाली तरच देशाची प्रगती शक्य आहे. गाव हा विश्वाचा नकाशा आहे. गावावरून देशाची परीक्षा होऊ शकते. गावच जर भंग पावले तर देशाला अवदशा प्राप्त होईल असे राष्ट्रसंतांचे मत होते. गावसेवा हीच ईश्वर सेवा आहे. हीच ईश्वरसेवा सर्व गावकऱ्यांचा सुखाचा ठेवा आहे परंतु गावात कोणतेही चांगले कार्य सुरू असताना तर त्यात

मोडा काढणारे पण संख्येने बरेच सापडतील पण त्याकडे लक्ष न देता आपल्या ध्येयापासून विचलित न होण्याचे ते सुचवतात. गावाचे आरोग्य स्वच्छता नीटनेटकेपणा याबद्दल विचार करताना त्यांनी अनेक उदाहरणे, दाखले दिल्याचे आढळते. गावातील रोगराईचे माहेरघर म्हणजे गावातल्या नाल्या, गटारे यामुळे गावात रोगराई होते म्हणूनच गावात स्वच्छता कशी राहील याकडे लक्ष द्यावे. संघटना काय करू शकते? संघटनेमध्ये किती शक्ती आहे? ह्यासाठी गवताच्या एका काडीपासून बनवलेला दोर हत्तीला आवर लावू शकतो. अनेक मुंग्या एकत्र आल्या तर हत्तीला जर्जर करून सोडतात म्हणून आज लोकतंत्राच्या काळातही लोकांनी मनावर घेतले तर सरकारला जनतेच्या मताप्रमाणे वागण्यास भाग पडू शकते. एवढी मार्मिक उदाहरणे त्यांनी दिलेली आहे. राष्ट्रसंतांच्या मते, संतांचा दृष्टिकोन हा आशावादी असतो. सृष्टीचा बागवान हा केव्हाही झोपत नसतो खूप उन्हाळा तापू लागला म्हणजे सर्वजण अशा चिंतेत असतात की आता पुढे काय होणार? पण दूरदृष्टीचा माणूस म्हणतो, "वेड्यांनो ! प्रखर उन्हाळा हा उद्याच्या भरपूर पावसाळ्याचा दूत आहे. आज चांगली तापलेली जमीन उद्या फळाफुलांनी सजणार आहे घाबरू नका हा घनदाट अंधार मंग अरुणोदयाची सुंदर जाहिरात आहे." [8]

जीवन जगण्यासाठी साधी राहणी उच्च विचारांचा अवलंब करण्याचे तंत्रही त्यांनी शिकवले. माणसाजवळ कोणती तरी एखादी कला असावी. कला ही माणसाची किंमत आहे त्यामुळे तो मानव म्हणून शोभून दिसेल असे त्यांचे मत आहे. गाव कसं स्वच्छ राहील? या त्यांच्या कल्पनेचा परिपाक म्हणजे गावागावात निघणारी रामधून. ज्या माध्यमातून संपूर्ण गाव सामुदायिक भावनेतून स्वच्छ सुंदर करून सडा, रांगोळी घालून सजवण्याची ही सुंदर कल्पना त्यांचीच आहे. वंदनीय राष्ट्रसंत यांनी भजन, कीर्तन, भाषण, कविता या माध्यमातून समाज जागृतीचे, राष्ट्रनिर्मितीचे

महान कार्य केले. देशाचा विकास करायचा असेल तर ग्राम उद्योग इ. स्वयंपूर्ण होणे गरजेचे आहे. असे आग्रही मत राष्ट्रसंतांचे होते. शिक्षणाचे कार्य ग्रामोन्नती असल्यास त्यातून राष्ट्रउन्नती घडू शकेल असा राष्ट्रसंतांना विश्वास वाटतो. ग्रामविकासाच्या कार्यात सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. राष्ट्रव्रती सहकाराच्या तत्त्वावर आधारित असावी. व्यक्तिनिष्ठ शिक्षण प्रणालीत अमुलाग्र बदल करण्यासाठी तिला समाजाभिमुख करावे यासाठी प्रत्येक व्यक्तीमध्ये सहकार्याची भावना जागृत करणे गरजेचे आहे. ग्रामशिक्षण पद्धती सहकार्याच्या भावनेतून कार्यरत असावी. अंधश्रद्धा निर्मूलन व जातीभेदाच्या निर्मूलनासाठी त्यांनी भजनांचा आणि कीर्तनाचा प्रभावीपणे वापर केला. आत्मसंयमनाचे विचार त्यांनी 'ग्रामगीता' या ग्रंथातून मांडले. विदर्भात विशेष संचार असला तरी महाराष्ट्र नव्हे तर देशभर हिंडून ते आध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन करीत होते. एवढेच नव्हे तर जपानसारख्या देशात जाऊन त्यांनी सर्वांना विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. भारत हा खेड्यांचा देश आहे हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला तरच राष्ट्राचा विकास होईल अशी तुकडोजी महाराजांची श्रद्धा व विचारसरणी होती. समाजाच्या सर्व घटकांतील लोकांचा उद्धार कसा होईल? याविषयी त्यांनी अहर्निश चिंता केली. सर्वधर्मसमभाव हेही राष्ट्रसंतांच्या विचारविश्वाचे एक वैशिष्ट्य होते. त्यासाठी त्यांनी सामुदायिक सर्वधर्मीय प्रार्थनेचा आग्रहपूर्वक पुरस्कार केला. अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाची स्थापना करून शिस्तबद्ध सामाजिक कार्याची जणू फळीच त्यांनी निर्माण केली.

आज जगात आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू आहे कारण आधुनिकीकरण केल्याशिवाय राष्ट्राला वैज्ञानिक व आर्थिक प्रगती साधता येणार नाही. राष्ट्र सशक्त आणि बलवान होण्यासाठी प्राचीन काळापासून शिक्षणावर भर देण्यात आला आहे.शिक्षणाच्या अनेक व्याख्या शिक्षणतज्ज्ञ करतात.शिक्षणात ज्ञानाची शक्ती असते. 'तमसो मा

ज्योतिर्गमय' या उक्तीप्रमाणे अंधारातून प्रकाशाकडे नेणे ही सोपी व सहज व्याख्या केली तर शिक्षणाचे महत्त्व लक्षात येईल. शिक्षणाची व्याख्या आजच्या प्रचलित जीवनात पार बदलून गेली असल्याचे दिसते. जीवन आणि शिक्षण तसे परस्परपूरक परंतु वास्तवात याची फारकत झाल्याचे दिसून येते. जीवनात शिक्षणाबद्दलचा विचार फारसा गांभीर्याने केला जात नाही.पैसा आहे तरच शिक्षण आहे असा वास्तव सुर निघतो परंतु हे शिक्षण पैसाही मिळवून देते याचा विचार केला जात नाही कारण शिक्षणाचा उपयोग दैनंदिन जीवनात केलाच जात नाही.जो शिकला तो व्यवहार करत नाही आणि ज्याला व्यवहार करता येतो तो प्रभावी व्यवहार चातुर्या साठी शिक्षण घेत नाही ..

अशिक्षित स्वयंपाक करूनी
खाई। सुशिक्षित चणे फाकीत
राही ।।
दोरास घालता न ये वंधाही। जेथे
तेथे पराधीन ।।

शिक्षित ज्ञानी पिढी पण पुस्तकाबाहेर काहीच ज्ञान नसल्याने आमच्याकडे व्यवहारशून्य आणि परावलंबी बनत आहे. शिक्षणाचा उद्देश जणू बदलून गेला आहे. शिक्षण आणि मानवी जीवनात प्रचंड विसंगती निर्माण झाली आहे.ती नष्ट व्हावी असे वाटत असेल तर राष्ट्रसंतांच्या शैक्षणिक विचारांची सध्या देशाला गरज आहे. राष्ट्रसंत आपल्या ग्रामगीतेतून मानवाच्या शिक्षणाची सुरुवात मातेच्या गर्भावस्थेपासून होते असे स्पष्ट सांगतात. मातेच्या गर्भात जे संस्कार बालकावर होतात आणि जीवाने ते आत्मसात केलेले असतात तेच पुढील काळाची शिदोरी बनतात म्हणून या बाबींची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. आपला दैवकरता, जीव स्वतःच आहे. कर्म करण्याचे स्वातंत्र्य,सत्ता,ईश्वराने जीवाच्या हाती सोपवली आहे.उपासनेने मनाची शक्ती वाढते व दुःखातही समाधान लाभते.ती ईश्वरीकृपा माणसाच्या हाती कर्तव्य पार पाडण्याकरता मिळाली आहे म्हणूनच आपण स्वतःच आपल्या भाग्याचे उदयकर्ते आहोत. दैव ही कल्पना आपणच मानवाने

निर्माण केली म्हणूनच हे प्रकार घडतात. ते दैवाने घडले आहे हे म्हणणे खोटे आहे म्हणून उद्धार होण्याकरता मनुष्याने प्रयत्नशील राहून जीवनाचं सोनं करण्यासाठी सद्‌गुण प्राप्तीचा अभ्यास करावा आणि याच करता संतांचे साहित्य निर्माण झालेले आहे असे राष्ट्रसंतांना वाटते. गर्भावस्थेपासून बाल्यावस्थेपर्यंत दिले गेलेले शिक्षण व झालेले संस्कार बालमन लवकर आत्मसात करतात व ते संस्कार त्यास जीवनभर कामात येतात. या बालकांना जर देशाचे आधारस्तंभ बनवायचे असेल तर माता- पित्या बरोबर गुरुंचा ही आदर्श शिक्षणामध्ये वाटा हवा. मुलांमध्ये अनेक सुप्त गुण असतात त्यांना वृद्धिंगत करण्यासाठी त्यांच्यात स्पर्धा निर्माण होणे आवश्यक आहे. शिक्षणाने मानवाचा आत्मविश्वास तर वाढतोच त्याचबरोबर माणूस सुसंस्कृत होतो. शिक्षणाचा उपयोग त्या विद्यार्थ्यांने नित्याच्या जीवनात केला पाहिजे तरच जीवन सुखी व चैतन्यमय होईल. असे जीवन राष्ट्रसंतांना अभिप्रेत आहे. शिक्षणाने स्वतंत्र निर्भय वृत्ती वाढावी, अंगी बाणेदारपणा यावा पण हे सगळे करताना विनयशीलता सोडू नये असे राष्ट्रसंत आवर्जून सांगतात.

विद्याअंगी व्हावा विनय । विद्या
करी स्वतंत्र निर्भय ।
शिक्षणाने वाढवावा निश्चय ।
जीवन जय करावया ।।

अंगी दुबळेपणा असेल तर शिक्षण काही कामाचे नाही. गावावर गुंडांची धाड आल्यावर विद्यार्थी जर पटापट दारे लावत असतील तर त्यांचे शिक्षण हे कुचकामी आहे. पुस्तकी ज्ञानाबरोबर बलवान करणारे शिक्षण राष्ट्रसंतांना अभिप्रेत होते. आज मुलांना खेळायला आणि शरीर बलवान करून शक्ती संवर्धन करायला वेळच नाही. 'शरीर निरोगी तर मन निरोगी' ज्या वयात शरीर बलवान व्हायला पाहिजे, देव, देश आणि धर्म याविषयी जागरूकता यायला पाहिजे त्यावयात शिक्षण उद्दिष्ट साध्य करीत नसेल तर हे शिक्षण कोणत्याही कामाचे नाही. प्रसिद्ध विचारवंत रुसोनी आपल्या 'एमिल' या पुस्तकात त्याच अर्थाने विचार व्यक्त केले

आहे.राष्ट्रसंतांनी देखील जीवनविद्येचा शिक्षणात अंतर्भाव असावा असे विचार मांडले आहे. शिक्षणाचे मुख्य सूत्र असो वा उद्दिष्ट यासाठी राष्ट्रसंतांनी राष्ट्र उभारणीला केंद्रीभूत ठेवले आहे. प्रत्येक क्षेत्रात उत्तम विद्यार्थी तयार झाले तर ते राष्ट्र उभारणीत सहकार्य करतील. शिक्षक कसा असावा ? हे सांगताना व्यसनी शिक्षकांचा ते धिक्कार करतात. राष्ट्रसंतांच्या शिक्षण, विद्यार्थी, शिक्षक या विषयाच्या मताचा परामर्श घेतला तर राष्ट्रविकास, ग्रामोन्नती यासाठी त्यांनी दिलेले मौलिक विचार किती महत्त्वपूर्ण आणि दिशादर्शक आहेत हे लक्षात येतात. शिक्षणाचा उद्देश हाच की, मुळात अनेक उत्तमोत्तम गुणांना व उपयुक्त कला कौशल्याचा विकास करून 'लाथ मारीन तिथे पाणी काढू' या प्रकारची धमक त्यांच्या अंगी आणून देईल. राष्ट्रसंतांचे शिक्षण, विद्यार्थी, शिक्षक या विषयाच्या मतांचा परामर्श घेतला तर राष्ट्रविकास, ग्रामोन्नती यासाठी त्यांनी दिलेले मौलिक विचार किती महत्त्वपूर्ण व दिशादर्शक आहेत याची प्रचिती येते. शिक्षणासंबंधी अनेक अंधश्रद्धा पसरलेल्या आहेत. जोपर्यंत ज्ञानरूपी प्रकाश पडणार नाही तोपर्यंत त्या व्यक्तीचा विकास शक्य नाही याची जाण त्यांना होती. या कोवळ्या कळ्यामधून त्यांना उद्याचे ज्ञानेश्वर, रवींद्र, शिवाजी निर्माण करायचे होते. जे शिक्षण आपण घेणार ते स्वावलंबी असले पाहिजे कारण गावावरून देशाची परीक्षा होत असते. दिखाऊ कपडे नोकरपेशा थाटमाट शिक्षणाचे उद्देश नाही हे ते आवर्जून सांगतात. संपूर्ण जीवनाचे तत्त्वज्ञान त्यांनी आपल्या' ग्रामगीता' या ग्रंथात समाविष्ट करून ठेवले आहे. त्यातील ओळ न ओळ मानव समाजाला त्याच्या जन्मापासून त्याच्या अंत्यसंस्कार पर्यंत दिशा दाखवणारी आहे.

ग्रामगीतेतील ‘महिलोन्नती’ या विसाव्या अध्यायात महिलांची सद्यस्थिती व त्यांचा विकास होण्याकरता करावयाच्या उपायांविषयी राष्ट्रसंतांनी चिंतन केले आहे. आज स्त्री प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करते. समाजकारण,

राजकारण, शिक्षण, व्यवसाय, नोकरी येथे प्रत्येक क्षेत्रातील पुढारलेली आहे. सर्व क्षेत्रात तिने नावलौकिक मिळविला आहे. आजची स्त्री बलशाली झाली तर राष्ट्र ही बलशाली झाल्याशिवाय राहणार नाही. स्त्रियांचे स्थान चूल आणि मूल एवढे संकुचित मानण्यावर त्यांनी प्रहार केला आहे.

स्त्री पुरुष ही दोन चाके । जरी
परस्पर सहाय्यके ।
तरीच संसाररथ चाले कौतुके ।
ग्राम होई आदर्श ।।

स्त्री ही भक्तीचे, शक्तीचे, ज्ञानाचे, संयमाचे मूर्तिमंत प्रतीक आहे. भारतीय स्त्री आज चूल आणि मूल सांभाळून समाज व देशात सेवेसाठी अहोरात्र काम करीत आहे. स्त्री आणि पुरुष ही संसारथाची दोन परस्परपूरक चाके आहेत. दोन्ही चाके मजबूत करा तरच संसाराची गाडी सुखरूप चालेल.राष्ट्रसंतांना अभिप्रेत असणारी स्त्री आज शिकली,सुज्ञ झाली पण स्त्री-पुरुष समानता अद्याप आली नाही. आज ती सुरक्षित नाही. संतांना अभिप्रेत असणारी समानता तेव्हाच येईल जेव्हा दोन्ही समान पातळीवर एकत्र पद्धतीने काम करतील. स्त्री-पुरुष भेद न राहता केवळ माणूस म्हणून एकमेकाकडे बघण्याचा दृष्टिकोन निर्माण होईल. आज या सहशिक्षणाने परस्परातील आकर्षण कमी होऊन अनाचार कमी होण्यास मदत होईल असे त्यांचे मत आहे. स्त्रीने आपल्यातील सामर्थ्य ओळखून आपल्यातील क्षमतांचा विकास करणे व पुरुषांच्या बरोबरीने स्वातंत्र्य मिळवणे आवश्यक ठरते. स्त्रीला पुरुषाबरोबर समानहक्क, शिक्षण, न्याय वागणूक समाजाने दिली तरच या समाजाचा देशाचा विकास होईल असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना वाटते. मुलांबरोबर मुलींच्या ही संघटना असाव्यात आज त्याची नितांत गरज आहे. सभा-संमेलने, प्रार्थना, कथा कीर्तन हळदी कुंकू, वाढदिवस, सामूहिकविवाह इत्यादीसाठी स्त्रियांना स्वतंत्र उन्नतीभवन स्थापन करून द्यावे. स्त्री ही त्यागाची मूर्ती, धैर्याचा महामेरू, फुलापेक्षाही नाजुकहृदयाची

वात्सल्यमूर्ती, कधी मेकनेसारखी मोहिनी घालणारी तर कधी वैरागी, कधी गांभीर्याचा सागर तर कधी राणी लक्ष्मीबाईसारखी विरांगणा अशा नानाविध रूपात आज ती शक्तिप्रदर्शन करते. तिचे हे सामर्थ्य पटवून सांगताना राष्ट्रसंत म्हणतात

स्त्रियेसारखी मोहिनी नाही ।
स्त्रियेसारखी वैरागिनी नाही।
स्त्रियेसारखी मुलायम नाही ।
आणि कठोर रणचंडिका ।।

स्त्रीला आत्मनिर्भर होण्यासाठी योगा, मल्लखांब, जुडो, कराटे, धनुर्विद्या यांचे प्रशिक्षण असावे असे त्यांचे मत होते. वंदनीय राष्ट्रसंत यांचे साहित्यविषयक वाङ्‌मय हे समूळ मानवजातीच्या कल्याणाचे प्रेरणास्त्रोत आहे अशा अमोल लेखणीतून ज्यांनी हे संस्कारधन आपल्या पुढ्यात ठेवले आहे. लोकांना साध्या सोप्या पद्धतीने जीवनाचे तत्त्वज्ञान समजावे हाच ग्रामगीता लेखनामागचा त्यांचा मुख्य उद्देश होता. त्यांच्या 'ग्रामगीता' ग्रंथाला मार्गदर्शक ग्रंथ म्हणून समाजाने स्वीकारले आहे. या ग्रंथाला धर्म, जात, पंथ प्रदेशाच्या सीमा पडलेल्या नाहीत. ग्रामगीता खरे तर भगवद्गीता आहे असा गौरवच करता येईल. अनेक विद्यापीठांनी या ग्रंथाचा अभ्यासक्रमात देखील समावेश केल्याचे निदर्शनास येते आहे. राष्ट्रसंतांच्या साहित्य निर्मितीचा हेतू हा पांडित्य प्रदर्शनाचा नसून समाजप्रबोधनाचा आहे. गीताग्रंथ निर्माण होऊन अर्धशतक उलटले गेलं तरी त्याचे महत्त्व कमी होत नाही उलट वाढीस लागत आहे. द्वापारयुगात भगवान श्रीकृष्णाने जी जादू बासरी च्या माध्यमाने केली तोच प्रकार विसाव्या शतकात विश्वसंत तुकडोजी महाराजांनी खंजिरी च्या माध्यमातून केला. अनिष्ट रुढीपरंपरा व मानवी अव्यवहार नष्ट करून सज्जनांचे रक्षण करण्याकरता नव्या नव्या तंत्राचा वापर केला. 1942 च्या लढ्यात या खंजिरी ने इंग्रजांच्या नाकी नऊ आणले. समाजातील प्रश्न त्यांनी पाहिले.संत परंपरेचा मूळ धागा न सोडता अध्यात्म आणि विज्ञानाच्या सहयोगाने हे जग कसे सुखी होऊ शकेल अशी प्रार्थना त्यांनी केली आणि

ती प्रत्यक्षात उतरावी यासाठी प्रयत्न केला. गोरक्षणाचा विषय हाताळताना गोवंशाकडे जर दुर्लक्ष केले तर त्यामुळे या देशाची आर्थिक कशी होणार आहे हे त्यांनी पटवून दिले. चिंतनशीलतेबरोबरच वैज्ञानिक दृष्टिकोन हा त्यांच्या साहित्यातून प्रदर्शित होतो. विभिन्न स्तरातील शेकडो सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक, धार्मिक संमेलन त्यांनी गाजवली. असंख्य योजनांना आश्रय दिला गांधी स्मृतिदिना यानिमित्ताने होणाऱ्या प्रचंड विधायक महोत्सवात नागपूर, विदर्भ, गोंडवन, मराठवाडा यात सहभागी होऊन महाराजांनी नवनिर्माणाची लाट निर्माण केली. निजाम स्टेटच्या सरहद्दीवर गावोगावी वर्ग घेऊन युवकांना शक्ती संवर्धनास प्रवृत्त केले. पंजाब आणि म्हैसपूर हा सर्व भूभाग महाराजांनी खंजिरीने जागवला.

राष्ट्रसंतांनी आपले विचार साहित्यातून सुद्धा जनसामान्यापर्यंत पोहोचवले. राष्ट्रसंतांनी विपुल साहित्यनिर्मिती केली. त्यांनी मराठी आणि हिंदी भाषेतून लिहिलेल्या पुस्तकांची संख्या जवळपास 60 च्या वर आहेत असंख्य भजनाची पुस्तके काही लेखसंग्रह, प्रवचन, पत्रे, भाषणे इत्यादी विपुल साहित्यनिर्मिती करून त्यांनी विचारधन जनतेपर्यंत पोहोचविले याशिवाय श्री गुरुदेव विवाह पद्धती, मेरी जापान यात्रा, सुविचार स्मरणी, लोकशाहीचे पोवाडे याही माध्यमातून वैचारिकता जागविली. राष्ट्रसंतांची साहित्य निर्मिती कोणत्याही एका प्रकारात मोडता येणार नाही भजन, ओवी, अभंग, श्लोक, पोवाडा अशा विविध साहित्य प्रकारात मोडणारी आहे. 'पोवाडा' या साहित्यप्रकाराचा ही वापर त्यांनी आपले विचार सामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी अशाचप्रकारे 'लोकशाहीचे पोवाडे' गायले. शेवटपर्यंत त्यांनी आपली वाणी व लेखणी समाजाकरता, देशाकरिता आणि राष्ट्रकरिता झीजवली. संत तुकडोजी महाराजांनी गद्य-पद्य संरचनेला जास्तीत जास्त महत्त्व दिलेले आढळते. पद्य हे तुकडोजी महाराजांच्या जीवनाचे

अविभाज्य अंग होते. भक्तीपर रचना राष्ट्रपर आणि जनजागृतीपर रचना त्यांनी केल्या आहेत. त्यांच्या पद्याची जवळजवळ एकोणवीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. संतांनी पद्यरचना बोजड क्लिष्ट, अलंकारप्रचुर अथवा रूपकात्मक नाही याचा अर्थ त्यांनी अलंकारयुक्त रचना केली नाही असा नाही. काही ठिकाणी त्यांनी प्रतीक,प्रतिमांचा अलंकाराचा वापर करून लोकांना आश्चर्यचकित करून सोडले. मराठी व हिंदी या दोन्ही भाषांमध्ये त्यांनी आपले साहित्य निर्मिती केली. संस्कृत भाषेचा त्यांचा अभ्यास नव्हता तरी काही सुभाषितवजा संस्कृत वचने आपल्या साहित्यात पेरली आहे. राष्ट्रसंतांनी पुष्कळ साहित्यनिर्मिती केली आहे पण ती कोणतेही एका प्रकारात मोडणारी नाही. भजन, अभंग, पोवाडा या प्रकारात मोडणारी आहे. गद्य व पद्य रचना करून याद्वारे समाज जागृती करणारे महत्त्वाचे कार्य या संतांनी पार पाडले आहे. 11 ऑक्टोबर 1968 रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांची खंजिरी कायमची मुक झाली परंतु त्यांची भजने आणि ग्रामगीता त्यांच्या विचारांचे आणि श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्याचे स्मारक म्हणून आपल्याला सदैव प्रेरणा देत राहील.

**निष्कर्ष –**

1. वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या वाणीमधून सर्वधर्मसमभावाची शिकवण दिली आहे.
2. शिक्षणाविषयी असणारी आत्यंतिक तळमळ राष्ट्रसंतांच्या साहित्य मधून अभिव्यक्त होते.
3. मानवता हाच खरा धर्म आहे असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे मत होते.
4. भविष्यकाळाचा वेध हा त्यांच्या साहित्याचा स्थायीभाव आहे.
5. परस्पर पूरक उदाहरणे,दाखले हे संत तुकडोजीच्या साहित्याचे विशेष होय.

6. अध्यात्म आणि विज्ञानाचा सहयोग संत तुकडोजी च्या साहित्यामधून निदर्शनास येतो.

7. हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते.

8. प्राणीमात्राबद्दल असणारी प्रेमभावना त्यांच्या साहित्यातून दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ-**

1) आखरे, डॉ. हरिदास- दैनिक सकाळ वृत्तपत्र 11 मार्च 2020
2) कडवे, प्रा. रघुनाथ - 'राष्ट्रसंत विचार दर्शन' पृष्ठ क्रमांक- 3
3) घाटोळ, विठ्ठल - 'नवयुगाचा निर्माता' पृष्ठ क्रमांक -14,15
4) घोडे, प्रा. डॉ.राम -संत तुकडोजी तौलनिक दर्शन पृष्ठ क्रमांक-33, 34
5) संत तुकडोजी - 'ग्रामगीता 'प्रकाशन महाल, नागपूर पृष्ठ क्र. 203, 217, 224
6) सावरकर, सुदाम - नव प्रकाश श्री गुरुदेव प्रकाशन पृष्ठ क्रमांक- 22
7) संत तुकडोजी - 'लहर की बरखा' पृष्ठ क्रमांक- 143 श्रीगुरुदेव प्रकाशन,गुरुकुंज आश्रम
8) संत तुकडोजी - 'युगप्रभात' पृष्ठ क्रमांक - 47, श्री गुरुदेव प्रकाशन गुरुकुंज आश्रम तृतीय आवृत्ती 2007

** ** **

# स्त्री स्वत्वाचा शोध : एक दृष्टिक्षेप

**संशोधक विद्यार्थी : कु. सुनंदा पापडकर** **मार्गदर्शक : प्रा.डॉ. शोभा रोकडे**
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

**प्रस्तावना** -

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वाधामध्ये स्त्रियांना शिक्षण देऊन स्वावलंबी केले पाहिजे, असा विचार मांडण्यास सुरुवात झाली. रुढी आणि परंपरा, अन्याय, अत्याचाराला आळा घालण्यात यावा म्हणून प्रत्यक्षात काही समाजसुधारकांनी स्त्रियांना शिक्षण देण्यास सुरुवात केली. भारतात पितृसत्ताक पद्धती असल्यामुळे विवाहानंतर मुलगी मूळ कुंटूंबातून पतीच्या घरी जाते, संसारात रमते, घरदार सांभाळते, मुलाबाळांना वाढविते. त्यामुळे स्त्रियांचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल एवढ्यापुरतेच मर्यादित होते. बंदिस्तपणामुळे सर्जनशिलता ही फक्त पुरुषांचीच मक्तेदारी होती. स्त्रियांच्या लेखनाला मर्यादा पडल्या होत्या. पूर्वी स्त्रियांना शिक्षणाचीही संधी न मिळाल्यामुळे त्यांना नेहमी पुरुषी वर्चस्वाला सामोरे जावे लागत होते.

साहित्य निर्मिती ही सर्जनशिलतेतून येते आणि

सर्जनशिलता स्त्री-पुरुष भेद मानत नाही, असे स्त्रीवादी स्पष्ट करतात. स्त्रीविषयी अनुभवांचे, स्त्रियांचे लेखन प्रकाशात आणणारी, साहित्यात नवास्त्रीवादी समीक्षेचा मार्ग आखणारी व्हर्जिनिया वुल्फ म्हणते, "स्त्रियांना अधिक व्यापक अनुभवाचे क्षेत्र लाभत नसल्यामुळे त्यांच्या निर्मितीक्षमतेवर मर्यादा पडतात. सामाजिक संरचनेमुळे स्वतःचे मन आणि भाव लपविण्याचीच स्त्रियांची प्रवृत्ती असते. तिला सामाजिक संरचनेत स्त्रीपणाची गरज असते. म्हणून ती स्वेच्छेने तडजोड करून स्वनिर्माण क्षमतेवरच बंधन घालते. म्हणजेच स्त्रियांना व्यापक व विस्तृत अनुभव क्षेत्र, सामाजिक व आर्थिक पर्यावरण लाभले तर अत्यंत अनुभव क्षेत्र लाभले. सामाजिक, आर्थिक पर्यावरण लाभले तर अत्यंत उत्स्फूर्त अशा नवनिर्मितीचे कार्य तिच्या हातून होऊ शकते."

ज्या ठिकाणी समाजाने स्त्रियांकडून अपेक्षिलेल्या भूमिका संपवून विचार करणे, आत्मप्रकटीकरण करणे याचा तिला अवकाश लाभेल त्या काळात स्त्रियांना तेवढेही स्वातंत्र्य नव्हते. त्यामुळे त्यांना लिहिते होणे अशक्यच झाले होते.

१९६० नंतर साहित्य क्षेत्रात फार मोठे स्थित्यंतर घडून आले. स्त्रियांनी साहित्यातून आपले अनुभव व्यक्त करणे हा पितृपधान व्यवस्थेविरुध्दचा डावच आहे. जाणीव जागृती हा चळवळीचा मुख्य आधार असल्याने अशा खास अनुभवांना आविष्कृत करणारे साहित्य 'स्त्रीवादी' मानले जाऊ लागले. विवाहसंस्थेतील उणिवा व त्यामुळे स्त्रीला भोगावा लागणारा त्रास या गोष्टी साहित्यातून प्रकाशात आणण्याचा प्रयत्न केला. जुन्या परंपरा नाकारून जीवनमूल्यांची निर्मिती साहित्यातून मांडली. स्त्रियांचे आर्थिक, सामाजिक स्वातंत्र्य, विवाहसंस्थेला तिचा नकार, प्रेम आणि सामंजस्य यावर आधारलेले स्त्री-पुरुष संबंध, स्त्री-पुरुष समानता या स्त्रीवादी मूल्यांचा पुरस्कार साहित्यातून होऊ लागला, त्यांनी स्वतःच्या जीवनात अनुभवलेल्या कविता, असुरक्षितता यांची जागा भरून

काढणाऱ्या विश्वाची निर्मिती साहित्यातून होऊ लागली. स्त्रीची आशावादी व पुरोगामी प्रतिमा चित्रीत होऊ लागली. स्त्रिया संयमाने लेखन करू लागल्या त्यांच्या लेखन अविष्कारात विचारातील मुक्तता दिसू लागली.

स्त्री स्वातंत्र्याची जाणीव झालेल्या व त्या जाणिवेला मूर्त रूप देऊ पाहणाच्या या लेखिकांचे अनुभवविश्व हे पुरुष लेखकांच्या अनुभवविश्वापेक्षा वेगळे दिसून येते. स्त्रीची पारंपारिक प्रतिमा मुळातच चुकीची आहे. ती पुरुषांनी आपल्या सोईसाठी निर्माण केलेली आहे. प्रेम, वात्सल्य, त्याग नम्रता, लाजरेपणा इ. सर्व तथाकथित सद्‌गुण स्त्रीच्या माथी मारलेले आहेत. ही स्त्रीची नवीन जाणीव तिच्या हातून निर्माण होणाऱ्या साहित्यातील अनुभवविश्वाचे व प्रतिमांचे वेगळेपण लेखनातून प्रकट होताना दिसू लागले.

अरुणा सबाने ह्या विदर्भातील स्त्रीवादी चळवळीत सक्रिय कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या आहेत. लेखिकेची नैतिकता आणि सामाजिक उत्तरदायित्वाचे वाङ्मयीन भानही त्यांनी आपल्या कथा, कादंबरी- ललित व ललितेतर वैचारिक लेखनातून जपले आहे. लेखकाच्या संपूर्ण स्वातंत्र्याचा उपयोग करून लेखन करण्याची त्यांची लेखनवृत्ती आहे. एक सामाजिक कार्यकर्ता ते सामाजिक समस्यांवर विशेषतः स्त्रीत्वाचा स्वतंत्र पुरस्कार करणाऱ्या आणि आपल्या लेखनातून आधुनिक आणि ग्लोबल युगात स्त्रीवादाचा पुरस्कार करणाऱ्या लेखिका आहेत. आपल्या व्यक्तिमत्त्वाची स्वतंत्र ओळख सिद्ध करण्यासाठी त्यांनी आजवरच्या आयुष्यात अपार कष्ट आणि परिश्रम घेतले आहेत. सामाजिक कार्यकर्ता म्हणून काम करताना झालेल्या कडूगोड घटनांना आपल्या लेखनातून त्यांनी कलात्मक आकार देण्याचा प्रयत्न केला. 'जखम मनावरची', 'अथांग', 'अनुबंध' हे तीन कथासंग्रह, स्त्री : नाते स्वतःशी, जिवाभावाचे - ललित, बहिणाबाई चौधरी, आंबेडकर आणि स्त्री, साहित्यातून समाजाकडे, स्त्रीवाद : एक दृष्टीक्षेप ही संपादने,

'विमुक्ता' आणि 'मुन्नी' या दोन कादंबऱ्या, शिवाय लोकमत, नवराष्ट्र, जनवाद, निर्मल महाराष्ट्र , बायजा, स्त्री, मिळून साऱ्याजणी या नियतकालिकांमधून स्तंभलेखन, असे चौफेर वाङ्मयीन - सामाजिक - सांस्कृतिक लेखन लक्षात घेतले म्हणजे, अरुणा सबाने यांनी संपादक, प्रकाशक, कथा - कादंबरी लेखिका, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यकर्ती अशा विविधांगी भूमिका पार पाडून अल्पावधीतच आपल्या विविधांगी आणि चतु:रस्त्र कार्यकर्तृत्वाचा सजग आणि निर्भय स्त्रीवाद सिद्ध केला आहे.

**लेखिकेची भूमिका :**

समाजात स्त्रीला एक व्यक्ती म्हणून जगण्याचा घटनादत्त अधिकार आहे असे त्यांना वाटते. हीच भूमिका त्यांनी विमुक्तामध्ये केंद्रवर्ती मानून कादंबरीच्या परिघातून सोदाहरण विस्तारही केला आहे. हीच भूमिका विमुक्ता प्रमाणेच 'मुन्नी' (२०१०) तसेच त्यांच्या कथादी ललित वैचारिक लेखनातूनही व्यक्त झालेली आहे. त्यांनी एक दुसरे सूत्र मांडले, स्त्री ही स्वतंत्र असून स्वबळावर आपल स्वतंत्र जग उभारू शकते. आयुष्यात संघर्ष करणारी स्त्री ही कुणातरी पुरुषाच्याच आधाराने मोठी होते, तिला अनेक तडजोडी कराव्या लागतात, पुरुषाशिवाय ती मोठी होऊच शकत नाही किंवा स्वबळावर ती आपले मोठेपण सिद्ध करू शकत नाही आणि समाजात जगणेही तिला अशक्यच असल्याचे बोलले जाते हे त्यांनी विमुक्ता आणि मुन्नीतून खोटे ठरवले आहे. वसुधा मोहिते आणि वैदेही वडस्कर हया दोन्ही स्त्रिया स्वबळावर आपले विश्व निर्माण करतात. आपले कुटुंब तर मोठ करतातच परंतु समाजाला आपल कुटुंब मानून, समाज कार्य करून समाजाचे उत्तरदायित्वही पार पाडतात. त्यांच्या मते, त्यांची कादंबरी जर एखादयाच्या मनातला संशय दूर करत असेल, एखादीला विहीरीच्या कठड्यापासून दूर करत असेल, आत्महत्येच्या विचारांपासून परावृत्त करत असेल तर त्यांना वाटते, एक कादंबरीकार म्हणून ते त्यांचे यश आहे. स्त्री-पुरुष समानतेचा

विचार मांडणारे पुरुषही मनातून पुरुष प्रधान संस्कृतीचेच पुरस्कर्ते असतात आणि त्यांचे पुरुषप्रधान वर्चस्व आणि स्त्रियांविषयीची दृष्ट भूमिका त्यांच्या प्रत्यक्ष जीवन व्यवहारात सहभागी असलेल्या स्त्रियांच्या दैनंदिन अनुभवाला येते.

"विमुक्ता" हा या दुष्ट आणि स्त्रीहननवृत्तीचा सोदाहरण नमुना आहे. प्रत्येक स्त्रीच्या मनात वसुधा आणि वैदेही असते. तिच्या वाट्याला शशांकसारखे संशयखोर आणि मास्तरसारखे लंपट पुरुष येतात. आणि स्त्रियांच्या आयुष्याचे मातेरे होते, हा सार्वत्रिक अनुभव असतो. या सार्वत्रिक अनुभवाला शह देऊन स्त्रीचे स्वतंत्र, स्वायत्त आणि सामाजिकदृष्ट्या विधायक आणि रचनात्मक रूप, अरुणा सबाने यांनी आपल्या 'कादंबऱ्यातून मांडून एका दृष्ट कर्मठ आणि पारंपारिक पुरुषप्रधान व्यवस्थेला जोरदार शह दिला. वसुधा - वैदेहीच्या रुपात स्त्रित्वाच सकारात्मक आणि प्रागतिक रूप मांडून - सिद्ध करून, आधुनिक याणि समकालीन स्त्रीत्वाची नवीन परंतु सामाजिकदृष्ट्या विधायक आणि सकारात्मक मांडणी केली.

## लेखिकेची नैतिकता आणि स्त्रीवादी दृष्टिकोन

जीवन याणि साहित्यात अंतर असू नये. साहित्य हे कालसापेक्ष आणि वास्तववादी असावे. साहित्य हे सामाजिक दस्तऐवज असते. साहित्य निर्मिती आणि लेखकाच्या नैतिकतेत ही सर्व सजग वाङ्मयीन मूल्ये असावीत. आधुनिक काळात वाचकांच्या अभिरूचीलाही सजग वळण लागल्यामुळे संबंध वाङ्मयीन विश्वच कलाकृतीकडे सजगपणे पाहू लागले आहे. विसाव्या शतकाच्या शेवटी आणि एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात लेखकाच्या नैतिकतेला आणि लेखनातल्या वास्तवमूल्यांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. स्वांतः सुखाय आणि स्वायत्त कलामूल्यांचा अंगिकार करणारे साहित्य आता विशिष्ट सुखवस्तू आणि आळशी वाचकापर्यंत सिमित झाल्याचे दिसून येते.

कथा, कादंबरी , सामाजिक दस्तऐवज म्हणून, समाजासमोर सत्यदर्शन मांडण्याचे आणि समाजाला सजग करीत, प्रगतीप्रथाकडे नेण्याचे मौलिक असे साधन बनले. वास्तवाच्या दिशा मोकळ्या झाल्या. लेखिकेची नैतिकता सुक्ष्मातिसुक्ष्मपणे-निर्भयपणे व्यक्त करण्याची कादंबरी व कथा एक माध्यम बनली. साहित्यप्रकार आणि साहित्यकृतींच्या सांधिक परिणामांतून जीवनाचे दर्शन अधिक प्रखर आणि प्रामाणिकपणे समाजाला घडू लागले, स्त्रीवादी लेखिकांनीही आपल्या जीवनातील अनुभवांना मोकळेपणाने अभिव्यक्ती दिली. पुरुषसत्ताक अन्यायांना वाचा फोडली. पुरुषसत्ताक व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवला. आत्मकथनांचा परिणाम म्हणून वाङ्मयप्रकारातही एक प्रकारचे खुलेपण आले. कादंबरीसारख्या विस्तृत अवकाश व्यापणाऱ्या वाङ्मय प्रकरातही लेखकांच्या आत्मविष्काराला चालना मिळाली.

## स्त्रीत्व आणि अस्तित्व सिद्धीचा जीवघेणा संघर्ष :

अरुणा सबाने यांनी स्त्रीवादी लेखनाची धीट पायवाट स्वीकारताना कुठेही अतिरेक केलेला नाही. शरीर आणि शरीराचे अवयव हे प्रत्येकच व्यक्तीच्या जीवनाचे अनिवार्य आणि नैसर्गिक अंग असते. त्यात लपवण्यासारखे काहीच नसते. वास्तव आणि सत्याची कास धरणाऱ्या स्त्रीवादी लेखिकेने जर धीटपणे जीवनातील उघडे – नागडे परंतु स्त्रीजीवनाला भेसूर, विद्रूप करणारे सामाजिक सत्य समाजासमोर का मांडू नये ? पुरुषांनी केवळ शरीरवर बोलावे आणि स्त्रियांनी मर्यादेत राहावे असे का ? जेवढा शरीरावर बोलण्याचा पुरुषाचा अधिकार असतो तितकाच तो स्त्रीलाही असतो. लेखिका अरुणा सबाने स्त्री - पुरुष समानतेचा विचारअसा सर्वांगाने करतात. हे त्यांच्या लेखनातील निखळ वास्तव आणि सत्य मानून समाजाने 'वसूच्या' (विमुक्ता कादंबरी मधील) स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या अमानुष

पौरुषत्वाचा पुर्नविचार करायला हवा. वसूच्या पाठीशी एक समाजकर्तव्य म्हणून उभ राहायला हवे. हे सामाजिक आत्मभान जाग करणारे लेखन लेखिकेने केल्यामुळे त्यांचही समाजाने कौतुक करायला हवे. स्त्रीवादी मानवतावादाचा एक नवा आयाम अरुणा सबाने यांनी' विमुक्ता ' मधून समाजासमोर मांडला आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेत परित्यक्ता स्त्रीच्या वाट्याला जगताना निंदा, नालस्ती, बलात्कार, छळ हेच बहुतेक येते. 'वसुला' याची जाणिव होती म्हणूनच तिने आपले स्त्रीत्व धारदार आणि तेजस्वीपणे समाजात प्रकट करायला सुरुवात केली.स्त्रीवादी लेखनातून प्रकटणारा विद्रोही हादरा अर्थातच समाजात स्त्रियांप्रती सदभाव आणि न्यायाप्रती जागरुकता निर्माण करण्यासाठीच उपकारक ठरला आहे. पुरुषांच्याच बरोबरीने स्त्रीलाही समानतेची वागणूक मिळाली पाहिजे, हा दोनच आशा त्यांच्या लेखनातून प्रस्फुटित होतात. समाजाने स्त्रीकडे पाहण्याची पारंपारिक - सनातन -कर्मठ - भोगवादी - शोषक दृष्टी त्यागून स्त्रियाही पुरुषप्रधान समाजाच्याच अभिन्न घटक असून त्यांनाही सुखसमाधानाने जगण्याचे स्वातंत्र्य असायला हवे, एवढीच किमान अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

स्त्रियांनाही पुरुषांचा सहचर म्हणून जीवन उभारताना मोठा मानसिक आधार असतो.स्त्रियांची वृत्ती स्वप्नाळू असते. पुरुषांच्याही बाबतीत काही प्रमाणात असे होत, नाही असे नाही. प्रमाण कमी आहे. पुरुष कोसळले की जमीनदोस्तच होतात. परंतु स्त्रिया कोसळल्यावरही नव्यान जीवन उभारण्याची उर्जा आणि ताकद त्यांच्यात उदंड असते. पुरुषांकडून अवहेलना वाट्याला येऊनही कधी लेखिकेने पुरुषांचा उभा व्देष मांडला नाही. आपला पुरुष अहंकारी आणि अत्याचारी आहे म्हणून जगातले सर्वच पुरुष आपल्या वाटेला आलेल्या पुरुषांसारखेच नसतात हेही त्यांना कळते. जगातही स्त्रियांना सन्मान-आदर-समानता - स्वातंत्र्य देणारे आणि स्त्रीत्वाला जपणारेही पुरुष असतातच

याविषयी त्यांना कुठलीही शंका नाही.

**सारांश :**

अरुणा सबाने यांनी स्त्रीवादाची सकारात्मक मांडणी करून स्त्री-पुरुष समानतेला एक नवीन आयाम देण्याचा प्रयत्न केला आहे. पुरुषाशिवायही स्त्री सबला, आणि सामाजिक दृष्ट्या उन्नत आणि प्रगतीशील असं व्यक्तिमत्त्व सिद्ध करू शकते, हा वस्तुपाठ त्यांनी आपल्या अनुभवांतून समाजासमोर ठेवला आहे. आपल्या साहित्यातून, त्यातील स्त्रीपात्राच्या निमित्ताने त्यांनी आपल्या जगण्याची आणि विधायकत्वाची अभिव्यक्ती करून, स्त्री ही अबला नसून सबलाच आहे, हे प्रमेय आपल्याच जगण्यातून सिद्ध केले आहे. लेखिकेची नैतिकता आणि कथा, कादंबरीचे सामाजिक दस्तऐवज म्हणून असलेले अस्तित्व त्यांनी साधले आहे. समाजाच्या सांस्कृतिक वाटचालीत स्त्री ही केवळ भोगवस्तू नाही, उलट ती सजग, प्रगल्भ आणि स्वयंसिद्धा आहे असे भान लेखिकेचे साहित्य सर्व समाजाला देते. स्त्रीला एक व्यक्ती, एक माणूस म्हणून बघा ; ही मानवतावादी दृष्टी लेखिका समाजात रुजवतात.

स्त्रीमध्ये अफाट ऊर्जा असते. आणि समाजाच्या विधायक बांधणी साठी जर ती वापरली, तर समाजात नाव चैतन्य निर्माण होत. स्त्रीला आपली स्वतंत्र ओळख समाजाला करून देता येते. पुरुष प्रधान व्यवस्थेला स्त्रीचे भोग्य रूप आजवर जितके दिसले तितके स्त्री मध्ये असलेल्या विधायक आणि जीवन दायी ऊर्जेचे रूप मात्र पुरेसे उजागर झालेले नाही. पुरुषांची सनातन अहंब्रह्मास्मि मानसिकताच यामागेही कार्यरत असल्याचेच वास्तव आजही कायम आहे

**संदर्भग्रंथ**


- डॉ. किशोर सानप – “समकालीन स्त्रियांच्या कादंबऱ्या” आकांक्षा प्रकाशन, प्रथम आवृत्ती ६ - १२- १२.
- संपादक - डॉ. अश्विनी धोंगडे/ अरुणा सबाने - “स्त्री - एक बहुरूप दर्शन

, आकांक्षा प्रकाशन, प्रथम आवृत्ती २९/५/ २०१९

- अरुणा सबाने - "जखम मनावरची " आकांक्षा प्रकाशन , दुसरी आवृत्ती - १ ऑगस्ट २००७
- अरुणा सबाने - "अनुबंध" , महाजन ब्रॉथेर्स प्रकाशन , नवीन आवृत्ती १५/०१/२०१७
- अरुणा सबाने -" आईचा बॉयफ्रेंड" , आकांक्षा प्रकाशासन , प्रथम आवृत्ती २५/१२/ २०१९
- संपादक - अरुणा सबाने , "डॉ. आंबेडकर आणि स्त्री " , आकांक्षा प्रकाशन , प्रथम आवृत्ती ८/०३/ २००७
- अरुणा सबाने - " विमुक्ता " , आकांक्षा प्रकाशन, प्रथम आवृत्ती २५/ १२/२००६
- अरुणा सबाने - "मुन्नी " , आकांक्षा प्रकाशन , प्रथम आवृत्ती १३/ मार्च/ २०१०
- अंजली कुलकर्णी - "स्त्री - स्वत्वाचा शोध" ,आकांक्षा प्रकाशन प्रथम आवृत्ती ८ मार्च २०१०

***

# संत जनाबाई यांच्या अभंगातील स्त्री जाणिवा

**संशोधक विद्यार्थी : प्रा.सतिश शं. आठवले**
**मार्गदर्शक : प्रा.डॉ.सुवर्णा गाडगे**
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. संतांनी आपल्या विचारांच्या माध्यामातून मानवतेचा पाया रूजविण्याचे कार्य केलेले आहे. परंतु संतांना देखील आपले अस्तित्व निर्माण करताना अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. संतांनी स्त्रियांच्या समस्येला प्राधान्य देऊन जनजागृती करण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षण ही आमुलाग्र

समाजपरिवर्तनाचे महत्त्वाचे साधन आहे. या शिक्षणामुळेच उपेक्षित, वंचित समाजाला आत्मभान येऊन समाज विकासाच्या प्रवाहाकडे वाटचाल करण्यामध्ये संतांचे मोलाचे योगदान आहे.

13 व्या 14 व्या शतकातील संत ज्ञानेश्वराच्या काळात संतांच्या मनात शुद्रत्वाची भावना अतिशुद्रजातीची जाणीव सतत त्यांच्या मनात उठणाऱ्या वेदना त्याचे शल्य त्यांना सतत बोचते. त्यांचे दाखले आपल्याला त्यांच्या अभंगातून प्रत्ययास येतात. रोजच्या व्यवहारात जात-पात भेदाभेद पाळली जात होती. जातीधर्म पाळणे, स्वधर्म पाळणे अशी वेदाची, स्मृतीची आज्ञा होती. या विषयी श्री.म.माटे असे म्हणतात, "नामदेव ज्ञानदेवापासून तुकारामापर्यंत सर्व संतांना या सामाजिक बाबीचा उच्चार मोठ्या आग्रहाने पुन्हा पुन्हा करणे भाग पडत होते. मुख्यत्वे ब्राम्हण, क्षत्रिय आणि वैश्य यांना धर्माचे हक्क होते आणि शुद्रातील शुद्रांना ते मुळीच मान्य नव्हते. आर्थात जे शुद्राती शुद्र समजले जात त्यांना आपला अधिकार कृष्णावताराने मान्य केलेला दिसून येतो. आणि म्हणून तो आम्ही चालविणारच या भावनेने जतीचे व वर्णाचे उल्लेख केलेले आहेत."1 संतांची ही अध्यात्मिक समता वर्णाश्रमाला मान्य नव्हती, त्यामुळे संत चळवळ जन्मास आली. या संत चळवळीत ब्राम्हण, कुणबी, माळी, तेली, सुतार, सोनार, कुंभार, महार, इ. भिन्न जाती धर्मातील लोक सामील झाले आणि म्हणूनच 13 व्या व 14 व्या शतकावर महानुभाव पंथाचा प्रभाव दिसतो.

महानुभाव पंथ प्रचार व प्रसार करू लागले त्याचे तत्त्वज्ञान म्हणजे जातीभेदाला विरोध विषमता असलेल्या समाजात विरोध होता. ईश्वराच्या भक्तीसाठी वेदांची उपासनेची आवश्यकता नाही असे महानुभावपंथीय संस्थापक सांगू लागले, या संदर्भात शंकरराव खरात असे म्हणतात की, "महानुभाव पंथ श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-निच भेदभाव मानीत नाही. असे चक्रधर स्वामी यांनी सांगितले. याचाच अर्थ असा की, त्यांच्या चातृवर्ण्याला वर्णाश्रम

धर्माला विरोध होता."2 संत जनाबाई, चोखामेळा, सोयराबाई, निर्मला, कर्ममेळा, कान्होपात्रा, बंका हे सर्व संत आजच्या भाषेतील दलित संत आहेत. कारण पंढरपूर हे सर्वांचे श्रध्दास्थान आहे. विठ्ठलाचे दर्शन जवळून घ्यावे ही त्यांची अंतरीची इच्छा आहे परंतु त्यांना मंदिरात प्रवेश नव्हता. त्यामुळे ते महाव्दारापाशीच थबकलेले दिसतात.विठ्ठलाचे दुरुनच दर्शन करून त्यांना समाधान मानावे लागत होते. आपण शुद्र आहोत. समाजातील उच्चवर्णीयांनी आपली उपेक्षा केली आहे. आपल्याला वाळीत टाकलेले आहे, या दुःखाची झळ अंत:करणात आहे. आपल्या अभंगातून ते दुःख मांडतात, त्यांची अभंगवाणी काळजाला भिडणारी आहे. मध्ययुगीन कालखंडात देखील संतांची उपेक्षा झाली आहे. आपल्या समाजातील शुद्र बांधवाविषयी व त्यांच्या दुःखमय परिस्थिती विषयी जाणिवा त्यांनी आपल्या अभंगातून प्रत्ययास आणून दिल्या. त्यातील एक संत जनाबाई यांच्याविषयी स्त्री बद्दलच्या जाणिवा स्पष्ट करायच्या आहे.

इ.स. 1270 ते 1350 असा संत जनाबाई यांचा कालखंड आहे. हाच काळ संत नामदेवाचा समकालीन काळ आहे. याच कालखंडात संत जनाबाई सारखे संत होऊन गेले. संत जनाबाई यांनी 'डोईचा पदर आला खांद्यावरी' या अभंगामधून स्त्रियांच्या सबलीकरणाचा पहिला प्रश्न मांडणारी स्त्री संत आहे. प्रचलित रुढी परंपरेमुळे 'स्त्री' ही बंदिस्त अवस्थेत होती. त्याविरुद्ध जनाबाईने विद्रोह केलेला आहे. माणूस म्हणून मला वारकरी पंथातील ईश्वराला प्राप्त करून घेणाऱ्या विविध मार्गाचा अवलंब करायचा आहे तो हक्क मी माणूस म्हणून मिळवणारच असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. त्यासाठी स्त्रीवर लादलेली अनिष्ठ बंधने 'मी झुगारून टाकेल' असा विश्वास त्यांना वाटतो. संत जनाबाई संत नामदेवाच्या घरी दासी म्हणून वावरत होत्या. संत जनाबाईचे समाजातील स्थान खालच्या जातीतील होते. शुद्र जातीत जन्माला येणे, त्यातही स्त्री

जातीत जन्माला येणे, निरक्षर दासीपण या गोष्टी त्यांच्या दु:खाचे कारण होते आपण उपेक्षित आहोत, खालच्या जातीतीतल आहोत ही जाणीव त्यांनी भक्ती भावाने विठ्ठलाला आपलेसे करून भरून काढली.

आयुष्यात जीवलगांना त्यांनी गमाविले खूप दु:ख अनुभवलेले आहे.

माय मेली, बाप मेला
आता सांभाळी बा
विठ्ठला'॥

असे गाऱ्हाने त्या विठ्ठलाजवळ मांडतात, त्या अनाथ पोरक्या आहेत. हे अनाथपण पंढरपूरच्या दर्शनाने दूर केलेले आहेत. सगळ्या शुद्र जातीच्या जीवनाचे कारुण्य त्यात आले आहे. जनाबाईच्या अभंगात एक प्रकारचे दु:ख आहे.

' देवा केव्हा क्षेम
दासी ।
आपली म्हणोनी जनी
दासी '

असे उद्गार जनाबाई काढतात. आपण खालच्या जातीत जन्माला आलेलो आहे म्हणून त्या विषाद करत बसल्या नाहीत त्यांनी त्यांच्या आत्मविश्वास ढळू दिला नाही त्या स्त्रियांना उद्देशून म्हणतात स्त्री जन्माला म्हणून आलो म्हणून उदास होवू नये.

"स्त्री जन्म
म्हणवूनी न व्हावे
उदास ।
साधुसंता एकसे
केले जनी ॥
संताचे घरची दासी
मी अंकिली ।
विठोबाने दिली
प्रेमकला"3

अनाथ, उपेक्षित शुद्रांना विठ्ठल आपलेसे करतो, असाही त्यांना विश्वास आहे भक्तीला कुठलीही जातपात नसते, धर्म नसतो हे सांगताना त्यांनी संत कबीरांचे ,संत रोहिदासाचे दाखले दिलेले आहेत. नामदेवाच्या आधाराने त्यांनी मार्गक्रमण केले. त्या कठोर सामाजिक वास्तवाला सामोरे जात होत्या.

जनाबाईच्या अनेक अभंगापैकी 'डोईचा पदर आला खांद्यावरी' हा अभंग बोली भाषेतील अभंग आहे. कुलीन स्त्रीची लज्जा संकोच स्त्री सुलभ गोष्टीचा त्यांनी त्याग केला. तिच्या

मनातील अनामिक भावनेचा येथे उद्रेक झालेला आहे. विठ्ठलाला ती प्रश्न विचारते, मनातील दाहकता, अस्वस्थता ती व्यक्त करते. विठ्ठलाशी भांडताना विठ्ठलाला ती फैलावर घेते. जनाबाईला उपेक्षित व्यक्तीबद्दल त्याच्या जीवनाबद्दल ओढ आहे.

"भक्ती ते कठिण
इंगळाची खाई ।
रिघणे त्या डोही
कठिण असे ॥
भक्ति ते कठिण
विषग्रास घेणे ।
उदास पै होणे जीवे
भावे" ॥

संत जनाबाई भक्ती मार्गच प्रमाण मानला आहे. भक्ती हे सर्वासाठी सोपे असे परमेश्वर प्राप्तीचे साधन आहे. कोणत्याही जातीतील-वर्णातील स्त्री-पुरुष भक्तिमार्गाने परमेश्वरापर्यंत पोहचू शकतात. स्त्रियांनीही उदास न होता प्रपंच करीत असताना ही परमेश्वर भक्तीने जीवन सार्थकी लावता येते.

"अरे अरे विठ्या ।
मूळ मायेच्या
कारट्या" ॥

असे म्हणून संत जनाबाई विठ्ठलाला शिव्या देते. जीवनातील खडतर व्याप जनाबाईने भक्तीच्या आत्मबळाने लीलया पार केले. ग्रामीण कष्टकरी स्त्रीचे संत वाङ् मयातील प्रातिनिधिक रूप जनीच्या रूपाने आपल्याला दिसून येते. पुरुषाप्रमाणे स्त्री सुद्धा प्रवित्र असून तीचे मन स्वच्छ आणि निर्मळ आहे. ईश्वराची भक्ती करण्याचा तिलाही हक्क आहे. भक्तीतून ती जीवनाला मुक्ती मिळवू शकते. तिने परंपरेच्या चौकटीत न अडकता अंधकरणातून प्रकाशाकडे वाटचाल केली पाहिजे. घराच्या उंबरठा ओलांडता न येणाऱ्या स्त्रीला सुद्धा भक्ती मुक्ती विरक्ती आणि आत्मज्ञानाची प्राप्ती केली पाहिजे.

**समारोप :-**

स्त्री म्हणून घडताना विठ्ठलाच्या साक्षीने तिने घेतलेले अनुभव चैतन्यमय आहे. स्त्रिची विविध रूपे त्यात आहे. विरह, व्याकुलता, वात्सल्य, मातृत्व अशा कितीतरी चिरंतन भावना

तिच्या अभंगातून अजरामर झालेल्या आहे. तिने आपल्या स्त्री जन्माबद्दल तर लिहीलेच परंतु स्त्रियांना उद्देशुनही ती लिहिते. स्वत:च्या स्त्रीत्वाचा तिला तिटकारा वाटत नाही. वाट्याला आलेल्या स्त्री जीवनाला ती निकोप मनाने सामोरे जाते. स्त्री म्हणून जन्माला आले म्हणून उदास न होता, स्त्री जन्माचे स्वागत केले पाहिजे. जनाबाईनी आपल्या अभंगातून व्यथा वेदना स्वत:च्या स्त्रिपणाबद्दलच लिहिल्या नाही तर इतर ही स्त्रियांना उद्देशून त्या लिहितात. जनाबाईचे अभंग म्हणजे एका स्त्रीमनाचा सहजस्फुर्त अविष्कार होय. जनाबाईनी पोरकेपणा घेऊन जगत असताना समाजव्यवस्थेत उपेक्षा सहन करून आंतरिक मनाने जे अनुभवले त्यातूनच त्यांनी अभंगातून मांडले.

**निष्कर्ष :-**

- नामयाची दासी म्हणून जनाबाईनी स्वत:चा उल्लेख केला.
- खालच्या जातीत जन्माला आलो म्हणून उपेक्षिताचे जिणे त्यांच्या वाटेला आले.
- स्त्री म्हणून जन्माला आले म्हणून उदास न होता, स्त्री जन्माचे स्वागत करावे.
- संत जनाबाईच्या अभंगात बंडखोर वृत्ती दिसून येते.
- ममता, वात्सल्य, विरह, व्याकुलता त्यांच्या अभंगात दिसते.
- जनाबाई स्वत:च्या स्त्रीपणाबद्दलच लिहित नाही तर इतर ही स्त्रियांना उद्येशून लिहितात.
- पहिल्या संत कवयित्री म्हणून त्या संत पदवीला पोहचल्या.

**संदर्भ सूची :-**


1. श्री.श्री.म.माटे : संत, पंत आणि तंत. ( पृष्ठ 24)
2. श्री. शंकरराव खरात : संतांची सामाजिक दृष्टी. ( पृष्ठ 53)
3. श्री.रा.तु.भगत : संत साहित्य आणि दलित संवेदन .
4. श्री.ग.बा.सरदार : संत वाङ्मयाची सामाजिक फळश्रृती.


***

# संतांचे सामाजिक उत्तरदायित्व : एक शोध

**संशोधक विद्यार्थी : प्रा. अमोल ठाकरे**
**मार्गदर्शक : डॉ. शोभा रोकडे**
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

**प्रस्तावना :-**

मराठी साहित्याला आणि समाजाला मुख्य धारेच्या प्रवाहात आणण्याचे श्रेय संतांना देता येते. यांचे कारण साहित्याच्या माध्यमातून संतांनी समाजाला जागृत केले. संतांनी आपल्या वाणीच्या, लेखणीच्या आणि कृतीच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाचे कार्य केले. समाज, संस्कृती व भाषा यांचा केंद्रबिंदू संत आहे. समाजाला समतोल अश्या भाषेत संतांनी जनजागृती केली. रूढी , प्रथा व परंपरा यावर प्रहार संतांनी केला. लहान , थोर, उच्च-निच या सर्वांना भक्तीचा अधिकार आहे. समाजाला वाईट प्रवृत्तीपासून दूर करून भक्तीच्या मार्गी लावणे .हे संतांचे कार्य होय . इ . स. १३ व्या शतकापासून महाराष्ट्राला वारकरी संप्रदायातील ज्ञानेश्वर , नामदेव , एकनाथ व तुकाराम इत्यादी थोर संतांची परंपरा लाभली आहे. या संतांच्या निवडक अभंग ओव्यांचा माध्यमातून संतांचे सामाजिक उत्तरदायित्व सांगण्याचे प्रयत्न येथे केलेला आहे.

महाराष्ट्र ही संतांची भूमी; त्यामुळे संतांच्या साहित्याच्या परिणाम समाजावर होणे साहजिकच होते . संतांच्या साहित्यामुळे महाराष्ट्रातील समाजाच्या सर्वांगीण विकास होण्यास सहाय्यक ठरले आहे . म्हणजे मराठी संस्कृतीमय रथाचे वाहक जर कोणी असेल तर ते संत होय . मराठी साहित्याच्या उगम तेराव्या शतकातील संत साहित्यापासून झाला. तेव्हापासून समाजाच्या प्रगतीची धुरा सक्षमपणे संतांनी आपल्या खांदयावर वाहली आहे. समजातील तळागाळातील लोकांना प्रवाहाच्या मुख्य धारेशी जोडण्याची एक अलौकिक शक्ती संतांच्या साहित्यात आपणास दिसते . त्यामुळे समाज हा केंद्रबिंदू डोळ्यासमोर ठेऊन त्याभोवती संतांचे वाड्मय आपणास दिसते . थोडक्यात सकलजनांची उन्नती हीच संतांची कृती , कर्तव्य आपणास दिसते .

"संत , साहित्य आणि समाज " हे परस्पर संबंध आपण पाहतो ; त्यावेळी आपल्या समोर येतात ज्ञानदेव - नामदेव -

एकनाथ - तुकाराम ज्यांनी भागवत धर्माची पताका आपल्या खांदयावर सक्षम पेलली आणि बहुजनांना अज्ञानरूपी अंधकारातून प्रकाशाकडे मार्गस्थ करण्यास वाटाडे म्हणून उभे राहले . संतांची शिकवण आजही आपणास दीपस्तंभासारखी दिसते;ज्यामधून समाजमध्ये समन्वय साधण्याचे काम या संतांनी आपल्या साहित्याद्वारे केले आहे . त्याचे प्रबळ उदाहरण म्हणजे संत ज्ञानेश्वराची " ज्ञानेश्वरी " होय . वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षात ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहून सर्वसामान्य लोकांना ज्ञानाचे दालन खुले करून दिले ; आणि शेवटी पसायदानाचा माध्यमातून संतांचे हृदय काय असते हे आपणास दिसते .

"आता विश्वातमेके देवे ! येणे
वाग्यज्ञ तोषावे !!
तोषोनि मज द्यावे ! पसायदान हे
।।१।।"
" खळ्यांची व्यंकटी सांडो । तया
सत्कर्मी रती वाढो ।।
भूत परस्परे पडो । मैत्र जीवांचे
।।२।।

उदात्त अंतःकरणाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे ज्ञानेश्वर माऊली होय बहुजनांच्या प्रगतीचे मागणे व या पसायदानाचा अंतर्गत मागतात त्यामुळे त्यांना माऊली सुद्धा म्हटले जाते.

संत साहित्याचा दुसरा अविष्कार म्हणजे संत नामदेव महाराज होय. ज्यांनी वारकरी संप्रदाय पताका अटकेपार नेली आहे. आपली कीर्तनकलेमुळे ते महाराष्ट्रात नव्हेतर संपूर्ण भारतभर त्यांनी वारकरी संप्रदायचा प्रचार केला. उद्देश हाच की जो समाज मागासलेला आहे . त्याची प्रगती साधने होय. त्यामुळे संत नामदेव महाराजांचे साहित्य मानव कल्याणकारी असलेले साहित्य होय.

"नामा लागे श्वाना पाठी ।
तूप घ्याहो जगजेठी ।।"

संतांचे अंतःकरण कसे असते ते आपणास दिसते. मानवी उद्धारासोबतच प्राणीमात्रावर प्रेम सुद्धा करायला नामदेव महाराज अपनी सांगतात.

"नाचू कीर्तनाचे रंगी ।
ज्ञानदीप लावू जागी ।।"

अतिशय प्रतिकूल परिस्थिती मध्ये भावनिक एकात्म जपानचे काम संत ज्ञानदेव महाराजाने केले. आपल्या कीर्तनरूपी सेवेमधून समाजजागृतीचे काम त्यांनी केले. संत साहित्याचे तृतीय अविष्कार म्हणजे संत एकनाथ महाराज ज्यांनी आपली "भारूड " या वांङ्मयातून समाजप्रबोधनाचे मोलाचे काम केले. समाजाला एकसंथ ठेवण्यात महत्वाचे योगदान संत नामदेव महाराज यांचे आहे . आपल्या अभंग , काव्य आणि भारुडाद्वारे समाजातील अंधश्रद्धा निर्मूलन करण्याचे कार्य संत एकनाथ यांच्याकडे जाते. संतांनी आपली लेखणीचा उपयोग समाजाच्या उद्धार करण्यासाठीच केला यात तिळमात्र शंका नाही.

"मला दादला नलगे बाई।
मला दादला नको बाई ।।"
"भूत लागले ध्रुव वाळाला।
उभा अरण्यात ठेला ।।"

अतिशय सध्या सरळ विनोदी भाषेतून नामदेव महाराज समाजजागृतीचे कार्य करायचे त्यातून समाज मुख्य प्रवाहाशी जोडला जात होता . संत श्रेष्ठ , संत शिरोमणी , जगतगुरु समाजाच्या विकासाचा संघर्षपूर्ण प्रवास आपणास दिसतो . तुकारामाच्या साहित्य समाज परिवर्तन करण्यासाठी , समाजाच्या उद्धारासाठी मैलाचा दगड प्रस्तापित होते. त्याच्या साहित्यामधून समाजाचा विकास साधण्याचे मार्ग आपणास दिसतात.

"नको नको मन गुंतू माया जाळी ।
काळ जावळी ग्रासावया ।।"

मानवी मनाला तुकारामांनी दिलेला सल्ला आहे. मोहाच्या पाशात तुझी सुटका करायला कोणी येणार नाही.

" अर्थ लोपली पुराणे ।
नाश केला शब्दशः
विषय लोभी मन । साधले बुडविली ।।

संत तुकाराम महाराज भक्तीच्या मार्गातून समाजसेवा , समाजाचा विकास साधतांना आपल्याला दिसतात.

संतांच्या साहित्याच्या परिणाम मानव समजावर झाला . त्यामुळे संत वाङ्मयासोबत समाजाची प्रगती होत गेली . त्यामधून सर्वसामान्यांना विकासाची द्वारे

खुली झाली. त्यामधून समाजाचा विकास होत गेला.

**समारोप:-**

संतांचे साहित्य हे समाजाच्या कल्याणाचे द्वार आहे. या अमृतरूपी महासागरात भक्तीरूपी डुबकी घेतल्यावर भवसागर पार झाल्याशिवाय राहणार नाही. संतांचाही दृष्टीने जर पाहण्याचा प्रयत्न केला तर समाजाचे दुःख दूर झाल्याशिवाय राहणार नाही. संतांच्या समोर समाजहित हेच सर्वोपरी होते. संतांचे साहित्य हे मानवजातीतील संकटात वाटाड्या म्हणून नक्कीच काम करत राहणार यात तिळमात्र शंका नाही. संतांच्या या काव्यातून "जागा आणि जगू द्या "हि भावना साकार होते. अशाप्रकारे समाजाच्या उद्धारासाठी संतांची शिकवण त्यांचे साहित्य नेहमीच प्रेरणादायी ठरेल.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) मांडवकर पवन - संत साहित्य , सेवा प्रकाशन अमरावती
२)सुंठणकर वा. र.- महाराष्ट्र संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य - पॉप्युलर प्रकाशन मुंबई
३)सावरकर सुभाष - संत वाङ्मयाचे जनसाहित्य मूल्य - मराठी जनसाहित्य परिषद

** ** **

# वैदर्भीय भाव कविता : एक अवलोकन (कविवर्य सुखदेव ढाणके यांच्या संदर्भात)

**संशोधक विद्यार्थी : प्राची देवानंद गोरडे**
**मार्गदर्शक : डॉ. शोभा रोकडे**
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

**प्रास्ताविक :-**

वैदर्भीय कविता ही अतिशय समृद्ध आहे. तिला स्वतंत्र अनुभवविश्व आहे. ती कमालीची कलात्मक उंची गाठणारी असून आशयाचा मोठा अवकाश पेलणारी आहे. मराठी कवितेत वैदर्भीय कविता ही आपल्या वैशिष्ट्यपूर्ण काव्यगुणांनी व वेगळेपणाने उठून दिसते.

साठोत्तरी काव्यामध्ये वैदर्भीय कवितेचे योगदान फार महत्त्वपूर्ण आहे. वैदर्भीय कवितेने विचार आणि रचना या दोन्ही दृष्टीने समग्र काव्यप्रवाहाला महत्त्वाची देणगी दिलेली आहे. साठोत्तरी वैदर्भीय कवितेने कविताप्रवाहात आशावादाचा, मानवतेचा, क्रांतीचा दीप उजळला. स्वातंत्र्योत्तर वैदर्भीय कवितेतील

अग्रपूजेचा मान कवी अनिल आणि शरदच्चंद्र मुक्तिबोध या दोघांना द्यावा लागेल. यांनी या कवितेला परंपरेचे सांकेतिक रूप येऊ न देता नवतेचे संमजस भान दिले व नवीन दिशा मिळवून दिली. व्यक्तिवादी मूल्यापेक्षा सामाजिक पातळीवरील क्रांतिप्रवणता वैदर्भीय कवितेतून अभिव्यक्त होताना दिसते.

साठोत्तरी काव्यामध्ये वैदर्भीय भावकवितेने आपले एक मानाचे स्थान प्राप्त केलेले आहे. साठोत्तरी काव्यामध्ये भावकवींचे एक वेगळे वळण, वेगळ्या प्रेरणा, वेगळ्या प्रवृत्ती विकसित झाल्या. भावकाव्याच्या परंपरेत मूलतः आपली काव्यनिर्मिती करीत असताना काही चिंतनशील कवींनी आपले वेगळेपण जपण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. ज्यांनी भावकाव्याला एक नवा साज आणि नवा बाज प्राप्त करून दिला. अशा कविवर्य ना.घ. देशपांडे, म.म. देशपांडे, सुरेश भट, कवी ग्रेस, मधुकर केचे, तुळशीराम काजे, श्रीधर शनवारे, वसंत आबाजी डहाके, वामन निंबाळकर, यशवंत मनोहर, सुधाकर गायधनी, विठ्ठल वाघ, उ.रा.गिरी, नारायण कुलकर्णी कवठेकर, यांच्या नावाचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. १९६० नंतरच्या आगेमागे अनेक नवे कवी विदर्भात उदयाला आले. या कवींनी भावकाव्याला अलंकृत करून एका अनोख्या वातावरणाची अनुभूती देवून शब्दांचा नाद, स्पर्श, रूप, रस, गंध या भाववृत्तीचा सोहळाच साजरा केला. सुरेश भट यांनी गझल हा गीत काव्यप्रकार मराठीत जाणीवपूर्वक हाताळून वैदर्भीय कवितेला वैशिष्ट्यपूर्ण स्थानी उभे केले. याच काळात याच धर्तीवर लेखन करणारे व भावकाव्याला नव्याने आयाम देणारे काही महत्त्वपूर्ण कवी उदयाला आले. त्यात कविवर्य शिवा राऊत, सुखदेव ढाणके, देवानंद गोरडे, बबन सराडकर, रमेश मगरे यांची कविताही पुढे आली व ती अनेक काव्यगुणांनी लक्षवेधी ठरली. जीवनानुभवातून आलेल्या या कवितेने आपल्या भावविश्वाबरोबरच मानवता आणि समाजप्रवणताही जपली.

व वैदर्भीय कवितेला नवी दिशा मिळवून दिली. ती अनेक काव्यगुणांनी विशिष्ट्यपूर्ण राहिली. ही कविता अलंकृतता, अलौकिकावरील श्रद्धा, असीमाचे आकर्षण, आध्यात्मिक वृत्ती ह्या विशेषामुळे महत्त्वाची ठरली. केचेंची अल्पाक्षरी वृत्ती संतकाव्याला जवळची असल्यामुळे अभंग ओवीचे माध्यम घेवून अवतरली. तिने मराठी कवितेला एक लेणेच बहाल केले. याच धर्तीवर अभंग ओवींचे बोट धरून पुढे तुळशीराम काजे, शिवा राऊत, सुखदेव ढाणके, बबन सराडकर यांनी आपल्या कवितेचा प्रगल्भतेने अविष्कार केलेला दिसतो.

## विषयाची निवड / उद्देश व भूमिका :-

मराठी कवितेत वैदर्भीय कवी सुखदेव ढाणके यांची भावकविता ही आपल्या वैशिष्ट्यपूर्ण काव्यगुणांनी व वेगळेपणाने उठून दिसते. वैदर्भीय भावकाव्याला नव्याने आयाम देणारे कवी सुखदेव ढाणके यांची कविता मला विशेष भावली. ही अभ्यासण्याचे कारण की, यातील भावसौंदर्य व काव्यसौंदर्य मला विशेष भावले. तसेच या कवीने काव्याचे सर्वच प्रकार हाताळले. यांची कविता सुंदर भावकविता म्हणून जन्माला आली. सृजनशील अभिव्यक्तीने समृध्द झाली. अस्सल जीवनानुभवांनी चैतन्यदायी ठरली. भावबंधातील हे चैतन्य वेगवेगळ्या रुपबंधातून उलगडून दाखविण्याचा जो प्रयत्न या कवीने केलेला आहे त्याचा सर्वांगीण दृष्टीने अभ्यास करणे मला विशेष महत्त्वाचे वाटले. तसेच या कवीची कविता ही वैदर्भीय कवितेतील महत्त्वाचा टप्पा असल्याची जाणीव प्रकर्षाने झाली. शैलीच्या दृष्टीनेही या कवितांचा स्वतंत्र असा बाज आहे. हा बाज समकालीन कवितेपेक्षा वेगळा कसा हे उलगडून दाखविण्याचा प्रयत्न मी या लेखात करणार आहे हीच संशोधनामागील भूमिका आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे :-

1. सुखदेव ढाणके यांची कविता ही सर्वार्थाने समृध्द आहे ही कविता आशयाचा मोठा

अवकाश पेलणारी आहे. हा आशय अभिव्यक्तीच्या दृष्टीने उलगडणे व तिच्यातील काव्यरुपांचा शोध घेणे.

2. सुखदेव ढाणके यांची अविष्कारशैलीही कलात्मक उंची गाठणारी आहे. तिचे स्वरूप प्रतिमा प्रतिकांच्या साह्याने उलगडणे.
3. आकृतीबंधाच्या दृष्टीने ही कविता सर्व रुपबंधाचे संकेत पाळणारी आहे. कवितासंग्रहातील अभंग, ओवी, छंदवृत्तबध्दकविता, रुबाया, हायकू, मुक्तते इ. काव्यप्रकारांचा शैलीच्या अनुषंगाने अभ्यास करणे व कवितेचा रूपबंध उलगडणे.
4. या कवितांमधील सामाजिक जाणीव, प्रेमाविषयक जाणीव, निसर्गविषयक जाणीव कृषीविषयक जाणीव, इत्यादीचे स्वरूप तपासून त्यातील आशयसत्याचा शोध घेऊन चिकित्सक अभ्यास करणे.
5. या कवितांमधील सामाजिक जाणीव ही मानवतावादी मूल्यांची जपवणूक करताना दिसते. ह्या मूल्यांचा शोध घेणे.
6. ह्या कवींची बहुतांश कविता ही भावकविताच आहे. ह्या कविता रुपगंधनादस्पर्श या अनोख्या भावसौंदरर्याची प्राचिती करून देतात. तिच्यातील भावसौंदर्य व काव्यसौंदर्य उलगडणे.
7. साठोत्तरी कविताप्रवाहात व वैदर्भीय समकालीन कवितेत या कवितांचे महत्त्व व स्थान अधोरेखित करणे व तिचे वेगळेपण सिध्द करणे हा संशोधनाचा उद्देश आहे.

**सुखदेव ढाणके यांची कविता : वैदर्भीय भावकवितेचा मानदंड**

कविवर्य सुखदेव ढाणके यांचे चार काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. त्यात १) 'व्यथाफुली' (१९८३) २) 'रक्तसेतू' (१९९७) ३) 'हुर्दुक' (२००४), ४) 'पिंडपात' (२०१५),

या काव्य संग्रहातील कवितांचे रसग्रहण केले असता काही महत्त्वाचे वैशिष्ट्ये, वेगळेपण प्रकर्षाने दिसतात.

**भावनोत्कटता व भावसौंदर्य :**

कवितेतील भावनोत्कटता व भावसौंदर्य हे लक्षवेधी आहे. कवीनी आपल्या भावनांचा अविष्कार फार उत्कटपणे केलेला आहे. 'व्यथाफुली', 'रक्तसेतू' हे काव्यसंग्रह त्याची मूर्त उदाहरणे आहेत. कवितेविषयी लिहिताना कवीची काव्यदृष्टी व काव्यप्रेरणा फार महत्त्वाची असते. ढाणके आपल्या कवितेची व्याख्या ‘उत्कट भावनांचा उत्स्फूत उद्रेक म्हणजे कविता’ अशीच करतात. त्यांच्या कविता म्हणजे काय ? तर ‘रक्तावर आलेली विस्तवाची साय’ ह्या ओळी किंवा “कविता ही कवीची लेकबाळ असते. ठसठसणा-या वेदनेचा गर्भ असते. तिचा जन्म काळजाच्या आंतरप्रदेशातील दुखःकोशातून होत असतो. कवितेच्या जन्माचा क्षण हा कवीसाठी प्रदीर्घ अग्नीप्रवासासारखा असतो. कविता हा नैसर्गिक व्यवहार आहे.” तसेच “कविता ही माझ्या आयुष्याला जडलेली दुर्धर व्याधी आहे. देहअस्ता बरोबरच या व्याधीचाही अस्त व्हावा”. असे कवीने 'हुर्दुक' च्या प्रस्तावनेत म्हटले आहे. हीच त्यांची काव्यदृष्टी व काव्यप्रेरणा आहे.

‘अंतरीचे धावे / स्वभावे बाहेरी’ या तुकारामाच्या वचनाप्रमाणे त्यांची कविता आहे. त्यांच्या कवितेचा विषय म्हणजे वास्तववादी जगणे, वाट्याला आलेले भोग, अनुभवाचे संचित हे आहेत. म्हणूनच कवी म्हणतात,

‘मी द्रारिद्राच्या
सम्राटाचा वंशज
सार्वभौम दुःखाचा
अधिपती
मी यातनांच्या
सलतनीचा सुलतान
भुके कंगालांचा
चक्रवर्ती’

कुठल्याही कलाकृतीमागे त्या त्या कलावतांची एक निश्चित भूमिका असते. अनुभवाचा अस्सलपणा असतो. ढाणकेच्या कवितेत प्रेम ही एक प्रेरक शक्ती आहे. सनातन तत्त्व आहे. नाते कुठलेही असो. त्याला प्रेमाचे अधिष्ठान असते. ढाणकेच्या कवितेतील हे तत्त्व कवितेला भावकाव्याच्या अत्युच्च पातळीवर नेऊन ठेवणारे आहे. म्हणूनच ढाणके त्यांच्या ‘हुर्दुक’ काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत ते

म्हणतात ‘कविता या संस्कृतीला जोडणारा ‘भावसेतू’ होय’. हा भावसेतू त्यांनी प्रत्येकच कवितेमध्ये बांधलेला आहे.

‘गर्भारली दीपकळी
पोटी वत्सल प्रकाश
मंद मायेच्या भाराने
खाली लवते
आभाळ’

त्यांची कविता इथेच भावगर्भ होते व त्यातून सृजनाचा जन्म होतो.

‘टाकते उसासे
क्षीण तेलवात
सले प्राणातून
अबोली पहाट’

अशी आशयगर्भ कविता हा कवी आपल्याला देतो.

**कवितेतील जाणीवदर्शन : -**

सुखदेव ढाणकेच्या कवितेतील अनुभव व्यक्तिनिष्ठ असला तरी त्याची अभिव्यक्ती ही सामाजिक पातळीवर होताना दिसते. म्हणून ही कविता लक्षवेधी ठरते. ‘ रक्तसेतू' संग्रहात कवी म्हणतो,

‘रांडकी जिंदगी ।
उजाड कपाळ
प्राक्तनाची नाळ ।
सडलेली
इथे आयुष्याचे ।
नित्याचे पवाडे
स्थगित निवाडे ।
भाकरीचे’

त्यांचा 'पिंडपात' हा संग्रह कृषी व ग्रामीण जीवनदर्शनाचे एक अतिशय बोलके उदाहरण आहे. शेतक-याच्या व्यथेची जाणीव या संग्रहातून व्यक्त होते. पुढील ओळी त्याचेच द्योतक मानावे,

‘देते कणगी जांभई ।
जाते पडले खुडूक
मेली केव्हांची
भाकरी । आले चुलीला
सुतुक’

स्वतंत्र शब्दसृष्टी व अर्थवाहीपणा ते त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. त्यांचा 'रक्तसेतू' हा काव्यसंग्रह वैदर्भीय कवितेतील मानदंड आहे. म्हणूनच वामन तेलंग म्हणतात ‘सुखदेवच्या वाटचालीमुळे विदर्भाची कविता मोठी झाली आहे.’

संवेदनक्षम कवितेत समाकलन, संश्लेषण व समन्वय हे तीन घटक महत्त्वाचे असतात.

ढाणके यांची कविता या तिंन्हीचे उदाहरण आहे. ती संवेदनाच्या अंगाने जाणारी संज्ञाप्रवाही कविता आहे. 'या कवितेची नाळ मर्ढेकरापासून पु. शी रेगेच्या कवितेशी जुळणारी असली तरी तिच्यावर कुणाचाही पगडा किंवा प्रभाव नाही. साम्यदर्शन फक्त तरलतेच्या संदर्भात आहे. 'हुर्दुक' चा चेहरा पूर्णत: स्वत:चाच चेहरा आहे. हे निविर्वाद पणे सांगता येते.' असे 'परामर्ष' च्या समीक्षेमध्ये राम देशमुख म्हणतात.

'घनदाट तुझ्या इच्छांचे । हे
उरले केवळ धुके
सर्पाच्या कातीवाणी ।
देहाला आपण परके'

असा आशयसंघटनेचा विचार हुर्दुक' मध्ये आहे.

'घालू नको आता ।
आषाढाची आण
शाकारले उन्ह ।
देहावरी
देऊ नको मला ।
फुलातला वाटा
काळजात काटा ।
फुलवतो'

'रक्तसेतू' मध्ये आत्मभानाचा प्रकाश आहे. तसा आत्मसंवादही आहे. आपला प्रवास हा अधांतरी आहे हे कवीने समजून घेतले आहे पण तरीही 'क्षितीज तोलून बांधला मी रक्तसेतू!' असे कवी म्हणतो

ढाणके यांच्या कवितेतील जाणीव हे आक्रोशी नाही. ही जाणीव संमजस आहे. 'जिनंगानीचा चिव्वट कोळी गुंफिल पुन्हा सांद कोपरा' अशी आहे. म्हणून त्यांच्या कवितेतील अध्यात्मिक वृत्ती संतजाणिवेला कवेत घेते. 'असुवनजल सींच सींच प्रेमबेल बोई' अशी फुलारुन अभंग ओवीतून सारे ताण ओलांडून संतजाणिवेला मिठी घालू शकली आहे.' असे आशा सावदेकर म्हणतात.

ढाणके यांची कविता हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. कवितेतील जाणीवदर्शन इतके प्रांजळ आणि वास्तविक आहे की त्यांनी भोगलेल्या, जगलेल्या आयुष्याची कविता झाली. कवीची वास्तववादी जीवनजाणीव, प्रेमजाणीव, निसर्गजाणीव, सामाजिक जाणीव

तसेच संतजाणिवेचे अविष्करण हे फारच उत्कट व प्रामाणिक आहे. ढाणके यांच्या कवितातून होणारे ग्रामीण जीवनदर्शन, कृषीदर्शन, व्यक्तीदर्शन हे फारच अस्सल असून त्यात सर्वसामान्यांच्या जीवनाचे प्रतिबिंब दिसून येते. व त्यातूत व्यक्त होणारा मूल्यभाव हा फारच उद्बोधक आहे.

**सारांश :-**

एकंदरीत सुखदेव ढाणके यांची कविता ही प्रयोगशीलता, वैचारिकता, भावपरता, चिंतनपरता यात रमलेली अशी व्यामिश्र कविता आहे. तसेच वैदर्भीय वातावरण, वैदर्भीय बोली, नव्याजुन्या संस्कृतीच्या पाऊलखुणा या कवितेत आहे. ती अनेक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण अशी कविता आहे. मराठी कवितेत या कवितेचे स्थान व महत्त्व मोलाचे आहे. ढाणके यांच्या कवितांचे अवलोकन केले असता काही महत्त्वाचे विशेष, वैशिष्ट्ये व वेगळेपण जाणवते. कवीची काव्यदृष्टी, काव्यप्रेरणा, आशय अभिव्यक्ती, कवितेचा आकृतीबंध शैलीआविष्कार असे अवलोकन करून त्यातील वेगवेगळ्या काव्यजाणिवांचा शोध घेण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. या कवीच्या सर्वच काव्यजाणिवा किती प्रगल्भ आहे याची प्रचिती येते. मग ती प्रेमकविता, निसर्ग कविता, सामाजिक कविता असो. तसेच कवितांमधील जाणीवदर्शन अत्यंत सच्चे आहे असे जाणवते. वास्तववादी जीवन जाणीव, सामाजिक जाणीव, संतजाणिवेचे अविष्करण कवितेतील कृषीदर्शन, ग्रामीण जीवनदर्शन, व्यक्तीदर्शन यांचा चिकित्सक अभ्यास करून माझ्या संशोधनाला एक नवा आयाम व नवी दिशा देण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे .

**निष्कर्ष :-**

१) ही कविता आशयाचा मोठा अवकाश पेलणारी आहे. या दृष्टीने शोधनिबंधाची चिकित्सक मांडणी यशस्वी ठरते.

२) ढाणके यांची कविता ही भावकविताच आहे. ह्या कविता रुपगंधस्पर्शनाद या अनोख्या भावसौंदर्याची प्रचिती करून देतात.

३) आकृतीबंधाच्या दृष्टीने ही कविता सर्व रुपबंधाचे संकेत पाळणारी आहे.
४) ह्या कवितेतील आशय, अभिव्यक्ती अतिशय समृद्ध आहे. तसेच ती आत्मशोधाची कविता आहे.
५) या कवितांमधील सामाजिक जाणीव ही मानवतावादी मूल्यांची जपवणूक करताना दिसते.
६) आज जीवन मूल्यांचा होत चाललेला ऱ्हास, खेडे व शहरे यातील वाढत्या समस्या, शेती, शेतकरी त्यांचे प्रश्न व अन्नधान्याच्या समस्या, पाणी टंचाई अशा अनेक बाबींचे चित्रण या कवितांमधून होते. त्या अनुषंगाने मानवी मूल्यांची जपवणूक तसेच मानवासाठी उज्ज्वल भविष्याचा आशावाद ही कविता देते.
७) साठोत्तरी कविता प्रवाहात ही कविता आपल्या वैशिष्ट्यपूर्ण काव्यगुणांनी उठून दिसते म्हणून या कवितांचे महत्त्व व स्थान अधोरेखित करणे व तिचे वेगळेपण सिद्ध करणे हे गृहीतकार्यच आहे.

**संदर्भसूची :-**


1. रा. ग. जाधव, 'साठोत्तरी मराठी कविता व कवी' साकेत प्रकाशन, औरंगाबाद. प्र. आ. १९९५
2. सावदेकर आशा, 'कविता विदर्भाची' (संपा) विदर्भ साहित्यसंघ नागपूर प्र.आ. १९९१
3. देशमुख राम, ‘परामर्ष’ सर्वमंगल प्रकाशन, अमरावती, प्रथम आवृत्ती, २००८
4. ढाणके सुखदेव, 'व्यथाफुली', सर्वमंगल प्रकाशन, अमरावती, व्दितीय आ, नोव्हें २०१४
5. ढाणके सुखदेव 'रक्तसेतू' , शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती १९९७
6. ढाणके सुखदेव 'हुर्दुक' , शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती २००४
7. ढाणके सुखदेव 'पिंडपात',काव्याग्रह प्रकाशन, वाशिम, प्र.आ. २०१५
8. शिलेदार प्रफुल्ल, (संपा) 'युगवाणी', विदर्भ साहित्य संघ, नागपूर १९९५

9. ढाणके सुखदेव (संपा), 'सर्वधारा', अमरावती २००७
10. सावदेकर डॉ. आशा, तरुण भारत, दि. १४-०२-१९९९
11. तेलंग वामन, तरुण भारत, दि. ०९-११-१९९७

** ** **

# 'आळ ' या कथासंग्रहातील ग्रामीण विश्व

**संशोधक विद्यार्थी : प्रांजली हरिहरराव पेंदामकर**

**मार्गदर्शक : डॉ. शोभा रोकडे**

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती


**प्रस्तावना:**

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यात जे अनेक प्रवाह निर्माण झाले त्यात ग्रामीण साहित्य हा नवा प्रवाह मानला जातो. ग्रामीण साहित्याने मराठी साहित्यात संख्यात्मक व गुणात्मकदृष्ट्या अतिशय मोलाची भर घातली. एक नवा आशय, जीवनाचे नवे क्षेत्र या साहित्याने खुले करून दिले. खऱ्या अर्थाने मराठी साहित्याला समृद्ध केले. या काळात शिक्षणाचा प्रचार व प्रसार खेड्यापाड्यापर्यंत पोहोचला. समाजाच्या तळागाळातील लोक जागे झाले. या नवशिक्षित समाजातील खेड्यातील, दुर्लक्षित समाजातील अस्पष्ट जाणिवा जमेल तश्या शब्दात लेखनबद्ध केल्या जाऊ लागल्या. ग्रामीण जीवन, कष्टकऱ्यांचे कष्टप्रद जगणे, त्या जगण्यातील दंतुर व्यथा, वेदना साहित्यातून व्यक्त झाल्या. कथा, कादंबरी, कविता यासारख्या माध्यमातून या अवघड जाणिवांना कलात्मक आकार देण्याचे कार्य बाजीराव पाटील, आनंद यादव, वासुदेव मुलाटे, रा.र. बोराडे, उद्धव शेळके, मनोहर तल्हार, बहिणाबाई, विठ्ठल वाघ, प्रतिमा इंगोले इत्यादी अनेक साहित्यकारांनी केले. याच लेखन परंपरेतील तिसऱ्या पिढीतील ग्रामीण साहित्य चळवळीतील एक अग्रगण्य नाव म्हणजे ग्रामीण वऱ्हाडी बोलीतील कथा लिहिणारे कथालेखक डॉ. सतीश तराळ हे होय. त्यांचे आळ, आग, लढा, व गारपीट हे कथा संग्रह प्रसिध्द झाले असून कथाकथनकार म्हणूनही उभ्या महाराष्ट्राला परिचित आहे. त्यांच्याच 'आळ' या कथा संग्रहातील ग्रामीण विश्वाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधामध्ये करण्यात आला आहे.

**ग्रामीण साहित्य:**

'ग्रामीण' या शब्दाचा संबंध ग्रामाशी आहे. 'ग्राम' म्हणजे खेडे 'ग्रामीण' ही संज्ञा वापरत असताना तिची ग्रामजीवन संबद्धता स्पष्टपणे नजरेत येईल. कोणत्याही प्रदेशातील एक किंवा एकाहून अधिक खेडी एखाद्या साहित्यकृतीत साक्षात होत असतील तर त्या साहित्यकृतीला 'ग्रामीण' म्हणता येईल. येथे समग्र प्रदेशांऐवजी 'ग्रामजीवन' हेच केंद्रस्थानी असेल. यात त्या खेड्याचे समूह जीवनचित्रण समाविष्ट होऊ शकेल. खेड्यात म्हणजेच गावगाड्यात राहणारी माणसे, त्यांचे जीवन, कृषीकेंद्रितता, रूढी, परंपरा, सण-उत्सव, शेतीशी निगडित प्राणी, तसेच व्यवसायाचे वर्णन ग्रामीण साहित्यातून प्रकट होते. ग्रामीण साहित्य या शब्दाचा अर्थ विषद करताना डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, "ग्रामीण साहित्य हे वेशीच्या आतील आणि वेशीच्या बाहेरील, गावातील व गावबाहेरील अशा माणसांच्या जाणीवा व्यक्त करणारे काव्य आहे" ग्रामीण जीवनातील ताणतणाव, मानवी भावबंध, त्यातून निर्माण होणाऱ्या जाणिवांना डॉ. मुलाटे महत्त्व देताना दिसतात. गुंदेकर यांनी ग्रामीण साहित्य शब्दाचा अर्थ विषद करताना जाणिवा ऐवजी अस्सल जीवनदर्शन हा शब्द प्रयोग करून त्याला अधिक व्यापक रूप दिले आहे. त्यांच्या मते "ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामिणांनी अस्सल जीवनदर्शन घडविणारे देशी वळणाचे साहित्य". गुणदेकरां प्रमाणेच नागनाथ कोतापल्ले यांनीही ग्रामीण जीवनाला महत्त्व दिले आहे. त्यांच्या मते "ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य". येथे ग्रामाला महत्त्व देऊन ग्रामातील जनजीवन व वास्तवाला ग्रामीण साहित्याचे मूलाधार मानले आहे.

ग्रामीण साहित्यात गावातले समाज, जीवन, निसर्ग, शेती, प्राणी यांचे चित्रण आढळते ते सर्व निसर्गाशीच निगडित असते. त्या साहित्यकृतीमधील वातावरणरम्य घटना, प्रसंग गावातले असतात. म्हणून या साहित्य कृतीला ग्रामीण साहित्य म्हणता येते. यासंदर्भात मोहन भागवत म्हणतात, "एखाद्या

साहित्यकृतीमध्ये प्राधाण्याने गावातले असे काही चित्रित झाले असेल त्या साहित्य कृतीला 'ग्रामीण साहित्य ही संज्ञा देता येईल. ग्रामीण जनजीवन वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे मोलाचे कार्य ग्रामीण साहित्याने केलेले आहे. नागर संस्कृतीपासून भिन्न असलेला व स्वतःही समृद्ध संस्कृती जोपासणारा ग्रामीण समाज, त्यांची सुख-दुःख, रूढी, परंपरा, लोकभाषा, दारिद्र्य, प्रेम इत्यादींचे अनुभवलेले वास्तविक चित्रण ग्रामीण साहित्यातून समाजाभिमुख झाले.

एकूणच ग्रामीण साहित्यात बाह्य वास्तव्य हे खेडे, निसर्ग आणि पारंपारिक मूल्ये यातून घडलेले ग्रामजीवन आहे. त्यात आलेली संवेदनशीलता त्या जीवनातील अनुभवाविषयीच्या प्रतिक्रिया देत असते. साहित्य निर्मितीच्या बुडाशी असलेली ही 'ग्रामीण' संवेदनशीलता ग्रामीण साहित्याच्या मुळाशी असते. थोडक्यात 'ग्रामीण' जनजीवनाचे ग्रामीण संवेदनशिलतेचे चित्रण ज्या साहित्यातून चित्रित होते ते ग्रामीण साहित्य होय. यातील 'ग्रामीण' हे विशेषण खेडे, खेड्याशी संलग्न असलेले कृषीजीवन, शेतीशी निगडित व्यवसाय खेड्यातील जनजीवनाचे कष्ट, हर्ष, दुःख, रूढी, परंपरा, संस्कृती या साऱ्याचा निर्देश करते.

**कथा संकल्पना व स्वरूप:**

'कथा' हा कथात्मक साहित्याचा एक प्रकार आहे. 'कथन करणे' हा मानवाचा स्थायीभाव आहे. मनातील हर्ष, खेदादी, भावनांचे प्रकटीकरण केल्याशियाय मनुष्याला राहवत नाही. त्याच्या या आविष्काराच्या गरजेतून आणि स्वानुभूतीच्या आविष्काराच्या अपरिहार्यतेतून 'कथा' जन्मास आली. कथा हा अत्यंत प्राचीन साहित्य प्रकार आहे. कथा हा शब्द 'कथा' या संस्कृत धातूपासून बनला आहे. त्याचा 'अर्थ सांगणे' वा 'वर्णन करणे' असा होतो. जिज्ञासापूर्ती, रंजन, कुतूहलपूर्ती, उपदेश, बोध, संस्कार, धर्मप्रचार, तत्त्वचिंतन हे कथेचे प्रमुख हेतू आहे. गोष्ट, कथा,कहाणी पुरानिकाची निरुपणे, दृष्टांत इत्यादी स्वरूपात कथा आढळते. कथेविषयी वि.स. खांडेकर म्हणतात "कथा ही

माणसाची भावनात्मक भूक आहे." इंदुमती शेवडे लिहितात "एकात्म अशा कथात्म अनुभवाची अर्थपूर्ण संघटना म्हणजे कथा".

प्रा.ना.सी- फडके यांच्या मते "कमीत कमी पात्रे आणि कमीत कमी प्रसंग वापरून थोड्या वेळात परिणामकारक रीतीने सांगितलेली व ऐकणाऱ्याच्या मनावर एकाच ठसा उमटविणारी हकीकत म्हणजे लघुकथा होय."

**'आळ' हा कथासंग्रह:**

'आळ' हा डॉ. सतीश तराळाचा पहिलाच कथासंग्रह आहे. जबरदस्त सामाजिक आशय, स्वतंत्र पुरोगामी दृष्टीकोन, वास्तव व भेदक चित्रण ही या कथासंग्रहाची वैशिष्ट्ये जाणवतात. 'आळ' या ग्रामीण कथासंग्रहात ग्रामीण जीवन, निसर्ग, परिसर, शेती, माणसाची मातीशी असलेली बांधिलकी, त्या विशिष्ट प्रादेशिकतेशी संबंधित लोकाचार, तेथील सामाजिक, धार्मिक, राजकीय जीवन पद्धतीतील वैशिष्टयपूर्णता, त्याच्या समस्या, प्रश्न, मर्यादा व एकूणच ग्रामीण संस्कृतीचे आकलन इत्यादी त्यांच्या ग्रामीण कथेतून प्रकट होते. म्हणूनच डॉ. सतीश तराळांच्या 'आळ' या कथासंग्रहातून ग्रामीण संस्कृती विशेषतः वऱ्हाडी ग्रामीण संस्कृती अभिव्यक्त झालेली दिसते.

**'ग्रामीण विश्व':**

डॉ. सतीश तराळांच्या 'आळ' या कथासंग्रहातून कृषी व कृषक यांचे चित्रण दिसून येते. वऱ्हाडातील कृषीसंस्कृती त्याच्याशी निगडित सण, उत्सव, प्रथा, परंपरा यांचे दर्शन घडते. भारत हा कृषीप्रधान देश असून कृषी संस्कृतीची नाळ ही, ग्रामीण जीवनाशी जोडल्या गेली आहे. त्याचेच यथार्थ चित्रण या कथांच्या माध्यमातून प्रकर्षाने जाणवते. या कथासंग्रहातील कथांमधून कृषीविषयक जाणिवा स्पष्ट होतात. ग्रामीण जीवनातील व्यथा, वेदना, हुंकार, जाणिवा, नेणिवा प्रकर्षाने मांडले आहे. 'आळ' या कथासंग्रहातील कथा बदलत्या कृषीप्रधान व्यवस्थेतून निर्माण झालेले दारिद्र्य, अज्ञान, निसर्गप्रेम, पारंपारिक निष्ठा या जोडीला जातीव्यवस्था, बलुतेदारी पद्धती या मिश्रणातून

नवीन ग्रामीण माणसाचे भावविश्व दर्शविणाऱ्या आहे. या कथांमधून ग्रामीण परिसर, परिस्थितीपुढे हतबल पात्रे, बोलीभाषा यांच्या वापरासोबतच श्रमजीवी माणसाचे मन, भावविश्व मांडताना दिसते. ‘आळ’ या कथेतून आसवांच सामर्थ्य प्रत्ययाला येते. ‘नातं’, ‘आळ’, अदावत, वाखा या शोकपर्यवसायी कथांमधील लेखन विनोद शरण होत नाही. हे या कथेच नवं बळं आहे. म्हणूनच डॉ. तराळांच्या ‘आळ’ कथासंग्रहातील कथा या मार्मिक वाटतात.

‘नातं’ या कथेतील सुमन ही नायिका कुष्ठरोगी नवऱ्यासाठी पोटच्या मुलाला अलग सोडणारी असून, ‘अदावत या कथेत वडिलांच्या अदावतीमुळे पती पत्नी एकत्र होऊ न शकणारे जीवांची घालमेल हृदयद्रावकरित्या मांडली आहे. ‘आळ’ ही कथा देखील नायिका प्रधान असून नर्मदा ही आजारी नवऱ्यासाठी कापूस चोरीचा आळ दारिद्यी परिस्थितीपुढे हतबल होऊन पत्करणारी लाचार बाई अश्या कित्येक मानसपुत्रांना लेखकाने आपल्या कथांमधून त्यांच्या विदारक स्थितीचे अतिशय हृदयदायक चित्र उभे करून अमर केले आहे, पण हे वाचताना डोळ्याची कडा ओली झाल्याशिवाय राहत नाही. कारण या कथांमध्ये काळजाला बोचणारी सल आहे.

समुहमनाला ‘उत्कटरस’ हवा असतो. व्यक्तीने मन सुजाण, सुसंस्कृत तर समूह मनं हलक्या फुलक्या अभिरुचीचे असते. ‘उसने एक मागणे’ मध्ये कथेला लघुनिबंधाचा वाण लागला तरी उत्तम विनोद साधलेला आहे. ‘अशीच एक शाया होती’ या कथेत अनेक व्यक्तिरेखा हुबेहूब डोळ्यासमोर उभे केले आहे. हे लेखकाचे व्यक्तिचित्रण उभे करण्याचे कसब दिसून येते, ‘वाखा’ ही कथा तर एखाद्या चित्रपट वा पथनाट्यातून प्रकट व्हावी या तोलामोलाची आहे.

‘आळ’ या कथासंग्रहातील कथांमध्ये लेखकांनी विविध सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली आहे. जातीव्यवस्था, अस्पृश्यता, दारिद्यता, वांझपणा, अशिक्षितपणा, लग्न न जमणे,

अंधश्रद्धा, राजकारण, हुंडाबळी, एकाधिरशाही अशा अनेक प्रश्न वास्तव मांडण्याचा प्रयत्न या कथांतून केला आहे.

लेखक बूटशर्ट संस्कृतीत राहणारे असूनही आपल्या हृदयात उपेक्षित, अपमानित आणि दारिद्री, गावजीवन जपत आहे. यांचा प्रत्यय या कथांमधून येतो. विशेषतः 'वाखा' या कथेत कापूस हा एकाधिरशाहीतून विकला जाणे म्हणजे काय? याचे चित्रण लेखकाने अचूक केले आहे. कारण ते स्वतः एक कास्तकाराचे पुत्र आहे. म्हणूनच कास्तकाराचे दुःख अचूक हेरले आहे.

आपला देश हा खेड्यांचा देश आहे. आजही येथील पंच्याहत्तर टक्के जनता खेड्यापाड्यात राहते. यामधून युगानयुगे आपली लोकपरंपरा, लोकसंस्कृती व लोककला समृद्ध झाली आहे. आपली समाजव्यवस्थाही या खेड्यावरच अवलंबून आहे. म्हणूनच या खेड्यापाड्यातील ग्रामीण माणसाला केंद्रस्थानी ठेवूनच या कथासंग्रहामध्ये ग्रामीण माणसाला अग्रस्थान दिले आहे. या लोकांची निसर्गाच्या साधनसंपत्तीवर आणि शेतीनिष्ठ जीवनपद्धतीवरच उपजिविका चालते. 'वाखा' या कथेत डॉ. सतीश तराळ यांनी अशीच पुंडलिक या बी.ए. झालेल्या सुशिक्षित बेरोजगार तरुणाची सर्वस्वी शेतीवर अवलंबून असलेल्या त्याच्या कुटुंबाची वाताहत दर्शविली आहे. बहिणीला उजवायचे आहे, दुबार पेरणीचे संकट, निसर्गाचा हवालदिलपणा, पावसाचा लहरीपणा या संकटाचा सामना करताना सुदैवाने शेती साथ देते, भरपूर पिक होते परंतु परत संकटाची मालिका साथ सोडत नाही. 'दुष्काळात तेरावा महिना' याप्रमाणे कापूस विक्रीसाठी ताटकळत १५ दिवस जिनिंगमध्ये काढावे लागते. या एकाधिकारशाही विरुद्ध लढा शब्दबद्ध केला आहे.

'मोयी' या कथेत तरुण मुलाचे एकाकी निधन झाल्याने वृद्ध माता-पित्याची जगण्याचा संघर्ष दिसून येते. दोन वेळेच्या जेवणाचीही भ्रांत नसल्याने वृद्ध असहाय पिता 'मोयी' साठी दिवसभर वणवण भटकल्यानंतर

मोळी विकल्या जाते पण अशिक्षितपणाचा फायदा घेऊन जोडलेली फाटलेली नोट त्याच्या नशिबी येते. हे अतिशय विदारक चित्र रेखाटले आहे.

प्रत्येक कथेत शेती व त्याच्याशी निगडित व्यवस्थेचे चित्रण या कथासंग्रहात दिसून येते. या कथासंग्रहातील बहुतेक कथा या दर्यापूरच्या प्रदेशात घडलेल्या आहेत. चंद्रभागा व भुलेश्वरी या डोळ्यातून वाहतात असा उल्लेख केलेला आहे. यावरून आपल्या परिसरातील नद्यांविषयी लेखकाची आस्था दिसून येते. सहा एकरात वरुडात मालगुजार तर आमच्याकडे आमचं पोटही निट भरत नाही. असे एकाच जिल्ह्यातील जमिनीचे सुपीकता नमूद केलेली आहे. हिरवागार नयनरम्य परिसर, आमराई, वडाच्या पारंब्या व नदीच्या काठावरचे देऊळ असा सुंदर निसर्गाचा देखावा 'अदावत' या कथेत चित्रित केला आहे. बालपणी कैऱ्या, चिंचा, बोरं खाण्याची मजा व स्वैर रानमोकळ भटकणे या सर्व गोष्टी बालकांचे जगणे किती स्वच्छंदी होते हे सांगून जातात.

'खेळ' या कथेत गरजू व्यक्तींना मदत न करता केवळ अन्नदान व वस्त्रदान वर्तमानपत्रात फोटो येण्यापुरते करण्यासाठीच केवळ महिला मंडळाचे कसे कार्य करते हे विषद केले आहे. यातूनच समाज उपहासात्मकरित्या कार्य करण्याची वृत्ती दिसून येते. केवळ स्वार्थ या मानववृत्तीला अधोरेखित केले आहे.

या कथांमधील शब्द वापरण्याच कसब अचूक आहे. 'पोरगी वन्निसी हाय' मधे तिच्याकडे जनावरासारखे पाहिले जाते हे मार्मिकपणे दिसते. अनेक ठिकाणी वऱ्हाडी शब्द, वऱ्हाडी लकबी आलेल्या आहे. नपुंसकाला 'फोसा' अशा शब्द प्रयोग केलेला आहे. ग्रामीण आनंद हा फुलं, चांदण्या, प्रतिमांनी न येता आनंदाच्या राशी या शब्दात व्यक्त होतो. कारण मळणीच्या राशी येथील समृद्धीची प्रतिमा आहे.

'पीक म्हनसान त बदबद' हा बदबद नेमके जे सांगायचे तेच सांगतो. गावजीवनात डोळ्यामध्ये चंद्रभागा, भुलेश्वरी थांबत नाहीत. दर दहा कोसावर

दर दहा वर्षांनी बोली बदलते यांचा अर्थ गावजीवन बदलते यांचा प्रत्यय गंगा, यमुना ऐवजी या दर्यापुरी नद्यामुळे येतो. बुढा आता म्हातारा होता या वाक्यातूनही बुढा आणि म्हातारा याच अलग छटा आहे. हे मान्य करावेच लागते. 'छत कोसळत नाही हे कंबरड मोडल्या सारख होतं' छताला कंबरड दाखवणारा लेखक ग्रामीण जीवनाशी एकदम निगडित आहे, खेयापेयाचा शौक नाही, पेपरचे कागद, लेकरवाया बाई सारखं पिकांन गजबजलेलं वावरं, बोट दाखवल्या बरोबर बोटाला चिकटणारे बोंड, भाकरीची उजागरी, पाय भारी असणं, थुंगा इत्यादी अनेक स्थळातून सिद्ध होत की, लेखकान सारं तेवढ्या जवळून भोगलं आहे. केवळ बोलीमध्ये भाषांतर करून लिहिले नसून बोलीविषयी आत्मियता आहे. प्रस्तुत कथांमधून अथी, हिंगे, बसेल, घेतलं हुअ, वर्गालोक, ठावरीक हि खास दर्यापुरी बोलीभाषेतील शब्द दिसून येते. काळाच्या प्रवाहात भाषा बदलेल पण या कथाच्या रूपाने ही शब्द कायम भेटतील.

लेखक डॉ. सतीश तराळ यांचे अनुभवविश्व कथांमध्ये सामावत नाही एवढ मोठ आहे. 'नातं' हा अनुभव एका कादंबरीचा विषय होईल एवढा विस्तृत आहे. काही कथा या कादंबरी वाचल्याचा भास होतो तर काही कथा ह्या नाटकाशी साधर्म्य वाटतात. नाट्यमयता हा या कथासंग्रहातील कथांचा आत्मा आहे. सलग, सुगम संवाद व त्यातून निर्माण होणारे नाट्य हुबेहूब ग्रामीण जीवन व त्याचे चित्रण आपल्या डोळ्यासमोर उभे करते हे लेखकाच्या लिहिण्याचे कसब आहे.

भाषेची समृद्धी, लेखकाचे व्यक्तित्व, जीवनाची ओळख या पायऱ्यासाठी ग्रामीण कथांना प्राधान्य देण्यात आहे. ग्रामीण कथा या त्याच मातीतल्या लेखकामुळेच आज वास्तव होत आहे. काळाच्या गतीनुसार आज खेडी बदलत आहे. उद्या हे गावजीवनही बदलेल. परंतु लेखक डॉ. सतीश तराळांनी प्रस्तुत कथा संग्रहात उभे केलेले ग्रामजीवन हे नक्कीच त्या

काळाच प्रतिनिधित्व करणार आहे. जुन्या ग्रामचित्रणापेक्षा हे सारं नवं आहे. म्हणूनच ‘आळ’ हा कथासंग्रहात ग्रामीण जीवनाचे खरे स्वरूप प्रकट करणारा ग्रामीण जीवनाचा आरसाच आहे. असे म्हटले तर वावगे ठरू नये.

## निष्कर्ष:

1. ग्रामीण कथा ही अनुभवविश्वाचे व समाजवास्तवाचे चित्रण करते. अनुभवातील एकात्मता व एकजिनसीपणा आणि ऐकरी व अनेकस्तरीय आशयसूत्रांची मांडणी ही या कथासंग्रहाची वैशिष्ट्ये सांगता येतील.
2. या कथासंग्रहातील कथांमधून कथाकाराने केवळ ग्रामीण भागातील समाजजीवनाचे वर्णन न करता अनुभवाचे वेगवेगळे प्रदेश धुंडाळूनधारदार आशयसूत्राची मांडणी केली व समग्र ग्रामीण जीवन, भ्रष्ट स्वार्थाचे राजकारण, दृष्ट प्रवृत्तीचा शिरकाव ग्रामीण जीवनात कसा होतो आहे, त्याचा ग्रामीण संवेदनावर होणारा परिणामही कथाकार डॉ. सतीश तराळ यांनी सूक्ष्मपणे टिपला आहे.
3. या ग्रामीण कथांमध्ये शोषित परिस्थितीपुढे हतबल झालेल्या कष्टकरी, भूमिहीन शेतमजूर, नियतीपुढे हरलेल्या स्त्रियांचे प्रश्न, अनेक पातळीवरील दुःख, भोग, व्यथा-वेदना मांडलेल्या आहे. दुःख आणि दारिद्य यांनी पिचलेल्या तळागाळातील माणसांचे चित्रण केलेले दिसते.
4. तराळ यांच्या ग्रामीण कथेतील आशय आणि अभिव्यक्तीची विण घट्ट आहे.
5. ग्रामीणता ही एक वृत्ती असून तिचा अनुबंध निसर्गाच्या आदिमत्वाशी असतो. ग्रामीणतेची नाळ ग्रामीण समाज जीवनाशी असते.

## संदर्भ ग्रंथसूची:

1. मुलाटे वासुदेव ‘ग्रामीण साहित्य’: स्वरूप व दिशा, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, तृतीय आवृत्ती २५ नोव्हेंबर २०११ पृ. २५.
2. कोतापल्ले नागनाथ ‘ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध’, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद

तृतीय आवृत्ती डिसेबर २०१० पृ. ८.
3. भागवत मोहन 'ग्रामीण साहित्य आणि संस्कृती', स्वरूप प्रकाशन औरंगाबाद दुसरी आवृत्ती ऑगष्ट २००८ पृ. ११.
4. बागुल फुला 'निवडक कथा, स्वरूप व समीक्षा; प्रशांत पब्लीकेशन.
5. नाफडे शोभा 'स्वातंत्र्योत्तर वऱ्हाडी साहित्य, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद प्रथम आवृत्ती २००७
6. चिखले वर्षा 'वैदर्भीय ग्रामीण कथात्म साहित्य रूप आणि स्वरूप: स्वरूप प्रकाशन औरंगाबाद २०१३.
7. यादव आनंद 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाउस १९७९.

** ** **

# ' द दा विंची कोड ' या अनुवादित कादंबरीतील 'होली ग्रेल' मिथक : एक अभ्यास

**संशोधक विद्यार्थी : संगीता उत्तमराव कानफाडे**
**मार्गदर्शक : प्रा. डॉ. वर्षा चिखले**
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

## प्रास्ताविक:

'द दा विंची कोड' ही कादंबरी मूळ इंग्रजी भाषेत आहे. या कादंबरीचे लेखक डॅन ब्राऊन हे आहेत. डॅन ब्राऊन हे सुप्रसिद्ध अमेरिकी लेखक आहेत. त्यांचे संपूर्ण नाव डॅनिअल गर्हार्ड ब्राऊन (Daniel Gerhard Brown) आहे. थरारक कादंबरीलेखनासाठी ते प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांचे कथानक हे रहस्य, थरार, गूढता, कट, षडयंत्र आणि साहस यांनी भरलेले असते. एकूण ५६ भाषांमध्ये त्यांच्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. आणि संपूर्ण जगात या कादंबऱ्यांच्या २०० दशलक्ष प्रती छापल्या गेल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांपैकी 'एंजल्स् अँड डेमॉन्स्', 'द दा विंची कोड', 'द लॉस्ट सिम्बॉल', 'इन्फर्नो' आणि 'ओरीजीन' या अतिशय गाजलेल्या कादंबऱ्या आहेत. आणि त्यांवर इंग्रजीत चित्रपटही आले आहेत. 'द दा विंची कोड' या कादंबरीचा मराठी अनुवाद अजित ठाकूर यांनी केला आहे. तो मराठी वाचकांच्या अतिशय पसंतीस पडला आहे.

प्रस्तुत कादंबरीत ख्रिश्चन धर्मातील अनेक संदर्भ आले आहेत. त्यामुळे या कादंबरीला एक प्रकारचे धार्मिक महत्त्वही प्राप्त झाले आहे. ख्रिश्चनत्वाचा उगम आणि ख्रिश्चन कला - इतिहासाचे महत्त्व विशद करणारी ही कादंबरी आहे. ख्रिश्चन धर्मातील महत्त्वाच्या संकल्पना व त्यांचे धार्मिक महत्त्व या कादंबरीत जागोजागी दिसून येते. या कादंबरीचे कथानक थरारक, रहस्यमय व षडयंत्रांनी भरलेले असून ही कादंबरी शेवटपर्यंत वाचकांची उत्कंठा वाढवत नेते. या कादंबरीच्या अनुषंगाने काही लोकांनी सत्य - असत्याची पडताळणी करण्याचाही प्रयत्न केला आहे. ख्रिश्चन धर्माशी निगडित असलेल्या अनेक धारणा, संकल्पना वास्तवाच्या कसोटीवर पडताळून पाहण्याचा प्रयत्न अनेक इतिहासकार, पुरातत्त्ववेत्ते व शास्त्रज्ञांनी केला आहे. त्यातीलच एक महत्त्वाची संकल्पना 'होली ग्रेल' ही आहे. या शोधनिबंधात, प्रस्तुत कादंबरीतील 'होली ग्रेल' या

मिथकाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

## होली ग्रेल मिथकाचा आढावा :

प्रथमतः मिथक ही संकल्पना समजून घेऊ. आ. ह. साळुंखे यांच्या मते, " मिथ्य कथा म्हणजे धर्मनिष्ठ लोकांच्या दृष्टीने अंतिम सत्य सांगणारी आणि पवित्र; तर वास्तववादी लोकांच्या दृष्टीने कल्पित व अवास्तव आणि कलावंत साहित्यिक यांच्या दृष्टीने कलात्मक सत्याचा अंतर्भाव असलेली विशिष्ट प्रकारची कथा होय. पुराणकथा, दैवतकथा इत्यादी तिची पर्यायी नावे आहेत "[१]

कॅसिरेर यांच्या मते, " मिथके म्हणजे केवळ स्वैर कल्पनाविलास नाही. त्याला केवळ मनोव्यापार म्हणता येत नाही. वास्तवावर आधारलेला व्यापारही म्हणता येत नाही, तर मानवाला भावलेले वास्तव आणि दिव्यात्म (devine) जाणीव यांच्या एकात्मतेतून सर्जन पावलेले 'विशिष्ट मानवी वास्तव 'मानावे लागते. म्हणून त्याला मानवी वास्तवातील स्थल - काल - संख्या ही परिमाणे लावता येत नाहीत. एखाद्या शिल्पातील हत्ती जसा वास्तव नसतो पण वास्तवासारखा वाटतो तसे 'विशिष्ट' अस्तित्व मिथकांना प्राप्त झालेले असते "[२]

अभ्यासकांनी मिथक या संकल्पनेवर वरीलप्रमाणे विविध विचार मांडले आहेत. प्रस्तुत निबंधाच्या मांडणीमध्ये आ.ह. साळुंखे यांनी निर्देशित केलेला तिसरा दृष्टिकोन (मिथक म्हणजे, कलावंत साहित्यिक यांच्या दृष्टीने कलात्मक सत्याचा अंतर्भाव असलेली विशिष्ट प्रकारची कथा) महत्त्वाचा मानला आहे.

प्रस्तुत कादंबरीत होली ग्रेल या मिथकावर विस्तृत चर्चा आली आहे. कादंबरीत लिओनार्दो दा विंची या जगप्रसिद्ध चित्रकाराने काढलेल्या 'द लास्ट सपर' या चित्राला होली ग्रेलचे चित्र म्हटले आहे. मिलान (इटली) येथील सांता मारिया डेल ग्राझी या गॅलरीतील भिंतीवर हे ऐतिहासिक चित्र लावले आहे. या चित्रात येशू ख्रिस्त आणि त्याचे अनुयायी असे एकूण १३ जण दाखविले आहेत. चित्राच्या मध्यभागी येशू ख्रिस्त बसला

आहे व त्याच्या दोन्ही बाजूंना सहा - सहा शिष्य बसले आहेत. प्रत्येकाच्या पुढ्यात पाव आणि मद्याचा पेला ठेवलेला आहे. त्या पेल्यातील मद्याला वाइन म्हटले आहे. ते पेले काचेचे आणि अखंड आहेत. चित्रात कुठलाही एक चषक वेगळा दर्शविलेला नाही. एका प्राचीन ख्रिश्चन कथेप्रमाणे येशू ख्रिस्ताने मद्याचा पेला उचलला आणि सर्व शिष्यांबरोबर ते मद्य वाटून घेतले. तो एक पेला (म्हणजेच चषक) म्हणजेच 'ख्रिस्ताचा पेला - होली ग्रेल' असे मानले जाते.

लिओनार्दोच्या चित्रात अशा प्रकारचा विशिष्ट चषक नव्हता. मग चित्रकार तो काढायचा विसरला असावा की चित्रकाराला ते मुद्दाम लपवायचे होते? की चित्रकाराला तो चषक प्रतीकात्मक दाखवायचा होता? कारण या कादंबरीत होली ग्रेल ही वस्तू नसून ती एक व्यक्ती मानली गेली आहे. दुसऱ्या एका आख्यायिकेप्रमाणे जोसेफ ऑफ अरिमॅथिया याने येशू ख्रिस्ताच्या मृत्यूनंतर त्याचे रक्त एका चषकात गोळा केले. हा चषक येशूने त्याच्या शेवटच्या जेवणात वापरला होता. हे रक्त लोकांच्या उत्थापनासाठी एक प्रतीक म्हणून ठेवले होते. मात्र जोसेफच्या या कृतीमुळे त्याला कैदेत टाकण्यात आले व या प्रसंगाने होली ग्रेलचे महत्त्व आणखीच वाढले. चार अधिकृत गॉस्पेलनुसार ख्रिस्ताला सूळावर दिल्यानंतर त्याला पुरण्याची जबाबदारी जोसेफवर होती. कैदेतून सुटल्यावर जोसेफ ब्रिटिश द्वीपसमूहात वास्तव्यास गेला व तिथे त्याने तो चषक लपवून ठेवला. दुसऱ्या एका संदर्भाप्रमाणे हा चषक ब्रिटनमध्ये हरविल्याचे सांगण्यात येते. ब्रिटनमध्ये आजही एका झऱ्यातून लाल रंगाचे पाणी वाहते व अनेक लोक या ठिकाणाला पवित्र चषकाची पवित्र जागा मानतात. मात्र शास्त्रज्ञांच्या मते , तेथील जमिनीत असलेल्या रेड आर्यन ऑक्साईडच्या मुबलक साठ्यामुळे असे होत असावे. जोसेफ ऑफ अरिमॅथिया याला येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा साक्षीदार मानले गेले आहे.

ब्रिटिश दंतकथेमध्ये राजा आर्थर हे एक पौराणिक पात्र आहे. त्याने होली ग्रेलचे गूढ

अवशेष शोधण्यासाठी महान आध्यात्मिक अभियान चालविल्याचे सांगितले जाते. राजा आर्थर अशा अभियानाचा समन्वयक मानला जातो. ग्रेलमध्ये जखमांना बरे करण्याची , शाश्वत तारुण्य मिळवून देण्याची व चिरंतन आनंदाची प्राप्ती करून देण्याची शक्ती आहे असे तो मानतो. मात्र राजा आर्थर याचे इतिहासात अस्तित्व असल्याचे पुरावे न सापडल्याने त्याला दंतकथेतील नायक यापेक्षा जास्त महत्त्व देता येत नाही.

मध्ययुगीन कालखंडात होली ग्रेल हा एक लोकप्रिय विषय होता व त्यावर अनेक प्रकारच्या कथा लिहिल्या गेल्या. त्या कथा संपूर्ण युरोपात वाचल्या जात. टेम्पलर सरदार यांची आख्यायिका हीदेखील यातलीच एक लोकप्रिय कथा आहे. टेम्पलर सरदारांच्या कथेनुसार या सरदारांची एक संघटना होती, जी पवित्र भूमी जेरुसलेम येथे येणाऱ्या युरोपीय यात्रेकरूंचे संरक्षण करत होती या संघटनेने १०९९ मध्ये मुगल सत्तेपासून जेरुसलेम परत मिळवले. पुढे १११८ मध्ये ह्यूगस डी पायन्स या फ्रेंच सरदाराने, नातेवाईक आणि काही ओळखीच्या लोकांच्या मदतीने, एक सैनिकी तुकडी उभी केली. त्या तुकडीला 'ख्रिस्ताचे गरीब सहकारी सैनिक' असे नाव देण्यात आले. तेच पुढे 'टेम्पलर सरदार' म्हणून ओळखले गेले. बाल्डविन द्वितीय याच्या मदतीने या सरदारांनी जेरुसलेमच्या पवित्र भूमीवर एक मुख्यालय उभारले आणि त्याला माउंट टेम्पल असे नवीन प्रतीकात्मक नाव दिले. ख्रिस्ती यात्रेकरूंच्या संरक्षणासाठी हे सैनिक प्रतिबद्ध होते. बाल्डविन हा तेव्हाचा जेरुसलेमचा शासक होता. या टेम्पलर सरदारांनी होली ग्रेल टेंपल माउंटकडून हस्तगत केले व एका गुप्त ठिकाणी ठेवले. आर्थरविषयक साहित्यानुसार, होली ग्रेल म्हणजे असा एक खजिना की ज्यात एक महत्त्वाचा हेतू दडविलेला आहे आणि होली ग्रेल एका किल्लेवजा वाड्यात संरक्षित केले आहे.

## होली ग्रेल संकल्पना व स्वरूप :

अनेक पौराणिक कथांमधून होली ग्रेलचे अस्तित्व मानण्यात आले आहे. होली ग्रेल म्हणजे ख्रिस्ताचा पेला अशी संकल्पना रूढ आहे; पण त्याचा कुठलाही ऐतिहासिक पुरावा आढळून आलेला नाही. ख्रिश्चन धर्मग्रंथ पवित्र बायबलने मात्र होली ग्रेल संकल्पना नाकारली आहे. यावर कुठलेही भाष्य बायबलमध्ये केले गेले नाही. ती एक दंतकथाच मानली गेली. अनेक मान्यतांनुसार होली ग्रेल ही एक वस्तू आहे, मात्र कादंबरीत होली ग्रेल ही एक व्यक्ती मानली गेली आहे, एक स्त्री मानली गेली आहे. कादंबरीतील पात्रांच्या संवादातून होली ग्रेल ही संकल्पना स्पष्ट होत जाते. धार्मिक चिन्हांचे अभ्यासक रॉबर्ट लँग्डन आणि धर्माभ्यासक, इतिहासकार ली. टीबींग या दोन पात्रांच्या संवादातून होली ग्रेलचे रहस्य उलगडत जाते, ते पुढील प्रमाणे :

आधुनिक काळात स्त्री - पुरुषांसाठी योग्य ती चिन्हे दाखवली जातात: जसे पुरुषांसाठी ♂ तर स्त्रीसाठी ♀ अशी खूण दाखवली जाते. मात्र स्त्री आणि पुरुषांसाठी वापरली जाणारी ही मूळ चिन्हे नाहीत. जुन्या काळात पुरुषांसाठी ढाल आणि भाला, तर स्त्रियांसाठी सौंदर्यदर्शक आरसा ही चिन्हे होती. पुढे ते चुकीचे मानले गेले व खगोलशास्त्रातील ग्रहदेव मंगळ आणि ग्रहदेवता शुक्र यांच्यावरून स्त्री-पुरुषांची चिन्हे तयार झाली. ही चिन्हे फार सोपी होती.

**उदाहरणार्थ :** ∧ हे पुरुषवाचक मूळ चिन्ह आहे. प्राथमिक स्वरूपात लिंग दाखविण्याचा हा प्रयत्न आहे. याच खुणेला पूर्वी ब्लेड किंवा तलवार म्हणत. आक्रमकता हे पुरुष तत्त्वाचे प्रतीक मानले गेले. आजही सैनिकांच्या गणवेशावर, खांद्यावरच्या पट्ट्यांमध्ये हीच पुरुषलिंगदर्शक खूण वापरलेली दिसते. ही चिन्हे गणवेशावर जेवढी जास्त तेवढा त्या पुरुषाचा हुद्दा वरचा असतो. याच्या अगदी उलट स्त्रीत्वाची खूण आहे. ∨ या खुणेला चषक (chalice ) म्हणतात. हा चषक एखाद्या पेल्यासारखा किंवा भांड्यासारखा दिसतो. मुख्य म्हणजे या चिन्हाचा आकार स्त्रीच्या गर्भाशयासारखा आहे.

ही खूण म्हणजे स्त्रीत्व आणि प्रजनन शक्तीचे प्रतीक आहे.

दंतकथांमधून होली ग्रेल हा एक चषक म्हणजे पेला मानला गेला आहे. मात्र त्याच्या खऱ्या स्वरूपाचे रक्षण व्हावे म्हणून त्याच्यासाठी चषक किंवा पेल्याचे रूपक वापरले गेले. स्त्री आणि तिची प्रजनन शक्ती यांना एकेकाळी अतिशय पवित्र मानले जात असे; पण चर्चने ही कल्पना बहिष्कृत केली. पवित्र स्त्रीत्व किंवा देवता यांचे अस्तित्वच चर्चने नाकारले. चर्चमध्ये पुरुषांचे वर्चस्व असल्याने या कल्पनेचा धोका चर्चला जाणवू लागला व म्हणूनच चर्चने अशा पवित्र स्त्रीत्वाचे राक्षसीकरण करून स्त्रीला अपवित्र ठरवले. 'स्त्री हे पापाचे मूळ' ही संकल्पना रूढ केली. या कल्पनेमागील कहाणी अशी सांगितली जाते की, ईव्हने सफरचंदाचा तुकडा खाल्ला आणि त्यातून मानवी वंशाचा ह्रास झाला. एकेकाळी जीवनाची सरिता मानली गेलेली स्त्री आता शत्रू मानली जाऊ लागली. जीवनदायी स्त्री ही प्राचीन धर्मश्रद्धेचा पाया होती. मनुष्याला जन्म देण्याची फार मोठी ताकद, हेच तिच्या जीवनाचे रहस्य होते. ख्रिश्चन तत्त्वज्ञानात या जैविक सत्याकडे दुर्लक्ष करून स्त्रीच्या निर्मितिशक्तीला अवमानित करण्यात आले व पुरुषालाच जगाचा निर्माता ठरवले गेले.

जेनेसिस (Genesis-the origine or mode of formation of something) या उत्पत्तीशास्त्राप्रमाणे ॲडमच्या बरगडीपासून ईव्ह तयार झाली. याचा अर्थ ती पुरुषापासूनच तयार झाली; आणि तीसुद्धा पापकारक स्त्री! जेनेसिस म्हणजे देवतेची संकल्पना संपण्याची सुरुवात होती. ग्रेल म्हणजे विस्मृतीत गेलेल्या देवतेचे चिन्ह आहे. ख्रिश्चन धर्माचा उदय झाला तेव्हा जुन्या पॅगन धर्माचा अस्त झाला. पॅगन धर्माला मानणारे लोक मनुष्याला निसर्गातल्या अनेक जीवित घटकांप्रमाणेच एक मानत. ते लोक निसर्गपूजक किंवा पृथ्वीपूजक असत. पॅगन मनुष्य म्हणजे असा मनुष्य, की जो ख्रिश्चन, मुस्लीम किंवा ज्यू नाही. पॅगन धर्माचा सहजासहजी अस्त झाला नाही. चर्चने देवतेला बहिष्कृत केले आणि पॅगन लोकांची जाळपोळ केली. पवित्र

स्त्रीत्वाची पूजा करणाऱ्या पाखंडी लोकांवर बंदी घातली. ग्रेलच्या शोधासाठी ज्या कथा होत्या त्या पवित्र स्त्रीत्वाचा गुप्त शोध घेणाऱ्या कथा होत्या. चर्चने यावर बंदी आणली. जे कोणी सरदार चषकाचा शोध घेत होते ते, स्त्रीत्वाचा अवमान करणाऱ्या चर्चला कळू नये म्हणून, सांकेतिक भाषेत बोलत. ही स्त्री म्हणजे अशी एक स्त्री जिच्या गुपितात एवढी ताकद होती, की ते कळले तर सर्व ख्रिश्चन धर्माचा पायाच हलला असता. चर्चच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला असता. म्हणून चर्चने ही पवित्र स्त्रीत्वाची संकल्पनाच हाणून पाडली व पुरुषाला देवत्व बहाल केले.

लिओनार्दोचे 'द लास्ट सपर' हे चित्र निरखून पाहिले असता त्यात येशू ख्रिस्ताच्या उजव्या बाजूला एक स्त्री बसलेली दिसते. पुरुषाप्रमाणे भासवल्यासारख्या या व्यक्तीला निरखून पाहिले तर ती व्यक्ती स्त्रीसारखी दिसते. तिचा चेहरा, शरीर, लांबलचक लाल केस, नाजूक हात, वळणदार बोटे व छातीचा उभार यांवरून ती एक स्त्री आहे हे स्पष्ट दिसून येते. ती स्त्रीच होती; पण पुरुष आणि स्त्री यांमध्ये भेद न दाखवता चित्रे काढण्यात लिओनार्दो तरबेज होता. अशा दृष्टिभ्रम निर्माण करणाऱ्या चित्राला स्कोटोमा (scotoma ) म्हणतात. आपली दृष्टीही पूर्वग्रहदूषित असते. आणि म्हणून आपल्याला ती स्त्री सहजासहजी दिसत नाही. ती स्त्री मेरी मॅगडालीन होती. ती प्रसिद्ध अशा बेंजामीन राजघराण्यातील असूनही चर्चने सुरुवातीच्या काळात तिला बदनाम केले .तिची वेश्या अशी प्रतिमा तयार केली. येशू ख्रिस्ताला मानवी प्रेषित न मानता तो एक दैवी शक्ती होता, हे सिद्ध करण्यासाठी चर्चने ख्रिस्ताच्या जीवनातील मानवी भाग बायबलमधून काढून टाकला. त्यातला एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मेरी मॅगडालीनची कथा आणि तिचे येशू ख्रिस्ताशी असलेले संबंध. ते दोघे पति-पत्नी होते. त्यांचे लग्न झाले होते. लिओनार्दोच्या 'द लास्ट सपर' या चित्रात येशू ख्रिस्त आणि मेरी मॅगडालीन हे आरशातील एकमेकांच्या प्रतिकृती वाटतात.

त्यांचे कपडे एकमेकांच्या उलट रंगाचे आहेत. येशूने लाल झगा आणि निळा कोट घातला आहे, तर मॅगडालीनने निळा झगा आणि लाल कोट घातला आहे. प्राचीन चिनी तत्त्वज्ञानातील 'यिन आणि यांग' या संकल्पनेप्रमाणे येशू आणि मॅगडालीनला परस्परपूरक शक्ती मानले गेले. 'यिन आणि यांग' ही नैसर्गिक जगातील द्वैतवादाची, परस्परपूरकतेची व परस्परावलंबित्वाची संकल्पना आहे. या संकल्पनेत ☯ या आकृतीप्रमाणे दोन्ही आकार एकमेकांत मिसळलेले आहेत व ते एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत. 'द लास्ट सपर 'या चित्रातील आणखी एक आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे येशू व मॅगडालीन हे एकमेकांना कमरेपाशी भिडलेले दिसतात. त्यातून स्त्रीत्वाची ∨ ही खूण स्पष्टपणे दृष्टीस पडते. त्यांच्यातील ही जवळीक दूर करण्यासाठी प्रयत्नपूर्वक त्यांना एकमेकांपासून थोडे दूर जाताना दाखविले आहे. दुरून हे चित्र निरखल्यास इंग्रजी (M) हे अक्षर निदर्शनास येते आणि (M) म्हणजेच मॅट्रिमॉनिओ किंवा मेरी मॅगडालीन. पण हे अक्षर जाणीवपूर्वक लपविले आहे. ग्रेलसंबंधी अनेक चित्रांत (M) हे अक्षर लपविलेले दिसते. ते कधी चित्राच्या खाली, कधी वॉटरमार्कमध्ये, तर कधी चित्राच्या रचनेत लपविलेले दिसते. लंडनच्या अवर लेडी ऑफ पॅरिस या चर्चच्या गाभाऱ्यावर प्रायरी ऑफ सायनचे पूर्वीचे ग्रँडमास्टर जॉ कॉक्टो यांनी तयार केलेला (M) फारच मोठा आणि स्पष्ट दिसतो.

प्रायरी ऑफ सायन ही इ.स. १०९९ मध्ये स्थापन झालेली व युरोपमध्ये गुप्तपणे कार्यरत असलेली संस्था आहे. ही संस्था खरोखरच अस्तित्वात आहे. लिओनार्दो दा विंची हा या संस्थेचा माजी उच्चाधिकारी होता. सर आयझॅक न्यूटन हेसुद्धा संस्थेचे उच्चाधिकारी होते. त्यावेळचे अनेक मान्यवर या संस्थेशी जुळले होते. प्रायरी ऑफ सायन ही संस्था होली ग्रेलचा शोध घेणारी व तिचे रक्षण करणारी संस्था आहे. या संस्थेच्या विरोधात 'ओपस डाय' हा व्हॅटिकन चर्चने मान्यता दिलेला व कॅथलिक धर्माशी

कट्टर निष्ठा असलेला पंथ कार्यरत आहे.

बायबलच्या मान्यतेप्रमाणे येशू हा अविवाहित होता. मात्र येशूची विवाहित असल्याची शक्यता जास्त स्वीकारार्ह आहे. कारण येशू हा ज्यू होता. त्या काळच्या ज्यू परंपरेत ब्रह्मचर्याचा निषेध केला आहे. त्यामुळे येशूच्या पित्याने आपल्या मुलासाठी योग्य वधू शोधणे हे त्याचे कर्तव्यच होते. कादंबरीतील ली. टिबिंग या पात्राच्या निवेदनानुसार ख्रिश्चन धर्मातील सर्वात जुन्या नोंदी 'नाग हमाडी आणि डेडसी क्रॉल्स' या आहेत. त्यांमध्ये गॉस्पेल ऑफ फिलीप या संदेशात पुढीलप्रमाणे उतारा आला आहे :

> *"आपल्या रक्षणकर्त्याची सहचारिणी (companion) म्हणजे मेरी मॅगडालीन होती. आपल्या सर्व शिष्यांमध्ये ख्रिस्ताचे तिच्यावर सर्वात जास्त प्रेम होते आणि तो तिच्या ओठांचे नेहमी चुंबन घेत असे. इतर सर्व शिष्यांना त्याचा विषाद वाटे आणि आपली नापसंती ते व्यक्त करीत असत. ते त्याला म्हणायचे, " आम्हा सर्वांपेक्षा तुमचे तिच्यावर प्रेम जास्त का आहे ? "[३]*

मुख्य म्हणजे बायबलमधील कथांशी हा मजकूर अजिबात जुळत नाही. या ओळींमध्ये कंपॅनियन (companion) हा शब्द वापरला आहे. या शब्दाचा त्या काळातला अर्थ पती किंवा पत्नी असा होता. रक्षणकर्त्याची जोडीदार मेरी मॅगडालीन होती. या जुन्या नोंदींमधील अनेक उताऱ्यांमधून येशू आणि मॅगडालीन यांच्यामध्ये प्रेमसंबंध होते असे स्पष्ट संकेत दिसतात.

मेरी मॅगडालीनच्या गॉस्पेलमध्येही अशाच प्रकारचा एक उतारा आला आहे. त्यातील एका प्रसंगाप्रमाणे येशूच्या पीटर

या शिष्याला मॅगडालीनबद्दल कायम असूया वाटत होती. कारण सर्व शिष्यांतून तीच येशूच्या जास्त जवळ होती. येशूचे तिच्यावर जास्त प्रेम होते. येशू ख्रिस्ताला कळून चुकले होते की तो लवकरच पकडला जाईल व त्याला सूळावर देण्यात येईल. तो गेल्यानंतर चर्च कसे चालवायचे याबद्दल येशूने मॅगडालीनला सर्व सूचना दिल्या होत्या. मात्र पीटरला हे मान्य नव्हते. एका स्त्रीपुढे दुय्यम भूमिका स्वीकारायला तो तयार नव्हता. बायबलच्या मूळ खंडात ख्रिश्चन चर्चचा कारभार एक स्त्री चालवणार होती. येशू हा स्त्रीसमर्थक होता. चर्चला हे मान्य नव्हते, म्हणून चर्चने मेरी मॅगडालीनची प्रतिमा मलिन करण्यास सुरुवात केली व एकूणच पवित्र स्त्रीत्वाला बदनाम करण्याचा प्रयत्न केला. मेरी मॅगडालीन ही बेंजामिन राजघराण्यातील होती व येशूही पवित्र अशा डेव्हिडच्या राजघराण्यातील होता.' बुक ऑफ मॅथ्यू 'मध्ये हा उल्लेख आला आहे. प्रबळ अशा बेंजामिन घराण्यातील मुलीशी लग्न करून येशूने दोन राजघराणी एकत्र जोडली होती. येशूला एक संयुक्त राजकीय शक्ती उभी करायची होती. पुढे इसवीसनाच्या तेराव्या शतकात ज्याप्रमाणे सॉलोमनने राजपरंपरा निर्माण केली तसेच येशूलाही करायचे होते, अशीही एक धारणा आहे. सॉलोमनच्या राज्याला इथोपियन एम्पायर - हाऊस ऑफ सॉलोमनही म्हटले जाते. राजा सॉलोमन आणि शिबाराणी यांचे ते साम्राज्य होते.

होली ग्रेलची कहाणी म्हणजेच राजघराण्यातील रक्ताची कहाणी. होली ग्रेल म्हणजे ख्रिस्ताचे पवित्र रक्त सामावलेला चषक असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा त्याचा संबंध मेरी मॅगडालीनशी असतो. येशू ख्रिस्ताचे राजेशाही रक्त वाहत असणाऱ्या त्या स्त्रीच्या गर्भाशयाशी याचा संबंध आहे. मेरी मॅगडालीन म्हणजेच पवित्र चषक होती. तीच तो चषक होती की ज्यात येशूचे राजेशाही रक्त वाहत होते. येशूच्या मृत्यूसमयी म्हणजेच त्याला सूळावर देतेवेळी मेरी मॅगडालीन गर्भवती होती. या अर्थाने होली ग्रेलची कथा

राजघराण्याच्या रक्ताविषयीची कथा आहे. सांगरीअल कागदपत्रांमधून हे अधिक स्पष्ट होते. या कागदपत्रांच्यानुसार sangreal हा शब्द अगदी प्राचीन काळापासून दोन वेगवेगळ्या प्रकारे लिहितात. तो पुढीलप्रमाणे :

सांगरीअल
sangreal
sang real
san greal
राजेशाही रक्त
होली ग्रेल
पवित्र चषक

Sang Real म्हणजेच राजघराण्यातील रक्त आणि होली ग्रेल म्हणजेच मेरी मॅगडालीन. अनेक ग्रंथकारांनी याची नोंद घेऊन त्याप्रमाणे दाखले दिले आहेत. त्यांपैकी काही ग्रंथ पुढीलप्रमाणे :

**THE TEMPLER REVELATION**
Secret Guardians of the True Identity of Christ[४]

**THE WOMAN WITH THE ALABASTER JAR**
Mary Magdalene and the Holy Grail[५]

**THE GODDESS IN THE GOSPELS**
Reclaiming the Sacred Feminine[६]

**HOLY BLOOD, HOLY GRAIL**
The Acclaimed International Bestseller[७]

व्हॅटिकनने चौथ्या शतकापासून हे गुपित दडवून ठेवण्याचा प्रयत्न केला. अनेक धर्मयुद्धे घडली. याविषयी उपलब्ध असलेली माहिती आणि पुरावा नष्ट केला गेला. येशूने चर्चच्या स्थापनेची जबाबदारी मॅगडालीनवर टाकली होती. तिचा संभाव्य धोका लक्षात घेऊन चर्चने तिची बदनामी करून तिच्याशी संबंधित सर्व पुरावे दडवून ठेवले आणि नष्ट केले. येशू ख्रिस्त हा मानवी प्रेषित होता. व तो एक पिता होता. त्याला एक संतती होती. या सर्व अफवा ठरवून चर्चने त्यावर पडदा टाकला. ख्रिस्ताच्या वंशजाबद्दल कुणाला काही कळले असते, तर चर्चचे अस्तित्वच धोक्यात आले असते. आणि येशूला मूलबाळ होते असे मान्य केले असते तर त्याच्या दैवी

अस्तित्वाला बाधा आली असती. सर्व मनुष्यमात्राला स्वर्गाचे दार उघडून देणारी आणि दिव्यत्वाकडे नेणारी एकमेव संस्था म्हणजे चर्च असे स्वतःचे महत्त्व घोषित करणाऱ्या चर्चला यामुळे धक्का बसला असता. म्हणून चर्चने मॅगडालीनसंबंधी सर्व पुरावे नष्ट केले. प्रायरी ऑफ सायन या पंथाने हेच पुरावे संरक्षित करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. पवित्र स्त्रीत्वाचा पूजक असा हा पंथ आजही अस्तित्वात आहे. प्रायरी पंथाची निशाणी पाच पाकळ्यांचा गुलाब ही आहे. गुलाबाचे फूल म्हणजे स्त्रीच्या शरीर सौंदर्याचे मूळ चिन्ह समजले गेले. देवतापूजन करणाऱ्या प्राचीन पंथांमध्ये गुलाबाच्या पाच पाकळ्या म्हणजे स्त्रीच्या जीवनातील पाच स्थिती समजल्या जातः जन्म, ऋतुप्राप्ती, मातृत्व, ऋतुसमाप्ती, आणि मृत्यू. गुलाबाचे उमलते फूल आणि स्त्रीचे जननेंद्रिय यांच्यात खूप साम्य आहे. याच पुष्पातून सर्व मानववंश या पृथ्वीवर जन्म घेतो. म्हणूनच आजही प्रायरी ऑफ सायन हा पंथ मेरी मॅगडालीनची देवी म्हणून, पवित्र चषक म्हणून, गुलाब पुष्प किंवा पवित्र माता म्हणून, पूजा करीत असतो. गुलाबाचे फूल पाच टोकांची शुक्रतारका आणि दिशादर्शक होकायंत्र यांच्यामध्येही थेट संबंध लावलेला आहे.

अशा प्रकारे अनेक चिन्हे आणि प्रतीकांमधून होली ग्रेलचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला गेला. अनेक प्रकारची चिन्हे आणि प्रतीके यांचा स्वर्ग मानली जाणारी जागा म्हणजे, रॉसलीन चॅपेल चर्च होय. पंधराव्या शतकात हे चर्च निर्माण झाले. एका प्राचीन मित्रेक देवळाच्या जागी, एडिनबरोच्या सात मैल दक्षिणेस हे चर्च आहे. इ.स. १४४६ मध्ये टेम्पलर सरदारांनी बांधलेल्या या चर्चमध्ये अनेक प्रकारची प्रतीके आणि चिन्हे आहेत. या चर्चला कोड्यांचे चर्चही म्हणतात. यात ज्यू, ख्रिश्चन, इजिप्शियन, मॅसन इत्यादी पंथांची चिन्हे आणि पॅगन परंपरेतील प्रतीकेही कोरलेली आहेत. राजा आर्थरच्या ॲव्हालॉन बेटाची 'रोजलाईन' ही पारंपरिक खूण आहे. ही रोजलाईन म्हणजे ब्रिटनच्या पवित्र समजल्या जाणाऱ्या

भौमितिक रचनेचा आधारस्तंभ आहे. या वलयांकित रोजलाईनवरच Rosslyn – मूळ Roslin हे गाव वसवले गेले आहे.

The Holy Grail 'neath ancient Roslin waits या ओळींवरून 'होली ग्रेलचे निवासस्थान' असेही महत्त्व या चर्चला प्राप्त होते. मेरी मॅगडालीनची रोजलाइन (Roseline) रॉसलीन चॅपेल चर्च ही आहे. गुलाबाची रेखा म्हणजे मेरी मॅगडालीनची वंशरेखा, या अर्थानेही रॉसलीन हे नाव पडले आहे. चर्चच्या कमानींवर पाच पाकळ्यांची अनेक फुले कोरलेली आहेत. चर्चच्या प्रत्येक पृष्ठभागावर कुठली ना कुठली चिन्हे कोरलेली आहेत. त्यात प्रामुख्याने ख्रिश्चन क्रॉस, ज्यू लोकांचे तारे, मॅसन पंथाचे शिक्के, टेम्पलर सरदारांचे क्रॉस, पिरॅमिड, खगोलशास्त्रीय चिन्हे, वनस्पती रोपे, पेंटॅकल आणि गुलाब यांचा समावेश आहे. रॉसलीन चर्च हे सर्व धर्मांचे, सर्व परंपरांचे मंदिर आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे निसर्गदेवतेचे आणि देवीचे मंदिर आहे. या चर्चचे मुख्य आकर्षण म्हणजे डेव्हिडचा तारा ✡. यालाच सॉलोमनचा शिक्का असेही म्हणत असत. ग्रहताऱ्यांचे निरीक्षण करणाऱ्या धर्मगुरूंचे हे एकेकाळी गुप्त चिन्ह होते. नंतर इस्रायलचे राजे डेव्हिड आणि सॉलोमन यांनीसुद्धा हे चिन्ह स्वीकारले होते.

The Holy grail 'neath
ancient Roslin waits
The blade and chalice
guarding o'er Her gates
Adorned in master's
loving art, She lies
She rests at last beneath
the starry skies [८]

उपरोक्त ओळींमध्ये आलेले तलवारीचे पाते ▽ आणि चषक △ या दोहोंचे मिलन डेव्हिडच्या ताऱ्यात होते. स्त्री आणि पुरुष यांची परिपूर्ण युती, पवित्रातील पवित्र जागा, जिथे पुरुषदेवता 'याहवे' आणि स्त्रीदेवता 'शकीना' राहतात असा समज होता. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन आणि इतर अनेक भाषांमध्ये गुलाबाला Rose हा एकच शब्द आहे. Rose या शब्दातील अक्षरे उलटसुलट केली तर Eros हा

शब्द तयार होतो. आणि इरॉस म्हणजे शारीरिक प्रेमाची ग्रीक देवता. प्रायरी पंथांच्या सूत्रांप्रमाणे येशूला सूळावर चढवले तेव्हा मेरी मॅगडालीन गर्भवती होती. पोटात असलेल्या ख्रिस्ताच्या वंशाच्या सुरक्षिततेसाठी तिला पवित्र भूमीतून पळून जावे लागले. येशू ख्रिस्ताचे विश्वसनीय काका अरिमॅथियाचे जोसेफ यांच्या मदतीमुळे मेरी मॅगडालीनने गुप्तपणे फ्रान्सपर्यंत प्रवास केला. फ्रान्सला त्यावेळी गॉल असे म्हणत. तेथील ज्यू समाजात तिला सुरक्षित आश्रय मिळाला. फ्रान्समध्ये तिने एका मुलीला जन्म दिला. तिचे नाव सारा. व येथून पुढे येशू ख्रिस्ताची वंशवेल वाढत गेली. त्यांना संरक्षण देणाऱ्या ज्यू लोकांनी मॅगडालीन आणि साराच्या जीवनाचा इतिहास व्यवस्थित लिहून ठेवला आहे. मेरी मॅगडालीनचे मूळ म्हणजे ज्यू राजघराणे. तिच्यात डेव्हिड आणि सॉलोमन यांचे पवित्र रक्त होते. फ्रान्समधील ज्यू लोक मॅगडालीनला दैवी राजघराण्यातील व्यक्ती मानतात आणि नंतरच्या राजघराण्याची मूळ माता मानतात. सांगरिअल कागदपत्रांमध्ये हा येशूचा वंशवृक्ष समाविष्ट आहे.

**होली ग्रेलः अन्वयार्थ :**

प्राचीन ख्रिश्चन परंपरेनुसार होली ग्रेल म्हणजे एक पवित्र कप, पेला किंवा चषक होय. हाच चषक येशू ख्रिस्ताने त्याच्या शेवटच्या जेवणात वापरला अशी धारणा आहे. येशूला सुळावर चढविल्यावर याच चषकात जोसेफ ऑफ अरिमॅथिया याने येशूचे रक्त गोळा केले होते असे सांगितले जाते. अनेक जुन्या आख्यायिकांप्रमाणे होली ग्रेलचे आकर्षण अनेक पिढ्यांना एक गूढ वस्तू म्हणून वाटत आले आहे. आजच्या आधुनिक युगातही ते कायम आहे. अनेक शतकांपासून लोकांना होली ग्रेलच्या शोधाची ओढ आहे. मात्र ते कल्पित आहे की वास्तव असा फरक अनेक विद्वानांना करता आलेला नाही.

Grail हा शब्द मूळ लॅटिन भाषेतल्या Gradale या शब्दापासून आला आहे. ज्याचा अर्थ एक खोल भांडे - a deep platter - ज्यात जेवण वाढले जायचे. मध्ययुगीन कालखंडात

(इ.स. ११०० ते १५०० दरम्यान) मेजवान्यांमध्ये अशा प्रकारचे भांडे वापरले जायचे. अनेक वर्षांपासून grail म्हणजे dish, ciborium, chalice, platter, goblet, किंवा stone (एक दगड) असे मानले जाते. ग्रेलमध्ये एक प्रकारची चमत्कारिक शक्ती मानली गेली, जी आजारातून बरे करते, चिरंतन आनंद प्रदान करते आणि शाश्वत तारुण्य देते. प्री-ख्रिश्चन सेल्टिक मायथॉलॉजीमध्ये याचे मूळ आहे असे अनेक इतिहासकार मानतात. होली ग्रेलला अनेक कथांमध्ये वेगवेगळी संबोधने दिली असली तरी कादंबरीत मात्र ती एक व्यक्ती मानली गेली आहे. होली ग्रेलचे ऐतिहासिक पुरावे नसल्याने ते एक मिथकच ठरते. शास्त्रज्ञ किंवा पुरातत्त्ववेत्ते यांनीदेखील याबद्दल कुठलेच भाष्य केलेले नाही. पवित्र बायबलमध्ये याबद्दल कुठलीच माहिती दिलेली नाही. होली ग्रेल हे जरी मिथक मानले तरी त्यातून सूचित होणारा अर्थ वास्तवाच्या जवळ जाणारा आहे. कादंबरीत या संकल्पनेची मांडणी एवढी प्रभावी केली आहे की ते कल्पित की वास्तव हा फरक धूसर होत जातो. बायबलमधील व्यक्ती, घटना या ऐतिहासिक कि पुराणकथा हे जसे सिद्ध करता येत नाही, त्याचप्रमाणे होली ग्रेल हे मिथक की वास्तव, हेही सिद्ध करता येत नाही.

प्रस्तुत कादंबरीत ली टीबींग या पात्राने इतिहास लेखनावर भाष्य करताना म्हटले आहे की, "इतिहास नेहमीच ताकदवान, जिंकणाऱ्या पक्षाकडून लिहिला जातो. जेव्हा दोन संस्कृतींमध्ये संघर्ष होतो तेव्हा हरणारी संस्कृती विस्मृतीत जाते. जिंकणारे लोक इतिहासाची पुस्तके लिहितात. त्यात त्यांच्याच कार्याचा पुरस्कार केला जातो आणि हरलेल्या शत्रूची बदनामी केली जाते. इतिहास म्हणजे स्वभावत:च एका बाजूला झुकलेले वृत्तांतकथन असते."[९]

इतिहासाची अशी मांडणी दोन्हीकडूनही अतिशयोक्तीपूर्ण राहू शकते. शेवटी ज्याच्या हातात लेखणी असते तोच आपल्या मनाप्रमाणे इतिहास लिहीत असतो. धार्मिक चळवळींमध्ये तर अशी स्पर्धा

टोकाची असू शकते. धर्म हा प्रत्येकाचा वैयक्तिक आणि सामूहिक जिव्हाळ्याचा विषय असतो. प्रत्येकाला आपलाच धर्म श्रेष्ठ वाटतो व जगात तोच धर्म टिकून रहावा अशी प्रत्येकाची मनोमन इच्छा व प्रेरणा असते. क्वचितच काही लोक धर्मनिरपेक्ष असतात व स्वतःच्या धर्मातील त्रुटी जाहीरपणे कबूल करतात. अशा लोकांनाही त्यांच्या धर्मातील सनातनी लोकांची भीती असते. असे जुनाट विचाराचे सनातनी लोक धर्मनिरपेक्ष लोकांचे जगणे मुश्किल करतात.

प्रस्तुत कादंबरीत होली ग्रेलचा अर्थ लावण्याचा जो प्रयत्न केला त्याला आणखी एक महत्वाची बाजू दिसून येते. कादंबरीकार डॅन ब्राऊन हादेखील येशू ख्रिस्ताप्रमाणेच स्त्रीत्वाचा समर्थक दिसतो. होली ग्रेलचा संबंध स्त्रीच्या गर्भाशयाशी लावून, त्यातून अंकुरणाऱ्या वंशाला येशूच्या वारसाचा दर्जा देऊन कादंबरीकाराने या संकल्पनेचा योग्य तो अर्थ लावलेला आहे आणि कादंबरीतील पात्रांच्या चर्चेतून तो अर्थ आपल्याला पटत जातो. यावरून कादंबरीकाराला एकूण स्त्री-जातीविषयी आस्था व सन्मान दिसतो. प्रायरी पंथामध्ये स्त्रियांना फार मानाचा दर्जा होता आणि अगदी खालच्या स्तरातील स्त्रीलाही उच्च पदापर्यंत पोहोचता येत होते. प्रायरी पंथामध्ये नेहमीच महिला सदस्यांचा समावेश होता. अनेक स्त्रिया प्रायरी पंथाच्या ग्रँडमास्टर होऊन गेल्या; पण परंपरेप्रमाणे सेनापती मात्र पुरुषच असत. त्यांनाच रक्षणकर्ते पुरुष म्हणत. द लास्ट सपर या चित्रात लिओनार्दोने मेरी मॅगडालीनला येशू ख्रिस्ताच्या उजव्या बाजूला रेखाटून तिचा सन्मानच केल्याचे दिसते. यावरून लिओनार्दो हादेखील स्त्रीत्वाचा समर्थक होता, हे सिद्ध होते. याऊलट हिंदू धर्मात तर स्त्रीला वामांगी म्हटले आहे व कुठल्याही धार्मिक आयोजनात स्त्रीला पुरुषाच्या डाव्या बाजूला बसवितात. आजही हिंदू धर्मात ही प्रथा कायम आहे. मात्र कादंबरीकाराने मेरी मॅगडालीनला येशू ख्रिस्ताच्या बरोबरीत मानून तिचे महत्त्व जगाला दाखवून देण्याचा

उल्लेखनीय प्रयत्न केला आहे. बायबलने मात्र स्त्रीला कमी दर्जाची वागणूक दिली आणि म्हणून येशूची पत्नी असलेल्या मेरी मॅगडालीनची वेश्या म्हणून बदनामी करण्यात आली. आपला वारसा मॅगडालीनने चालवावा ही गोष्ट येशूला मान्य होती. मात्र ही गोष्ट चर्चने नाकारली. पवित्र चर्चच्या अशा वागणुकीमुळे धर्मात स्त्रीला नगण्य स्थान होते असे सिद्ध होते. तसेच पुरुषाचे मोठेपण सिद्ध करण्याचा चर्चचा अट्टाहासही दिसून येतो. त्याकाळच्या पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रीवर होणारा अन्याय केवळ ख्रिश्चन धर्मातच नाही, तर अनेक धर्मांमध्ये दिसून येतो व आजही त्याचे प्रत्यंतर येत राहते. स्त्रीला सतत दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते व तिला धर्म मार्गातील धोंड मानले जाते. हिंदू धर्मात तर स्त्रीला मिळणारी अशी दुय्यम दर्जाची वागणूक जागोजागी दिसून येते. रामायण महाभारतासारख्या हिंदू महाकाव्यांचा विचार करता सीता, कुंती, द्रौपदी, अहल्या अशा अनेक स्त्रिया पुरुषप्रधान संस्कृतीच्या बळी ठरलेल्या दिसतात. जवळजवळ सर्वच धर्मांमध्ये स्त्रीची अवहेलना केलेली आहे. याबाबतीत अनेक उदाहरणे देता येतील. जगतनिर्माता पुरुष म्हणजे - ईश्वर, परमेश्वर, गॉड, अल्ला, खुदा, रब, निर्मिक या सर्व पुरुषप्रधान संकल्पना आहेत. यात स्त्रीचा उल्लेख कुठेही आढळत नाही. कधीकाळी मातृसत्ताक पद्धती असल्याची मते अनेक इतिहासकार नोंदवतात; पण ती केवळ भाकडकल्पना वाटावी, अशीच समाजरचना आजही दिसते. आजही स्त्रियांवर अन्याय होत असतात व अनेक मार्गाने तिचा पाणउतारा करण्याची संधी समाज शोधत असतो. या सर्व बाबींचा विचार करता त्या काळी चर्चने स्त्रीचे नेतृत्व नाकारले असावे असे पटत जाते. कादंबरीकाराने केलेली मांडणी पवित्र चर्चचा हा ढोंगीपणा उघड करते. त्यामुळे होली ग्रेलचा वस्तूऐवजी व्यक्ती म्हणून लावलेला अर्थ हा जास्त पटतो. होली ग्रेलच्या अस्तित्वाचे इतिहासात जरी पुरावे नसले तरी

लेखकाने लावलेला हा अर्थ जास्त स्वीकारार्ह वाटतो. या मिथकातून सुचवलेला अन्वयार्थ हा स्त्रीवर झालेल्या अन्यायाला वाचा फोडणारा आहे आणि स्त्रीत्वाचा सन्मान करणारा आहे, एवढे मात्र निश्चित.

**उपसंहार :**

मेरी मॅगडालीनकडे चर्चची सूत्रे जातील म्हणून चर्चने तिला पवित्र भूमी जेरूसलेम सोडून जायला भाग पाडले. त्यावेळी ती गर्भवती होती. अशा अवघडलेल्या अवस्थेतही मॅगडालीनला फ्रान्सपर्यंत लपत-छपत प्रवास करावा लागला. पतीच्या मृत्युचे दुःख बाजूला ठेवून त्याच्या वंशासाठी तिला धावपळ करावी लागली. तरीही मॅगडालीनने येशूच्या वंशाला जन्म देऊन तो वाढवला, जोपासला. स्वतःची पर्वा न करता पोटातल्या बाळासाठी मॅगडालीनने केलेले हे धाडस म्हणजे मातृ-प्रेमाचे केवढे मोठे प्रतीक आहे! या तिच्या वागण्यातून तिचे येशु वरील निस्सीम प्रेम आणि तिची दृढ पतीनिष्ठा दिसून येते. स्त्रीच्या त्यागाचे आणि बलिदानाचे उदाहरण म्हणून मेरी मॅगडालीनकडे पाहता येईल. येशू ख्रिस्ताच्या जीवनातील मेरी मॅगडालीनचे हे महत्त्वाचे स्थान चर्चने केवळ स्वार्थासाठी नाकारले. येशू ख्रिस्ताचा वारसा मेरी मॅगडालीन होती. तिला मूल होते. येशू नंतर हा वारसा मॅगडालीनकडे येणार होता. पुरुषप्रधान सत्ता मानणाऱ्या चर्चला हे पटणे केवळ अशक्य होते. ख्रिस्ताचे मूल सज्ञान होईपर्यंत तरी धर्मसत्ता मॅगडालीनच्या हाती द्यावी लागली असती. चर्चला हेच नको होते शिवाय मुलीचा वंश असल्यानेही चर्चला तिचे महत्व मान्य नव्हते. या सर्व घटनांमधून येशू ख्रिस्त हा मानवी प्रेषित होता व सर्वसामान्य माणसांप्रमाणेच त्याचे जगणे होते हे सिद्ध झाले असते म्हणून पवित्र चर्चने मेरी मॅगडालीनचे नेतृत्व नाकारले. ख्रिस्ताला दैवी सिद्ध करून, चर्चला पुरुषप्रधान धर्मसत्ता प्रस्थापित करायची होती. धर्म सत्तेने स्त्रियांवर लादलेले दुय्यमत्व आणि त्यांचे नाकारले गेलेले अधिकार हेच वास्तव या कादंबरीत कादंबरीकाराला

अधोरेखित करायचे आहे. होली ग्रेल या मिथकाच्या माध्यमातून कादंबरीकाराने अतिशय यशस्वीपणे हे वास्तव मांडले आहे. मिथकाचा हा सूचितार्थ वाचकाला अपरिहार्यपणे पौराणिक काळातील स्त्रियांच्या स्थानाविषयी जाणीव करुन देतो. एका पौराणिक मिथकाच्या माध्यमातून वाचकांना स्त्रीवादी विचाराकडे घेऊन जाण्याची लेखकाची हातोटी असामान्य म्हटली पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ :**


१. आ. ह. साळुंखे, "पुराणकथा", मराठी विश्वकोश, खंड १३ वा, म. रा. विश्वकोश निर्मितीमंडळ, मुंबई, १९८७
२. दि. के. बेडेकर, धर्मचिंतन, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, २००२, पृ. क्र. ४४ वरून उद्धृत
३. डॅन ब्राऊन, द दा विंची कोड, अनुवाद -अजित ठाकूर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २००६, पृ. क्र. २४१
४. Clive Prince and Lynn Picknett, Transworld Publishers. Ltd., Great Britain, 1997
५. Margaret Starbird, Inner Traditions / Bear & Company, 1993
६. Margret Starbird, Bear Company, 1998
७. Henry Lincoln - Michael Baigent and Richard Leigh, Janathan Cape, United States, 1982
८. डॅन ब्राऊन, उनि. पृ. क्र. ४३९
९. डॅन ब्राऊन, उनि. पृ. क्र. २५०-२५१


** ** **

# पंचरत्न (संत ज्ञानेश्वर, संत निवृत्तीनाथ, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम कृत) हरिपाठ : एक आकलन

**संशोधक विद्यार्थी : प्रा. घनःशाम दरणे मार्गदर्शक : प्रा. डॉ. वर्षा चिखले**
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

**प्रस्तावना :-**

वारकरी कुटुंबात जन्म झाल्यामुळे बालपणापासूनच ज्ञानेश्वरी, गाथा आणि मुख्य म्हणजे घरी चालणारा नित्य हरिपाठ ही आमच्यावरील केवळ धार्मिकच नव्हे तर इतरही अंगाने पुष्ट करणारी संस्कार त्रयी. वारकरी लोक आंघोळीला बसले की पंच हरीपाठापैकी कुठलातरी हरिपाठ म्हणत राहातात. साधारण आंघोळ आणि कपडे घालेपर्यंत त्यांचा तो हरिपाठ संपतो. पुढे थोडीशी पूजा आणि ज्ञानेश्वरीच्या काही ओव्या वाचून झाल्या की ही मंडळी सांसारीक कामे करायला मोकळी होतात. अनेक कुटुंबामध्ये सायंकाळी

वारकरी परंपरेने चालत आलेला ज्ञानेश्वरांचा हरिपाठ सगळ्यांनी मिळून करण्याचा परिपाठ आढळून येतो. वारकरी संप्रदायामध्ये संत ज्ञानेश्वर महाराज, एकनाथ महाराज, नामदेव महाराज, तुकाराम महाराज आणि निवृत्तीनाथ महाराज ह्यांचे हरीपाठ, पंचरत्न हरिपाठ म्हणून प्रसिद्ध आहेत. बहुतांश वारकऱ्यांना पंचरत्न हरिपाठ मुखोद्गत आहेत. हरिपाठाची परंपरा मौखिक परंपरेतून चालत आलेली असूनही त्यात अपवाद वगळता पाठभेद नाहीत हे विशेष. वारकरी संप्रदाय प्रामुख्याने सर्वसाधारण बहुजन समाजात पोहचलेला पंथ आहे. दिवसभर काबाडकष्ट करून संध्याकाळी घरी परतल्यानंतर घरच्या घरी किंवा देवळात असेल तर हरिपाठाला 10-20 लोकांनी एकत्र येण्याची पद्धत. ही सगळी माणसं अशिक्षितच पण श्रवण भक्तीतून हरिपाठ पाठ व्हायला वेळ लागायचा नाही. हरिपाठाचे लेखन संतांच्या गद्यापेक्षा बरेच सुगम आहे. विशेषत्वाने ज्ञानेश्वरी आणि ज्ञानेश्वरांचाच हरिपाठ, एकनाथी भागवत आणि एकनाथांचा हरिपाठ यांच्यातील सुगमतेची तुलना केली तरी हा फरक सहज लक्षात येतो. हरिपाठात ईश्वराची स्तुती, त्याच्या अपरिमित सामार्थ्याचे वर्णन, संत मंडळींनी केले आहे. त्याची शक्ती अपरंपार असून मनुष्य जीव त्याच्या पुढे किरकोळ आहे मात्र ईश्वरीकृपा प्राप्त करण्याचा अधिकार मनुष्याला आहे. आणि कृपा प्राप्त करण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे नामस्मरण होय. हेच सर्व संतांच्या हरिपाठातून वारंवार सांगितले गेले आहे.

रोज सायंकाळी दिवे लागणीला आराध्याचे स्मरण सर्व मिळून करावे या हेतूने हरिपाठ केला जातो. हरिपाठ कसा करावा?, काय साधने असावी? याबाबत काहीही कर्मकांडात्मक सांगितलेले नाही. 'असावे एकाग्री स्वस्थ चित्त मन, उल्हासे करून स्मरण जीवी।" किंवा "ठायीच बैसोनी करा एक चित्त आवडी अनंत आळवावा।" अर्थ असा की, हरिपाठ करणाऱ्यांनी मन एकाग्र व चित्त स्वस्थ करून हरिपाठ करावा. वारकरी

संप्रदायाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे या संप्रदायाने ईश्वर आणि भक्त यांच्यातील मध्यस्थ नाकारले आणि भक्ताला थेट ईश्वराशी जोडले. सोबतच संप्रदायाने सर्व कर्मकांडे नाकारून फक्त नामस्मरणाचे महत्त्व प्रस्थापित करीत ईश्वराकडे जाण्याचा सोपा मार्ग दाखविला. म्हणूनच हरिपाठात सातत्याने नामस्मरणावर भर दिसतो. या नामस्मरणाचे महत्त्व सांगताना तुकाराम महाराज म्हणतात-

**‘नामसंकिर्तन साधन पै सोपे । जळतील पापे जन्मांतरीची ।**
**न लगती सायास जाणे वनांतरा। सुखे येतो घरा, नारायण ॥**
**ठायीच बैसुनी करा एकचित्त आवडी अनंत आळवावा ।**
**राम कृष्ण हरी विठ्ठल केशवा। मंत्र हा जपावा सर्वकाळ,**
**याहून आणिक असता पै साधन । वाहत असे आण विठोबाची॥**
**तुका म्हणे सुखा काय उणे, राहे समाधानी चित्ताचीया ।′**

असे सांगितलेले आहे. तुकारामांच्या या अभंगात पाचही हरिपाठांचे सार सांगितले आहे असे आपण म्हणू शकतो. कुठलीही साधने नकोत, विशेष जागा नको, तुम्ही जिथे असाल तिथे देवाचे नाव घ्या, त्यातूनच तो ईश्वर तुमच्या दाराशी येतो. हरिपाठामध्ये सर्व संतांनी नामाचे महत्त्व विस्ताराने वर्णन केले आहे. कर्मकाडांच्या बजबजपुरीत अडकलेल्या सर्वसामान्य लोकांना त्यातून बाहेर काढण्यासाठी वारकरी संतांनी नाममार्ग रूढ केला. देवाचे नाव घेण्यासाठी सर्वांना मोकळीक असून संत एकनाथांनी वर्णिल्या प्रमाणे-

**हरी बोला घेता, हरी बोला देता**
**सर्व कार्य करीता। हरी बोला।**
**हरी बोला एकांती। हरी बोला लोकांती ।**
**देहत्यागा अंती हरीबोला ॥**

**हरी बोला भांडता, हरी बोला कांडता ।**
**उठता बसता हरी बोला ।**
**हरी बोला जनी, हरी बोला विजनी ।**
**एका जनार्दनी हरी बोला ॥**

हरिनामाचा उच्चार तुम्ही कुठेही करू शकता. हे या अभंगात विस्ताराने सांगितले आहे. सोवळ्यामध्ये प्रतिष्ठित झालेली भक्तीपूजा वारकरी संप्रदायातील संतांनी केवळ नाकारलीच नव्हे तर लाथाडली सुद्धा. आजही पूजा कशी करावी? देवाला काय वाहावे? काय वाहू नये? याबद्दलचे संकेत कसोशीने पाळले जातात. पूर्वी ही बंधने तर अधिकच कठोर होती. सगळीकडे स्वयंघोषित धर्ममार्तंडांचा सुळसुळाट झालेला होता.

**अर्थे लोपली पुराने। नाश केला शब्द ज्ञाने**

असे कारित संत तुकोबांनी शब्दज्ञानाचे अवडंबर माजवणाऱ्या स्वयंघोषित भाष्यकारांवर टिकेची झोड उठवत-

**म्हणूनी शब्द ज्ञानी, करीती चावटी ।**
**ज्ञान पोटासाठी विकूनीया ।**

असा त्यांचा पोकळपणा उघड केला.

अनुभवाशिवाय केवळ शब्द ज्ञान पाखडणारे भोंदू शब्दच्छल करून सर्वसामान्य भाविकांना लुबाडून आपल्या तुंबड्या भरीत होते. तर कुणी भगवे कपडे घालून लोकांना गंडवीत होते. अशा वातावरणात केवळ नामस्मरणाने मनुष्य देवाच्या पायरीशी पोहचू शकतो ही भावना सर्वसामान्यांच्या हृदयापर्यंत पोहचविण्यासाठी प्रथम ज्ञानदेवांनी हरिपाठ रचून वारकऱ्यांनी त्याचा नीत्यपाठ करावा अशी परंपरा घालून दिली. त्यांचेच अनुसरण करीत या परंपरेला आपापल्या काळात अधिक बळकटी देण्यासाठी नामदेव, एकनाथ, तुकारामांनी हरिपाठाची रचना केली असावी असे दिसते. संतांच्या हरिपाठ रचनेत बरेचसे साम्य आहे. ते साम्य विषय, आशय आणि रचनेच्या अनुषंगाने दिसते. ज्ञानोबांनी २९, एकनाथांनी २५,

नामदेवांनी ३४, तुकोबांनी ३३ तर निवृत्तीनाथांनी २५ अभंगांचा हरिपाठ लिहिला आहे. पूर्वसुरींनी सांगितलेल्या चांगल्या गोष्टींचे विस्मरण होऊ नये यासाठी नंतरच्या महानुभावांनी घेतलेली काळजी इथे आपल्याला दिसते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे यापैकी कुणीही वा त्यांच्या शिष्यांनी ज्ञानेश्वर माऊलींच्या हरीपाठाच्या जागी दुसरा हरिपाठ प्रस्थापित करावयाचा प्रयत्न केला नाही. गेली ८०० वर्षे महाराष्ट्र आणि मराठी माणूस असणाऱ्या ठिकाणी जगभर जिथे कुठे वारकरी संप्रदायाची मंडळी गेली असेल तिथे हरिपाठ केला जातो. तो एकट्याने केला जातो तसेच कुटुंबासह किंवा समुहासह सार्वजनिक ठिकाणीही तो केला जातो. ती एक सामूहिक अभिव्यक्ती असते. रूपाचा, ध्यानाचा अभंग आणि मग हरिपाठाचे अभंग, ज्ञानेश्वर-तुकारामांच्या गुरू परंपरेचे सहा अभंग आणि शेवटी आरती-प्रसाद असा हरिपाठाचा क्रम असतो. साधारण ३०-३५ मिनिटांचा काळ यासाठी लागतो. हजारो वारकऱ्यांच्या कुटुंबांत हा नित्यपाठ चालतो. धार्मिकता थोडी बाजूला ठेवली तरी यातून मिळणाऱ्या इतर गोष्टीही महत्त्वाच्या आहेत. 'देवाचिया दारी, उभा क्षणभरी' असे कल्पून आपल्या ठायीच बसून अनंताला आळवताना मानसिक शांती-समाधान लाभते. तेवढा वेळ इतर सांसारिक चिंतांपासून आपण दूर जातो. नित्यपाठातून पाठांतर (आशयासह) उच्चारशुद्धता, शब्दार्थ, शब्दसमृद्धी या हरीपाठाच्याच देगण्या म्हणाव्या लागतील. शब्दांसह येणारा सूर, ताल-लय सुद्धा या नित्यपाठामुळेच गवसते. वारकरी पंथाशी एकनिष्ठ असणारी मंडळी अनेकदा कर्मकांडापासून दूर असलेले दिसतात. घुमारा देव असो की नवस्या, मेसकाई-खेसकाई असो की साती आसरा, भगवा भोंदू, कर्मकांडी पसारा, योग याग, यज्ञ यापासून वारकरी कुटुंब चार पावले सुरक्षित अंतरावर ठेवण्याचे महत्कार्य हरि पाठामुळे घडते असे निरीक्षण आहे. सगळ्यांच्या मनावर ठसलेल्या नाममहिम्यामुळे हे घडत असावे. तुकारामांनी

सांगितलेल्या 'तिर्थी धोंडापाणी, देव रोकडा सज्जनी।' आणि 'अंतरी शुद्ध वाचेचा निर्मळ। त्याच्या गळा, माळ असो नसो।' या उक्तीप्रमाणे जगण्याचा प्रयत्न वारकरी करतात. संतांच्या लिहिण्यातील सहजता, प्रकाशसामर्थ्य प्रत्ययास येऊ शकते ते हरिपाठामुळेच. ते एका प्रकारचे जीवन दर्शनच होय.

**परिमळ गेलीया, ओस फुल देठी ।**
**आयुष्या शेवटी देह तैसा ॥**
**घडी घडी काळ वाट याची पाहे ।**
**अजून किती आहे अवकाश ॥**

देहाची नश्वरता अतिशय सुरेख शब्दांत, जात्या काळाच्या, सुकल्या फुलांच्या प्रतिकांच्या रुपाने सांगणारा हा एकनाथ महाराजांचा अभंग जीवनाची क्षणभंगुरता लक्षात घेऊन वाटचाल करण्याची आठवण देतो. शब्दज्ञानाला आलेले अवास्तव महत्त्व, शब्द ज्ञानाने धारण केलेली अहंता, तिचा ताठा आणि ही सगळी मिराशी फक्त मुठभर लोकांची, 'आम्ही म्हणू ते कर्म आणि आम्ही सांगू तो धर्म' असे सांगणारे धर्माचे भाष्यकार कुत्रीच्या पिलागत प्रसवले आणि त्यांनी सर्वसामान्यांना वेठीस धरावयास सुरूवात केली. अशी शतकामागून शतके जात होती. जीव-शिव एक आहेत असे प्रतिपादन करणाऱ्या पहिल्या शंकराचार्यानंतर ३००-४०० वर्षांनी संत ज्ञानेश्वरांनी अगदी कोवळ्या वयात हे सगळं ओळखून भागवत धर्माची पताका रोवली. ज्ञानभक्तीपेक्षा नामभक्तीची पताका उंच धरणारा ज्ञानेश्वरी सारखा अद्वितीय ग्रंथ भावभक्तीची प्रतिष्ठापना करणारा होता. ही भावभक्ती विशुद्ध मनाने केलेल्या नामस्मरणाने साध्य होऊ शकते हे त्यांनी अखिल मराठी मनावर बिंबवले आणि त्यांनी प्रशस्त केलेल्या पायवाटेवरून पुढील संत मंडळींनी मार्गक्रमण केले. **'वेदातांचे बीज, हरी हरी अक्षरे । पवित्र सोपे रे हेच एक ।।'** या वरील त्यांचा विश्वास घट्ट होता. **'वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा। येरांनी वहावा भार माथा ।।'** म्हणणारा योग्य

स्वाभीमान त्यांच्या ठायी असल्यामुळे वारकरी संप्रदायाची नामसोपान परंपरा वापरून लाखो वारकरी नामभक्तीमध्ये चिंब झाले. **‘हरीनामामृत सेवीं सावकाश मोक्ष त्याचे भूस दृष्टीपुढे’** अध्यात्मातील मोक्ष कल्पनेची खिल्ली उडवणारा हा भावोद्गार हरिनामाचे महत्त्व अधोरेखित करणारा ठरतो. केवळ पोथ्या वाचून स्वतःला विद्वान समजणारे आणि प्रेमभावाशिवाय रात्रंदिवस फक्त टाळकुटी भक्ती करणाऱ्या पढतमुर्खांना संत एकनाथांनी चांगलेच फटकारले आहे. हा टोला सर्वच दांभिक भक्तांना झोंबावा असा आहे.

**‘प्रेमाविन भजन नाकाविन मोती, अर्थावाचून पोथी वाचू नये’**

एवढ्या स्पष्ट शब्दांत एकनाथ महाराज दांभिकांची कानउघाडणी करतात.

संत तुकारामांचे हरिपाठांचे अभंग त्यांच्या इतर अभंगाप्रमाणेच मिताक्षरी आणि मोठा आशय व्यक्त करणारे आहेत. तुकोबांच्या हरिपाठाचे वैशिष्ट्य म्हणजे नामजप करून जीवन उद्धरलेल्या नळ, युधिष्ठीर, जनक, जनार्दन, गौतम, कश्यप, भारद्वाज, अत्री, अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा आदी अनेकांची नामावली देऊन त्यांचेप्रमाणे आपणही संसाररूपी भवसागरातून सहज तरून जाऊ शकतो हा विश्वास तुकारामांनी जागवला आहे. नामरुपी शब्द धन हाच ईश्वर पुजेचा खराखुरा मार्ग होय हे सांगताना तुकोबाराय म्हणतात -

**शब्दाचिया भावे, केला उपचार, तेणे सर्वेश्वर संतोषला।**
**शब्दाचिया करे, करविले भोजन। धाला नारायण तेणे सुखे॥**
**पुजू नारायण शब्दांचे सुमने, मंत्र पुष्प तेणे वाहियेले ॥**

अन्य एका अभंगात तुकारामांनी मोगरा, शेवंती, तुळस आदींची उपमा मनास देऊन ज्याप्रमाणे देवाला फुल अर्पण करून त्याच्या सुंदर रूपाकडे आपण मंत्रमुग्ध होऊन पाहातो तसे देवाला निरपेक्षपणे मन अर्पण करा आणि मुक्त व्हा असे या अभंगात सांगितले आहे.

**मन हा मोगरा, अर्पूनी ईश्वरा, पुनरपि संसारा येणे नाही ।**
**मन हे शेवंती,अर्पूनी भगवंती, पुनरपि संसृती येणे नाही॥**
**मन हे तुळसी, अर्पूनी ऋषीकेशी, पुनरपि जन्मासी, येंणे नाही ॥**

स्व-दोष जावेत, ईश्वराने दोष घालवण्यास मदत करावी अशी आर्जवे हरिपाठात जागोजागी आढळतात. **'इतुके करी देवा ऐके वचन । समूळ अभिमान जाळी माझा॥'** माझा अभिमान नष्ट कर, मला समदृष्टी प्रदान कर अशी भावना प्रत्येकच हरिपाठकार ईश्वराजवळ व्यक्त करतो.

वारकरी पंथाची धुरा ज्ञानेश्वरानंतर आपल्या खांद्यावर समर्थपणे पेलीत आणि पुढे भारतभर भ्रमण करीत 'नाचू किर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लाऊ जगी' म्हणणारे संत नामदेव सुद्धा हरिपाठ लिहिते झाले. त्यांच्या हरिपाठातून सुद्धा-

**नामाचा महिमा, कोण करी सीमा ।**
**जपावे श्रीरामा, एकाभावें॥**
**उपदेश सुगम, ऐकारे एक ।**
**नाम हे सम्यक विठ्ठलाचे॥**

असे सांगत....

**राम कृष्ण माळा घालीता अढळ**
**तुटेल भव जाळ माया मोह॥**

हा विश्वास त्यांनी भक्तांना दिला आहे. ज्ञानदेवांचे बंधू आणि गुरू निवृत्तीनाथ महाराजांनीसुद्धा **'हरीनामे उद्धरें हरीनामे उद्धरें। वेगी हरी त्वरे उच्चारी जो।'** असे म्हटले आहे. मनुष्य कल्पनेच्या कोषात गुरफटलेला असतो हे सांगताना एकनाथांच्या **'कल्पनेपासूनी कल्पिला जो ठेवा तेणे पडे गोवा, नेणें हरी।'** याशी अर्थ साधर्म्य असणाऱ्या ओळी निवृत्तीनाथांनी लिहिलेल्या आहेत.

**'कल्पना, काजळी, कल्पिलें कवळी। कैसेनी जवळी, देव होय ॥**

**टाकी हे कल्पना दुरीत वासना । अद्वैत नारायणा भज कारे ॥**

तसेच **'निवृत्ती हरिपाठ नाम हेचि वाट। प्रपंच फुकट दिसे आम्हां॥'**, **'सर्वाभूती दया शांती पै निर्धार। तो योग साचार जनी इथे॥'** ईश्वराकडे जाणारी एकमेव वाट म्हणजे हरिपाठ आणि त्यातून होणारे नामस्मरण होय. सर्व भूतांमध्ये दया, शांती गुणांचा संचार व्हायचा असेल तर हरिपाठा खेरीज अन्य पर्याय नाही असे निवृत्तीनाथ म्हणतात.

मनोव्यापारातील 'कल्पना' संकल्पनेबद्दल बरेच काही लिहिता येईल. मात्र अध्यात्मात सुद्धा या संकल्पनेचे स्पष्टीकरण आपल्याला दिसते. संत नामदेवांनी हरीदासांसाठी विठ्ठलाजवळ मागण्यांची सनद लिहिताना काय मागितले तो अभंग मुळातूनच वाचण्यासारखा आहे.

**आकल्प आयुष्य व्हावे, तया कुळा। माझिया सकळा, हरीचे दासा॥**

**कल्पनेची बाधा, न हो कदा काळी। ही संत मंडळी सुखी असो॥**

**अहंकाराचा वारा, न लागो राजसा। माझिया विष्णुदासा भाविकांशी॥**

**नामा म्हणे तया, असावे कल्याण। ज्यामुखी निधान पाडुरंग॥**

मुख्य म्हणजे कल्पनेची बाधा आणि अहंकार या दोन गोष्टी नकोत. या दोन गोष्टीमुळे मनुष्य जनावर होऊ शकतो हे संतांना चांगले ठाऊक होते. या दोन गोष्टींपासून लोकांना दूर ठेवण्यासाठीच संतांनी नित्य हरिपाठाचे महत्त्व सांगितले आहे. संत ज्ञानेश्वर म्हणतात **'हरीपाठी गेले, ते निवांतची ठेले, भ्रमर गुंतले सुमन कळीके॥'** नामस्मरण करणारा कोण्या जातीचा, गोत्र वा कुळाचा गरीब, श्रीमंत, स्त्री, पुरूष कुणीही असो त्याने भावयुक्त हरीचे नाव घेतले की तो ईश्वररूप होतो. **'जात, वित्त, गोत, कुळ, शीळ, मात । भजेका त्वरीत भावना युक्त ॥'** असेही माऊली सांगतात. हरिपाठ करावयास जसे विशिष्ट स्थान आणि साधनांची गरज

नाही त्याचप्रमाणे त्याला काळ वेळ पाळण्याचीही गरज नाही.

**'काळ वेळ नाम उच्चारीता नाही। दोन्ही पक्ष पाही उद्धरती'**

असेही ते सांगतात. हरी फक्त भावबळाने आकलन होऊ शकतो अन्य मार्गाने नाही असे सांगतांना ज्ञानेश्वर म्हणतात-

**'भावबळे आकळें एरव्ही नाकळें ।करतळी आवळें तैसा हरी॥'**

आणि भावरूपी बळ नामरूपी मंत्राशिवाय येऊ शकत नाही. हे ही संत वारंवार प्रतिपादन करतात.

हरिपाठ हा पंथियांचा निदीध्यास व्हावा, तो सहज अंगी रूजावा अशी हरीपाठाची रचना सोपी आहे. तो एका विशिष्ट लयीत म्हणता येतो. स्मरणांस तुलनेने सोपा आहे. त्यामुळे हरिपाठ सांप्रदायिकात नीत्य पाठ म्हणून प्रचलित व प्रिय झाला. ८०० वर्षापासून अखंड घरोघरी सुरू आहे. भजन, किर्तन, प्रवचन, भागवत, निरूपन इत्यादींचे जसे वेगवेगळे महात्म्य वर्णन केले जाते त्यापेक्षा हरिपाठ यासाठी वेगळा ठरतो की तो प्रयोजन रहीत आहे आणि तो प्रसंगनिष्ठ नाही तर नित्यपाठ आहे. हरिपाठाचे संस्कार मूल्य, भजन किर्तनापेक्षा खूप मोठे आहे. वारकरी कुटुंबातून आलेल्या लोकांशी चर्चा केली असता अभ्यासकाला माझ्या बोलण्यातील तथ्य लक्षात येईल. हरिपाठ म्हणजे देवाशी सलगी करणे, पत्ररूपी संवाद साधणे होय असे मानणाऱ्या संत तुकारामांच्या अभंगाचा दाखला हरिपाठाचे सामर्थ्य उलगडून दाखवणारा ठरावा.

**विनविजे ऐसे भाग्य नाही देवा ।**
**पायांशी केशवा सलगी केली ॥**
**धीटपणे पत्र लिहिले आवडी ।**
**पार नेणे थोडी मति माझी ॥**
**जैसे तैसे माझे बोल अंगीकारी ।**
**बोबड्या उत्तरी गौरवितो ॥**

**निष्कर्ष :-**

१) नामस्मरणाचे महत्त्व प्रतिष्ठापित करण्यासाठी

हरिपाठाचे माध्यम संतमंडळींनी वापरले.

२) वारकरी पंथाचा उपदेशसार हरिपाठात समग्रपणे आलेला आहे.

३) संतांचे इतर अभंग किंवा त्यांच्याच इतर लेखनापेक्षा हरिपाठाच्या अभंगांची काठिण्य पातळी कमी आहे.

४) कर्मकांडानी बरबटलेल्या भक्ती पूजेची टिंगल टवाळी करीत भावरूप भक्ती ला हरिपाठाचे माध्यमातून प्रतिष्ठापित करण्याचा प्रयत्न संतांनी केला.

५) पाचही संतांच्या हरिपाठ रचनेत विषय आशय आणि रचनेच्या अंगाने मोठे साम्य आहे.

६) हरिपाठ परंपरेने ज्ञानभक्ती पेक्षा नाम भक्तीला गौरवले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. संत तुकाराम गाथा
2. संत नामदेव गाथा
3. सकल संत गाथा
4. पंचरत्न हरिपाठ
5. एकनाथी भागवत
6. ज्ञानेश्वरी

***

# मातृदेवता रेणुका व तिच्या पुराकथांचा अन्वयार्थ

**संशोधक विद्यार्थी : कु. स्नेहा र. टोम्पे**
**मार्गदर्शक : प्रा. डॉ. सुवर्णा गाडगे**
श्री. शिवाजी कला आणि वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.

**प्रस्तावना :-**

समस्त विश्वात माता हा आत्यंतिक जिव्हाळयाचा विषय आहे. नवमास जिच्यायोगे भरणपोषण झाले, निर्व्याज प्रेम आयुष्यातल्या प्रत्येक टप्प्यावर मिळत गेले. तिच्याप्रती प्राणीमात्रांच्या किंबहूना मनुष्याच्या मनात हळवा कोपरा असणे स्वाभाविक आहे, नव्हे ती नैसर्गिक प्रेरणाच आहे. सिंधू संस्कृतीत मातृपूजनाची मोठी परंपरा . तत्कालीन समाजही मातृपूजक होता. कारण

महिलेच्या पुनरुत्पादन शक्तीमुळे तिला विशेष स्थान होते. आपापल्या टोळीवजा समूहातील सर्वांचे रक्षण करणे, पालनपोषणाची जबाबदारी स्वीकारणे आणि समूहशक्ती वाढवीण्यासाठी कार्यरत असणे या बाबी त्या मातांना समूहाची प्रमुख बनवतात. त्यांच्या असामान्य कतृत्वामुळे समूह प्रेरणा म्हणून या मातांना देवतास्वरुपात पाहू लागला. त्यांच्याविषयी अनेक कथा समाजात प्राचिआढळतेन वृक्षाच्या मुळांसारख्या पसरल्या. त्यांच्यामुळे तत्कालीन समाजदर्शन होते.

त्या माता ज्या पुढे देवता म्हणून पुजल्या गेल्या त्यांपैकी एक म्हणजे रेणुका. रेणुका ही मातृसत्ताक संस्कृतीच्या साखळीची एक महत्त्वाची कडी. रेणुकेचे अस्तित्व हे येल्लम्मा, मरिअम्मा यांच्या अस्तित्वाशी समरूप होत प्रवाहित होते व मातृसंस्कृतीत नवनिर्माणाशी थेट नाते सांगते. रेणुकेच्या अस्तित्वाचा, कर्तृत्वाचा अनेक अंगांनी आढावा घेणे गरजेचे ठरते.

**उदिद्ष्ट्ये :-**

1) घट प्रतिकाशी संलग्न असणा-या मिथकांचे अर्थ उलगडणे.
2) मातृदेवता रेणुकेचा शेतीशी, पुनरुत्पादनाशी असणा-या संबंधाचा मागोवा घेणे.
3) एल्लम्मा, रेणुका व भूदेवी यांचा परस्पर संबंध शोधणे.
4) मातृदेवतांची संस्कृती पुरुषी वर्चस्वाने झाकोळते काय याचा आढावा घेणे.

**पुराकथांतील रेणुकेचे चित्रण :-**

पुराकथांनुसार अथवा धार्मिक समजुतींनुसार ईक्ष्वाकुवंशीय राजा प्रसेनजित उर्फ रेणु हा कान्यकुब्ज देशात राज्य करीत होता. त्याने अपत्यप्राप्तीसाठी कन्याकामेष्टी यज्ञ केला होता. रेणुका हा महादेवाचा प्रसाद असून तिचे अवतरण हे यज्ञातून झाल्याचे स्कंदपुराणातील सहयाद्रीखंडात नमुद आहे. वयानुरुप विवाहयोग्य झाल्याचे पाहताच तिचे स्वयंवराचे आयोजन करण्यात आले होते. त्या स्वयंवरात अनेक ठिकाणचे राजे उपस्थित असतानाही रेणुकेने

त्यावेळी जमदग्नी ऋषीला वरले. आपल्यासमोर एक राजकन्या ऋषीला वरते हे पाहुन स्वयंवराला आलेले राज्ञवृंद अपमानित होऊन प्रसेनजितावर हल्ला चढवते झाले. मात्र जमदग्नी ऋषी त्या सर्वांवर मात करून रेणुकेशी विवाह करतो.

पुढे महाभारताच्या वनपर्वानुसार रेणुकेला रुमण्वान, सुषेण, वसु, विश्ववसु व परशुराम अशी अपत्य प्राप्ती झाल्याचे दिसते. आश्रमात आपले जीवन पातिव्रत्य व्रतासह व्यतित करीत असताना मोहाच्या एका क्षणाला बळी पडून नदीत राण्यांसह क्रिडासक्त असलेल्या राजावर : कार्तविर्य अर्जुनावर तिची नजर पडते. पातिव्रत्य व्रताचा भंग होतो. परिणामी शासन म्हणून जमदग्नी पुत्राकरवी रेणुकेचे डोके उडवतो. रेणुकामहात्म्यानुसार रेणुकेचा पुत्र परशुराम पित्याची आज्ञा पाळतो, जी आधीच्या चार पुत्रांनी अव्हेरली असते. त्या चार पुत्रांना जमदग्नी पितृक्षोभाच्या पातकांतर्गत विविध पशुपक्षांच्या योनीत खितपत पडण्याचा शाप देतो व परशुरामास इच्छित वर मागण्यास सांगतो. परशुराम मातेचे पुनरुज्जीवन, स्वत:करीता मातृहत्येच्या पातकापासून मुक्ती, दिर्घायुष्य सोबतच भावंडांना त्यांनी केलेल्या अवज्ञेकरिता क्षमा करावी अशा वरांची मागणी करतो. त्याची पुर्तता म्हणून जमदग्नी त्यास मातेचे शिर आणून धडावर ठेवल्यास ती पुर्ववत होईल असे आश्वासन देतो. परंतु शिर चांभाराच्या पाण्याच्या कुंडीत पडल्याने अपवित्र झाले. सबब तिच्यासमच दिसणाऱ्या मातंगीचे शिर परशुराम आणून धडावर लावतो. लोकगीतांमध्येही त्याचा उल्लेख आहेच.

" शिर मातंगी धड
रेणुका
अशी आमची
यल्लम्मा"

देवी यल्लम्माच्या पंथात गायल्या जाणाऱ्या गीतांमधील एका गीताचा हा तुकडा होय. लोकगीतांमधून तिच्या भक्तांनी रचलेल्या रचना बऱ्याच बाबी स्पष्ट करतात. वरील आशयाच्या अनेक पुराकथांच्या विविध आवृत्या प्रचलित आहेत. कुठे मातंगी तर कुठे यल्लम्मा आपले शिर गमावते.

## रेणुका आणि घटाचा सहसंबंधः-

रेणुकेच्या अनेक पुराकथा अस्तित्वात आहेत. मुळात पुराकथा या परंपरेने चालत आलेल्या असतात. रेणुकेच्या पुराकथा निरनिराळया स्त्रोतांमधून वाचून किंवा प्रचलित मिथककथा ऐकूण ऐकूण वेगवेगळया आवृत्तींचा संग्रह होत गेला आहे. महाभारतातील वनपर्वात रेणुकेच्या पुराकथेचा उल्लेख आलेला आहे. त्याचप्रमाणे स्कंदपुराणातील सह्याद्रीखंडातदेखील रेणुकेच्या जन्मापासूनचा आलेख अला आहे. आलंपुराचे स्थलमहात्म्यही रेणुकेची पुराकथा सांगते. या सर्व लिखित स्वरूपातील आवृत्त्या होत. मात्र काही आवृत्त्या अशाही आहेत ज्या लिखित स्वरूपात उपलब्ध नाहीत. लोककथांच्या क रूपात त्या अविश्रांत प्रवाही असतात. कधी त्या परंपरेने मुखोद्गत असलेल्या किंवा धार्मिक गाण्यांच्या ओळींतून तर कधी गोंधळासारख्या लोकगीतांमधून पुढे येतात. कधी महिलावर्ग त्यास ओव्यांमधून जिवंत ठेवतो. जरी हे लिखित वाङ्मय नसले तरी लोकांच्या माध्यमातून अथक प्रवाही असल्याने घटनाक्रम सांगणारा त्या मोठा आधार असतात.

वरील लिखित व मौखिक दोन्ही प्रकारच्या पुराकथांमध्ये काही फरक जरूर आहेत. मात्र एक समान सूत्र सगळ्यांत आढळते. शिवाय सर्व पुराकथांमध्ये एक सामायिक घटक आहे जो कथेतील नायिका रेणुकेसोबत सातत्याने असतो. तो घटक म्हणजे घट होय. सर्व पुराकथा सांगतात की घटाशी संबंधित काही असामान्य शक्ती रेणुकेकडे आहेत. आणि जमदग्नी रेणुकेस दंड देतो तेव्हा तो इतर कुठल्याही दंडाऐवजी केवळ शिरच्छेदाचाच दंड सुनावतो. या बाबी लक्षात घेण्याजोग्या आहेत. त्याचा बारकाईने अभ्यास करण्यासाठी काही आवृत्त्यांचा परामर्श ठिकाणी घेतला आहे. त्यातील मुख्य सूत्र पुढील प्रमाणे.

१. दक्षिण-कथा सांगते की, पातिव्रत्याच्या सामर्थ्याने रेणुका (मरिअम्मा) जलगोल बनवू शकत असे. आणि कुठल्याही पात्राशिवाय त्या पाण्याला स्थैर्य

देवुन आश्रमास नेऊ शकत असे. तसेच नेसुचे वस्त्र हवेत अधांतरी वाळवू शकत असे. एकदा त्या जलगोलात आकाशातून उडणा-या गंधर्वाचे जोडपे प्रतिबिंबित होते. त्याकडे क्षणैक मोहीत झालेल्या रेणुकेचे (मरिअम्मा) पातिव्रत्य भंगून जलगोल मोडून तिचे अधांतरीचे वस्त्र ओले होते. परिणामी संतप्त जमदग्नी शिरच्छेदाची शिक्षा सुनावतो. आणि मुलाकरवी अमलातही आणतो. वनात जात असताना ती मृत्यूभयाने घाबरून एका अस्पृश्य स्त्रीला बिलगते. मात्र परशूराम बर्बरतेने दोघींचीही मस्तके उडवतो. पुढे तो त्यांस जिवीत करण्याच्या हेतूने दोघींचीही मस्तके धडांवर ठेवतो आणि दोघीही जिवंत होतात. परंतु दोघींच्याही मस्तकांची अदलाबदल होते.

2. आलंपुरच्या स्थलपुराणात दिसते की, रेणुका आपल्या आश्रमात नेण्यासाठी पाणी घ्यायला नदीच्या काठावर येते. मात्र पात्ररहित येते. कारण कच्च्या मातीच्या घटात पाणी आणण्याचे सामर्थ्य पातिव्रत्य व्रतायोगे कमावले असते. मात्र नदीत कार्तविर्य अर्जुन या सपत्निक जलक्रीडा करणा-या राजास पाहून ती जराशी विचलित होते. व्याभिचारिणी ठरते. कच्च्या मृत्तिका घटातून पाणी नेण्याचे तिचे सामर्थ्य लोप पावते. व ती ओलेती आश्रमात पोचते. परिणामी पुत्राकरवी शिक्षा मिळवती होते. परशुराम तिचे मस्तक उडवतो.

3. आणखी एक पुराकथा सांगते की रेणुका आपल्या वस्त्राची मोट बांधून पाणी साठवण्याची क्षमता पातिव्रत्य व्रतायोगे अंगी बाळगत होती. मात्र सरोवरात राण्यांसह क्रिडासक्त असलेल्या चित्ररथ नामक मर्तिकावत देशाचा राजा तिस आकर्षित करतो. त्यामुळे रेणुका सामर्थ्यहीन होऊन वस्त्रातून पाणी सांडून तिचे वस्त्र भिजते. सबब जमदग्नी हा पुत्राकरवी शिक्षा ठोठावतो, अंमलबजावणीही करवतो.

स. अं. डांगे आपल्या पुराकथांचा अर्थ या लेखसंग्रहात वरील तिनही पुराकथांच्या आवृत्त्यांचा परामर्श घेताना दिसतात.[१] त्यात रेणुकेचे घटाशी विशेष सामर्थ्यासह असलेले नाते दिसते. पाणी आणायला गेल्यावर

मोहाचा एक क्षण तिला सामर्थ्यहीन करून सोडतो. पतिव्रता पदावरून पदच्यूत करतो. याचीच प्रतिक्रिया म्हणून पुत्र परशुरामाकरवी शिक्षा करवतो. या समान सूत्राचा उलगडा करण्याचा अल्प प्रयत्न पुढीलप्रमाणे.

**रेणुका : भूदेवी :-**

रेणुकेच्या पुराकथांचे अवलोकन करण्यासोबतच रेणुका या नावाकडेही लक्ष पुरवणे गरजेचे आहे. रेणुका या शब्दाची फोड रा.चिं. ढेरे "रेणु + का = रेणुमयी = पृथ्वी" अशी करून "रेणुका ही भूदेवी आहे. तिचे रेणुका हे नाव पृथ्वीवाचकच आहे." [२] असे प्रतिपादन लज्जागौरी या ग्रंथात करतात. रेणु म्हणजे मातीचा सुक्ष्म कण होय. अशा अनेक कणांनी युक्त अशी मही म्हणजे रेणुका. "कुंकुणा"या शब्दाचा अर्थ देखील "मातीपासून निर्मित" असाच भासतो. कुंकुणा हा शब्द रेणुका या शब्दाचा वाचक आहे. असे प्रतिपादन डॉ. अशोक राणा आपल्या भारतीय मातृदेवता या पुस्तकात करतात. मातीच्या सूक्ष्म व मृदू कणांनी बनलेले वारुळ हे पृथ्वीचे म्हणजेच भुदेवीचे प्रतिकात्मक जननेंद्रियाचे (गर्भाशयाचे) प्रतीक आहे. भाविकांकडून ते रेणुकेच्या उपासनेसाठी वापरल्या जाणारे साधन आहे. या रुपात जिचे पूजन होते अशी देवी सातेरी रेणुकेशी समरूप आहे. कोकण, तळकोकणसारख्या प्रदेशासह गोव्याकडे पुजल्या जाणाऱ्या सातेरीच्या स्थापनेत परशुरामाची भुमिका असल्याची धारणा जनमानसात रूढ आहे. याची पुष्टी कुंभ हा शब्द करतो. कुं किंवा कु हा पृथ्वीद्रव्याने युक्त असल्याचे सूचन करतो. पृथ्वीपासून म्हणजे मातीपासूस न निर्मित असा जो तो कुंभ. या कुंभाचे व भूदेवी असलेल्या रेणुकेच्या परस्परसहसंबंधाचे विवेचन पुढीलप्रमाणे.

**सर्जनाचे प्रतीक घट :-**

1. नवरात्रोत्सव व घटस्थापना -

सबंध भारतात नवरात्रोत्सव हा मोठ्या प्रमाणात साजरा केला. जातो या उत्सवादरम्यान मातीच्या घटात तोंडावर नागवेलीची पाने व आत पाणी भरून त्यावर नारळ ठेवण्यात येईल असा घट एका परडीत

धान्य पेरलेल्या मातीवर ठेवून त्यात घटस्थापना केल्या जात असे. त्या मातीच्या घटातून पाणी पाझरून यथावकाश धान्य अंकुरते. हा नवनिर्माणाचा संकेत होय आणि म्हणूनच घटास गर्भाचे प्रतीक संबोधल्या जात असे. घट हे गर्भाशयाचे प्रतीक असल्याने मातृत्वाचे प्रतीक हा संकेत ओघानेच आला आणि मातृदेवतेचे प्रतीक म्हणून पूजनिय ठरला तो कायमचाच. या पूजाविधीमध्ये महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असतो. घटस्थापना, त्याचे पूजन, ओटी भरणे हे सर्व विधी सृजनाशी संबंधित असल्याने स्त्रीच्या हातून होणे अपेक्षित असते. घट, सृजन, पिक, त्यायोगे येणारी सुबत्ता यांची साखळी जोडण्याचा प्रयत्न केल्यास सर्व मातृदेवतांचे उत्सव हे सुगीच्या कालावधीतच येतात हे निरीक्षण मंगला सामंत आपल्या स्त्री-पर्व या पुस्तकात नोंदवतात.

२. लग्नविधीतील घटपूजा -

सर्व मंगल कार्याप्रमाणेच लग्नविधीत देखील घटपूजा होते. परंतु या पूजेत दोन घट असतात. ही दोन मातीची मडकी पाण्याने भरून अंगणात मातीत ठेवतात. त्यात सुवासिनी, विशेषतः सापत्य सुवासिनींच्या हातून पाणी भरले जाते. त्यांच्या आजूबाजूला धान्य पेरले जाते. यथावकाश त्या मडक्यातून पाणी पाझरून आजूबाजूचे धान्य अंकुरते. हीच कोवळीक, नवांकुर म्हणजे नवविवाहित दाम्पत्याच्या संसारातील नवनिर्मितीचे संकेत नवजीवनाचे प्रतीक होय. घटांची दोन ही संख्या वधू व वर यांचे प्रतिनिधित्व करते तर त्या भोवताल अंकुरलेले धान्य हे युगुलाच्या ठिकाणी उत्पन्न झालेल्या नव्या जिवाचे चिन्ह होय. गटांच्या भोवतालचे धान्य विपुल प्रमाणात उगवल्यास नवविवाहितेस लवकर दिवस राहून अपत्यप्राप्ती होते अशी मान्यता आहे. असं झाल्यास कळसाचे पाणी पावले असे म्हणण्याचा प्रघात आहे. असे मत डॉ. अशोक राणा आपल्या भारतीय मातृदेवता या पुस्तकात व्यक्त करतात.[3] शेवटी हे स्पष्ट होते की घट हे जीवनाचे प्रतीक होय.

३. उत्खननातील घटांचे अवशेष -

हरप्पा येथील उत्खननात सापडलेल्या ¨एच° स्मशान भूमीत काही कुंभ आढळतात. त्यातील काही कुंभात अस्थी आढळल्या ज्या दहनामुळे किंवा हिस्त्र पक्षांनी खाल्ल्यामुळे मांसविरहित झालेल्या असल्याचे आढळले. तर काही कुंभांमध्ये मृत बालकांचे सांगाडे पाय पोटाशी घेऊन अल्याचे आढळते. ही स्थिती अगदी तशीच असते जसे मूल गर्भाशयात वाढते. ऋग्वेदात याचे उल्लेख आढळतात. “स मातुर योना परिवीतो आंतर बहुप्रजा निऋतीम् आ विवेश” (ऋग्वेद १.१६४.३२). अशा बालकांची शरीरे मात्र क्षतीहीन स्वरूपात म्हणजे दहन न करता किंवा मांसभक्षकांनी हानी न पोचवता कुंभात ठेवल्या जात असत याचाच अर्थ असा की हे घट म्हणजे गर्भाशयाचे प्रतीक होत या घटांमध्ये मृतांचे अवशेष ठेवणे म्हणजे मातेच्या गर्भात परत जाणे आणि नव्याने या विश्वाच्या पोकळीत जन्माला येणे होय. डी. डी. कोसंबी नमूद करतात की “या मृत्यू पावलेल्या जीवांसाठी पृथ्वी स्वतः च माता बनते आणि तिच्या मांडीवर कुंभातून हाडे ओतली जातात. परंतु मुळची माता व तिच्या गर्भाशयाचे प्रतीक म्हणून कुंभ आहे हे उघड आहे.”[4] त्या जीवांची मूळ जननी वा पृथ्वीतलावरील कुठलीही जननी हिच्या गर्भाशयाचे प्रतीक म्हणजे हे घट हे याठिकाणी उघड आहे.

४. तांदळा हाच प्रतीकात्मक घट -

तांदळा हा शब्द तोंडवळा या शब्दाचा अपभ्रंश आहे हे स्पष्ट आहे. तोंडवळा म्हणजे चेहरा. आणखी जवळ जाण्याचा प्रयत्न केल्यास मुखवटा हा अर्थ याठिकाणी अभिप्रेत असावा. पुर्वापार चालत आलेल्या सण उत्सवा मधून मुखवट्यांची मोठी परंपरा चालत आल्याचे दिसते. रेणुका ही देवी देखील तांदळा म्हणजे अनघट मुखवट्याच्या स्वरूपात पुजली जाते. त्याव्यतिरिक्तही अनेक सण असे आहेत की ज्यांच्यात मुखवट्यांची पूजा होते. ज्येष्ठा गौरी अर्थातच महालक्ष्मी या सणालाही देवीचे मुखवटे “सरत्यांवर” म्हणजे धान्य पेरण्याच्या पोकळ उपकरणावर किंवा धान्य मोजण्याचे माप

म्हणजे "पायली" वर रचून पुजले जातात. विदर्भातील काही ठिकाणी हे मुखवटे धान्याच्या राशींवर ठेवून पूजण्याची परंपरा आहे. हे मुखवटे एखादा घट उलटा केल्यासारखे आतून पोकळ असतात आणि गर्भाशयाचे प्रतीकात्मक प्रतिनिधित्व करतात. रेणुकेची पूजा घटस्थापनेच्या योगे घट स्वरूपात होते कारण स. अं. डांगे यांच्या पुराकथांचा अर्थ मधील विधानानुसार घट हे रेणुकेच्या सर्जनशील योनीचे प्रतीक आहे. पूर्वी पूजन हे केवळ जननेंद्रीयाचे होत असे. तेर येथे उत्खननात सापडलेल्या योनी मूर्ती याचीच साक्ष देतात. रा. चि. ढेरे त्यांच्या लज्जागौरी या ग्रंथात म्हणतात, "महाकुट आणि सिद्धनकोटे येथे लज्जागौरी नावाने प्रसिद्ध असलेल्या देवीची उपासना स्त्रिया संतान प्राप्तिच्या हेतूने करतात. महाकुटाच्या देवीला वांझ स्त्रिया संतती प्राप्ती साठी नवस करतात."[5]

सृजनाचे पूजन या अर्थी देवीची योनी रूपात पूजा होत असे. मात्र जसजशा धारणा बदलत गेल्या तसतशा पूजन परंपरा अद्ययावत होत गेल्या. आणि मुखवट्याची, तोंडवळयाची (तांदळयाची) पूजा ही सर्वमान्य होत गेली. मात्र स्वरूप जरी बदलले तरी संकल्पनेचा गाभा तोच आहे यात शंका नाही. कारण स. अं. डांगे यांच्या मते शिर व जननेंद्रिय यांचे सांकेतिक महत्त्व एकच होते आणि त्यातूनच घट-स्त्राव ही संकल्पना आकारात आली. जननेंद्रिय म्हणजेच गर्भाशय - तांदळा - घट या प्रतिकांची परस्पर एकरूपता लक्षात येते.

**पितृसत्ताक संस्कृतीचा प्रतिनिधी जमदग्नी:-**

रेणुकाच्या पुराकथा पाहताना काही ठळक बाबी लक्षात येतात. त्यातील पहिली बाब म्हणजे स्कंद पुराणातील सह्याद्री खंडात असे नमूद केले आहे की प्रसेनजिताने कन्याकामेष्टी यज्ञ केला होता. हा राजा पुत्रकामेष्टी यज्ञ करू शकला असता मात्र त्याने कन्याकामेष्टी यज्ञ केला. कन्यारत्न निपजण्यासाठी विशेष प्रकारचे प्रयत्न होत आहेत. याचा अर्थ मातृसत्ताक संस्कृतीच्या खुणा या ठिकाणापर्यंत दिसतात.

कन्याप्राप्तीसाठी प्रयत्न करणारा राजा किंवा वंशज हा खऱ्या अर्थाने मातृपूजक असायला हवा. त्यानंतरही ज्यावेळी कथा पुढे जाते आणि कन्या विवाह योग्य होते तेव्हा तिला वराची निवड करण्याचे पूर्ण अधिकार असल्याचे दिसते आहे. याच अधिकारांचा वापर करून ती तापसी जमदग्नीला वरते.

पुराकथा वाचताना ऐकताना दोन ओळींच्या मध्ये दडलेला अर्थ वाचता यायला हवा या जाणिवेला जागून पुराकथांचा अभ्यास करताना काही बाबी आढळतात. रेणुका केवळ एकाच मोहाच्या क्षणाला बळी पडली. इतके अत्यल्प स्खलन (मुळात याला स्खलन म्हणावे काय हा प्रश्न आहे.) दंड देण्यास योग्य होते काय हा प्रश्न आपल्याला पडल्यावाचून राहत नाही. मातृसत्ताक संस्कृतीतील परंपरा पाहता त्या नैसर्गिक प्रेरणांवर आधारित असल्याचे आपणास लक्षात येते. मंगला सामंत आपल्या स्त्री पर्व या ग्रंथात स्त्रीलादेखील (अर्थातच पुरुषांना) पूर्ण लैंगिक स्वातंत्र्य असल्याचे विशद करताना म्हणतात, “सर्व निर्णय स्त्रियांकडून घेतले जात असून त्याचे महत्त्वाचे कारण संस्कृतीच्या प्रथमार्धात निर्णयप्रक्रिया ही अपत्यकेंद्रीत होती. त्यांना कोणतीही किंमत देऊन जगवणे हे महत्त्वाचे याची जाणीव मानवाला बुद्धी पातळीवर होती. इतर सस्तन प्राण्यांमध्ये तो आता केवळ नैसर्गिक प्रेरणेचा भाग नव्हता आणि माता ही अपत्याला सर्वात प्रथम जवळची. म्हणून स्त्री मताची व निर्णयाची अंमलबजावणी आदरपूर्वक होत असे.”[6] मात्र कालौघात परकीयांचे आक्रमणा नंतर प्रकृतीशी मिळत्या जुळत्या असलेल्या मातृसंस्कृतीवर घाला घातला गेला. निसर्गाशी सममूल्य असलेली संस्कृती मोडून पाडण्यात यश मिळाल्याने नैसर्गिक मूल्यांच्या विरुद्ध अशी पितृसत्ता मूळ धरती झाली.

उदाहरणादाखल रेणुकेची पुराकथा चपखल बसते. जमदग्नीचे अत्यंत कोपिष्ट म्हणून चित्रण झालेले आहे. तापट व्यक्तीसाठी जमदग्नीचा अवतार ही म्हण त्यामुळेच वापरात आली

असावी. अशा तापट व्यक्ती सोबत राहून संसार करणे छोटी गोष्ट नव्हे. पतीच्या पूजना करता ती पाणी आणायला जाते. म्हणजे पतीचे कामही ती करते. त्यात तिला उशीर झालेला पतीला चालला नाही. या बाबी पत्नीने पतीच्या आज्ञेत राहण्याच्या संकेताचे सूचन करतात. कसाही असो, कुठल्याही कारणावरून कितीही क्रोधित झाला असेल तरी त्याचे स्थान कायमच पूज्य असावे. तो वरच्या तर ती खालच्या पायरीवर असणार. स्त्री ही कायम पतीची संपत्ती असल्याप्रमाणे त्याच्या आधिपत्याखाली असणार आणि केवळ त्यास योग्य वाटणार म्हणून तो पत्नीस मृत्युदंडही देणार. या बाबी भयंकर निराशा उत्पन्न करणाऱ्या वाटल्या. हे मातृपूजक परंपरेत कधीच अभिप्रेत नव्हते. जमदग्नीने दिलेला मातृवधाचा आदेश चार पुत्र अव्हेरतात. त्यांना पशुपक्षांच्या योनीत खितपत पडण्याचा शाप मिळतो. म्हणजेच मातृस्नेही असलेल्या त्यांना या कृत्यासाठी विविध पशूपक्षांचे कुलचिन्ह असलेल्या कुलांमध्येच रहावे. म्हणजे ते निसर्गाशी घट्ट नाळ असणाऱ्या मातृसत्ताक संस्कृतीचे पाईक होते. सबब मातृदेवता रेणुकेचे भक्त होते हे स्पष्ट होते.

पुरुषसत्तेचा प्रतिनिधी असणारा जमदग्नी हा ऋषी आहे, आश्रमात राहून सात्विक जीवन आचरतो आहे मात्र तो स्वतःचा राग ताब्यात ठेवू शकत नाही. तो पुत्रांना मातेची हत्या करण्याचा आदेश देतो म्हणजेच स्पष्टपणे मातृसत्तेची, मातृपूजनाची उरलीसुरली जिव्हाळीही तोडण्याचा प्रयत्न करतो आहे हे सहज लक्षात येण्यासारखे आहे. कुठलीही संस्कृती अचानक पूर्णपणे मिटून लगेच दुसरी संस्कृती आचरात येत नसते. ती हळूहळू धूसर होत जाते. पितृसत्ता जरी प्रचलनात आली होती तरी मातृसत्ता पूर्णपणे पडद्याआड गेलेली नव्हती. तिचे पडसाद पार्श्वभूमीवर कुठेतरी ऐकू येत असत. ते पूर्णपणे दडपून टाकण्याचा हा प्रयत्न होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याच घटनाक्रमावरून जमदग्नी हा मातृसत्तेला मात देऊन रुजत जाणाऱ्या पुरुष

सत्तेचा पितृसत्तेचा प्रतिनिधी होता हे सहज स्पष्ट होते.

**समारोप :-**

रेणुका ही मातृदेवता निश्चितच कर्तृत्वशालिनी असून तिचे मातृपूजन परंपरेतील स्थान हे मोठे होते रेणुकेशी संबंधित पुराकथांमधून पितृसत्ताक संस्कृतीचे स्तोम वाढत जाऊन मातृसत्ताक संस्कृतीची पिछेहाट होत गेली. सामाजपरिवर्तन कसे घडून येते याचे चित्र स्पष्ट होते. तत्कालीन समाजाच्या घट, सुफलीकरण विधी, शेती, सुबत्ता या संकल्पना व त्यांच्या विषयीच्या धारणा या पुराकथांमधून समोर येतात.

**निष्कर्ष :-**

1) घट गर्भाशयाचे, पर्यायाने संपन्नतेचे प्रतीक म्हणून अनेक मिथके साहित्य संस्कृतीत वावरताना दिसतात.

2) रेणुका ही मातृदेवता यल्लमाच्या रूपात पूजली जाते. तसेच भूदेवी म्हणून तिचा लौकिक स्पष्ट आहे.

3) मातृदेवतांच्या समृद्ध परंपरेवर पुरुषी वर्चस्वाचा वाढता प्रभाव मातृसत्तेला निश्चितच प्रतिकूल ठरत गेला.

**संदर्भ:-**


1. पुराकथांचा अर्थ , स. अं. डांगे, कॉन्टीनेन्टल प्रकाशन (1993) , पृ. क्र. 224.
2. लज्जागौरी , रा. चिं. ढेरे, पद्मगंधा प्रकाशन (2018), पृ.क्र. 69.
3. भारतीय मातृदेवता , डॉ. अशोक राणा, प्राजक्त प्रकाशन (२०१९), पृ.क्र. १२४.
4. पुराणकथा आणि वास्तवता , दामोदर ध. कोसंबी, लोकवाङ्मय गृह (2019), पृ.क्र. १११.
5. लज्जागौरी , रा. चिं. ढेरे, पद्मगंधा प्रकाशन (2018), पृ.क्र. ३१
6. स्त्री-पर्व, मंगला सामंत,नेटवर्क प्रकाशन(२००८), पृ.क्र. २५.

# महाराष्ट्रातील लघुसिंचन प्रकल्पाचा आर्थिक तुलनात्मक अभ्यास

**संशोधक विद्यार्थी : श्री. संदिप रोहणकर मार्गदर्शक : डॉ. राजेश उल्हासराव बुरंगे**
श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रातील शेतक-यांचा दारिद्र निर्मुलनाचा प्रश्न त्याचप्रमाणे उत्पादन वाढविल्याचा प्रश्न प्रामुख्याने ग्रामिण भागातिल शेती त्यावरील उपाययोजनेवर अवलंबुन असतो. त्याचप्रमाणे शेतीवर अवलंबून असणारे कुशल कामगार किंवा मजूरांना पूरेसा रोजगार उपलब्ध व्हावा. तसेच राज्यामध्ये उद्भवणारा पाणी टंचाईचा प्रश्न तसेच अवेळी कोरडा दुष्काळ त्याचप्रमाणे पाऊस, विहीर, तलाव, नदी यांची पातळी कमी होत जाणे. एखाद्या पावसाने आलेली पिके खराब होणे यासारख्या संकटाचा सामना करण्याकरीता शेतीविषयक सुयोग्य विकासाचे धोरण आखावे लागेल. त्याचप्रमाणे या महाराष्ट्रातील शेतीमधील ओलीताचे प्रमाण वाढवावे तसेच या ओलीताचा फायदा हा स्थानिक पातळीवरील शेतक-यांना व्हावा व विविध पीक पध्दतीसाठी व्हावा त्याचप्रमाणे शेतीमध्ये हेक्टरी उत्पादन वाढ होवून शेतीव्यासायावरील अवलंबून असणारे शेतमजुरांना बारमाही रोजगार मिळावा त्याचप्रमाणे कमी पाण्यामध्ये जास्तित जास्त शेतीला पाणी मिळून ओलित क्षेत्र वाढवावे. व कमी खर्चामध्ये शेतक-यांना ही योजना उपलब्ध व्हावी. या करीता महाराष्ट्र शासनाने काही योजना शेतक-यासाठी आखल्या त्यापैकी एक ही “लघुसिंचन प्रकल्प योजना आहे.”

सन 1960 मध्ये घोषित करण्यात आलेल्या आयोगाची स्थापना 7 डिसेंबर 1960 मध्ये स. गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली असुन या आयोगाने 1962 मध्ये आपला अहवाल सादर केला हा अहवाल तयार करीत असतांना या अहवालाचा केंद्रबिंदु म्हणजे महाराष्ट्रतील एकूण अस्तित्वात असलेल्या जलसंपत्तीचा अंदाज होऊन तिचा काटेकोर उपयोग होवून तिचा काटेकोर उपयोग होवून किती क्षेत्र सिंचनाखाली येवु शकणार तसेच शेतक-यांना या सिंचन प्रकल्पाचा किती प्रमाणात फायदा होवु शकतो. तसेच स्थानिक पातळीवर विहीर, तलाव, धरणे याची कशाप्रकारे पाण्याची पातळी पाढू शकते त्याचप्रमाणे भविष्य काळात नैसर्गिक संकटे म्हणजे कोरडा दुष्काळ गरजेवेळी पिकास पावसाच्या अभावामुळे पाणी न मिळणे या सारख्या संकटापासून शेतक-याच्या पिकाचे संरक्षण करणे आणि एकुण उपलब्ध असणा-या जलसंपत्तीपासून सुयोग्य वाटप करुन दुष्काळ निवारण तसेच शेतक-यांना विविध प्रकारचे परीक्षण करून त्याच्याकडुन लघुसिंचनाचे व्यवस्थापन केले जाते.

महाराष्ट्रामध्ये काही ठिकाणी मोठे लहान प्रकारचे धरणे सुध्दा अस्तित्वात आहे. ज्याचा फायदा हा तेथील स्थानिक परीसरातील नागरिकांना तसेच शेतक-यांना होत असलेल्याचा आपणास आज देखील दिसून येत आहे. उदा. ईसापूर धरण हिंगोली – यवतमाळ जिल्हाच्या सिमेवर पैनगंगा नदीवर तोतलाडोह, महाराष्ट्र - मध्यप्रदेश राज्यादरम्यान छिंदवाडा उजनी, सोलापुर मधील हेमबुगी येथे जायकवाडी औरंगाबाद आणि अहमदनगर सिमेवर कोयना धरण सातारा.

त्याचप्रमाणे अमरावतीमधील अप्पर वर्धा शहानूर, सिंभोरा, अकोलामधील महान, पोपटखेड, वाशिम मधील एकबुर्गी यवतमाळ मधील बेबळा, बुलढाणा पेटाकळी पलघम.

अशाप्रकारे आपणास महाराष्ट्रातील ज्या भागात हे धरणे उभारल्या गेले तेथील

शेतक-यांना व नागरिकांना देखील या जलसंपत्तीचा उपयोग झाल्याचा दिसून येत आहे. म्हणुनच जलव्यवस्थापन आवश्यक असल्याचे आपणांस दिसुन येते.

**सिंचन प्रकल्पाचे फायदे :-**

1. बारमाही पिके घेण्यास उपयुक्त :-

शेतक-यांना सिंचन प्रकल्पामुळे बारमाही पिके घेण्यास मदत होते. ज्या भागात शेती मध्ये तूषार सिंचन, ठिबक सिंचन, उपसा सिंचन या सिंचणाच्या सोयी उपलब्ध झाले आहेत. त्या क्षेत्रातील शेतक-यांना एक पिक पध्दतीवर अवलंबून न राहता बारमाही पिके घेता येते या बारमाही पिक पध्दतीमुळे शेतक-याच्या जिवणात मोठ¬ा प्रमाणात बदल घडवून येत आहे तसेच जास्त पिके घेण्यास मदत होते आहे. आज महाराष्ट्रातील 2011 ते 2021 या दहावर्षाच्या तुलनेत कोरडवाहु जमिनीची ओलित जमिनीत 17% ने वाढ झाल्याचे सिंचन सिंचन विकास व पाटबंधारे यांच्या सर्वेक्षणातुन आढळुन येते. त्यामुळे आलीताचे प्रमाण वाढून बारमाही पिके घेण्यास मदत होत आहे.

2.ओलीताचे प्रमाण वाढविल्यास मदत :-

लघुसिंचन प्रकल्पामुळे पाण्याचे योग्य नियोजन करुन जास्तित जास्त क्षेत्र ओलीताखाली आणण्यास मदत होत आहे.

3.शेतक-याचा अथवा शेतमजूरांचा उत्पन्नात वाढ :-

शेतक-यांना सिंचनाद्वारे पाण्याची सोय उपलब्ध झाल्याकारणाने शेतकरी वर्गाचा उत्पादनात देखील मोठया प्रमाणात वाढ आहे.

4.धरणातील पाण्याचे नियोजन / सरकारचा आर्थिक लाभ :-

महाराष्ट्र शासनाने लघुसिंचन योजना आमलात आणल्यामुळे काही प्रमाणात शेतक-यांना पाणी उपलब्ध करून देत असतांना त्याच्या नोंदी ह्या पाटबंधारे विभागामार्फत घेतल्या जात आहे त्यामुळे त्यांना सोय उपलब्ध करून दिली असतांना पाण्याचा दर ठरविला असता तो अल्प प्रमाणात लावला जात आहे. तसेच या नोंदीमुळे पाणी चोरी

तसेच सरकारी कर्मचारी यांनी केलेले गैरवापर हे कमी होत आहे. त्यामुळे धरणातील पाण्याचे योग्य असे नियोजन होउन पाण्याच्या पातळीत वाढ होवुन सरकारचा अलीकडे देखील वाढ झाल्याचे पाटबंधारे विभागाद्वारे सांगण्यात आले आहे.

**लघुसिंचन प्रकल्प योजनेचे दोष :-**

1.जमिनीत वाढते क्षाराचे प्रमाण :-

महाराष्ट्र राज्यातील ज्या भागामध्ये खारपान पट्टा आहे. उदा. अमरावती विभाग अशा भागात लघुसिंचनाद्वारे केल्या जाणा-या शेतीमध्ये मोठया प्रमाणात 3 ते 4 वर्षात क्षाराचे प्रमाण वाढल्यामुळे जमिन ही नापीक होत आहे.

2.वाढल्या सिंचनामुळे काही प्रमाणात पाण्याची पातळी खालावणे:-

अमरावती मधील वरुड मोर्शी या तालुक्यामध्ये जास्त पाणी लागणारे उदा. संत्री ही पिके पध्दती मोठया प्रमाणात अस्तित्वात आहे. त्यामुळे तेथील पाण्याची पातळी हे 150 फुटच्या खाली गेल्याचे आपणांस सांगता येत आहे. 2015 मध्ये वरुड मोर्शी या तालुक्यामध्ये पाणी पातळी 90/100 फूट पर्यंत 2016 मध्ये 110 ते 115 तसेच 2016 मध्ये 115/130, 2017 मध्ये 130 ते 140 व 2018 पासून 150 च्या खाली पाण्याची पातळी गेल्याचे स्थानिक (पाटबंधारे भुजल विभाग ) याच्या माहीतीवरुन सांगण्यात आले आहे.

3. शेतक-यांकडून पाण्याचा आर्थिक गैरवापर :-

राज्यशासनाकडून शेतकरी वर्गाला लघुसिंचन प्रकल्प योजना बारमाही पिके घेण्यास कोरडवाहुचे ओलीत शेतीमध्ये प्रमाण वाढविण्याकरीता तसेच पाण्याचे योग्य नियोजन करण्याकरीता ही योजना प्रामुख्याने अस्तित्वात आणली परंतु शेतकरी वर्ग या योजनेचा गैरवापर करतो असे सर्वेक्षणावरून आढळून आले. उदा. ललीत माकोडे या शेतक-यांनी सदर योजना घेतली असून त्याच्याकडे 4 एकर एवढी जमिन असुन तो आवश्यक तेवढे पाणी वापरुन शिल्लक पाणी हे

भोवतालच्या शेतक-यांना 2000 ते 2200 या दराने उपलब्ध करून देतो. अशा प्रकारे एकाच बिलाच्या माध्यमातून असा गैरवापर होत असल्याचा दिसुन येत आहे.

4. लघुसिंचन योजनेमुळे वाढती वीजचोरी :-

सदर योजना ही शेतकरी वर्गाला उपलब्ध जरी करून दिली असली तरी ही योजना कार्यान्वित होण्यासाठी वीजेची आवश्यकता भासते अशावेळी ही योजना कार्यान्वित होण्यासाठी वीजेची आवश्यकता भासते. अशावेळी ही योजना उपलब्ध होवून लवकर वीज उपलब्ध होत नाही. किंवा झाली तरी शेतकरी वर्ग विजेचे बिल कमी व्हावे म्हणुन शेतामधुन गेलेल्या विजेच्या तारावर वायरचे घोडे टाकून वीज चोरी मोठ¬ा प्रमाणात करतात. 2019-2020 या कालावधीत राज्यातील जवळपास 1123 वीज चोरी करणा-यावर कारवाई करण्यात आली तर वीज चोरी करतांना शॉक लागून मृत्यु 239 ईतकी आकडेवारी कृषी विभागाकडून देण्यात आली आहे.

**महाराष्ट्रारातील जलसिंचनाचे प्रकार :-**

1.विहीर जलसिंचन :-

महाराष्ट्रात भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणेच्या 1995 च्या आकडेवारीनुसार 11 लाख 43 हजार विहीरी होत्या तर 2015 च्या आकडेवारीनूसार 21 लाख 39 हजार आहे. यापैकी सुमारे 19 लाख विहीरीवर ऑइल इंजिन किंवा विद्युत पंप बसविले आहे. या विहीरीच्या माध्यमातून 3,45,914 हेक्टर मीटर पाणी उपसा करण्यासाठी उपलब्ध आहे. तसेच प्रत्येक वर्षी पावसाचे जे पाणी भुगर्भात मुरते त्याचा विचार करता 3,92,109 हेक्टर मीटर पाणी वापरासाठी उपलब्ध होते. महराष्ट्रातील भुमिगत पाण्याचा साठ¬ाचा अंदाज पाहता यापुढे 7 लाखाच्या जवळपास विहीरी खोदता येईल.

2.तलाव जलसिंचन :-

महाराष्ट्रात तलावाव्दारे केल्या जाणा-या सिंचनाचे प्रमाण हे जवळपास 37% आहे त्यामध्ये प्रामुख्याने विदर्भातील भंडारा, चंद्रपुर, गडचिरोली या जिल्हात जास्तित जास्त सिंचन या माध्यमातुन होते तसेच

महाराष्ट्रात तलावाव्दारे जलसिंचनाचे प्रमाण लवकरात लवकर 78% पर्यंत करण्याचे शासनाचे धोरण आहे.

3. पाझर तलाव :-

महाराष्ट्रामध्ये तलावाच्या साह्रयाने देखील काही प्रमाणात जलसिंचनास मोठया प्रमाणात फायदा होतो. याचा मुख्य उपयोग राज्यातील भूजलसाठा वाढविण्यासाठी होतो. तसेच विहीरीतील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी देखील होतो. महारष्ट्र राज्यात 1972 साली अवर्षणग्रस्त परिस्थिती निर्माण झाली होती. तेव्हा पाझर तलावाची योजना अमलात आणली गेली. त्यामुळेच अवर्षणग्रस्त प्रदेशात हळुहळु जलसिंचनाचे क्षेत्र वाढू लागले. सध्या महाराष्ट्रात पाझर तलावाची संख्या सुमारे 8739 ईतकी आहे. तसेच 3700 च्या वर पाझर तलावाची कामे प्रस्तावीत असल्याची राज्याचा 2021 च्या अंदाजपत्रकातील माहीती नुसार सांगता येत आहेत.

4. उपसा जलसिंचन :-

विहीरी किंवा नदीच्या पात्रातुन अथवा जलाशयातुन उच्च भागातल्या जमिनीला पाणीपुरवठयाची सोय उपलब्ध करून द्यावयाची असेल तर हे पाणी उंचावर न्यावे लागते. यासाठी ऑईल इंजिन व विजेचे पंप याचा वापर मोठया प्रमाणावर केला जातो महाराष्ट्रातील पाटबंधारे विभागाच्या माहीतीवरून महाराष्ट्रात एकुण जलसिंचन क्षेत्रापैकी 18S क्षेत्र हे उपसा जलसिंचनाचे आहे. महाराष्ट्रात मुख्यत्वे करून दक्षीण महाराष्ट्रात विशेष: कोल्हापूर जिल्हा आणि कोकणातील रत्नागीरी तसेच सिंधुदूर्ग जिल्ह्रात उपसा जलसिंचनाव्दारे जमिनीला पाणी पूरवठा केला जातो.

5. ठिबक सिंचन :-

जमिनीचा दर्जा पिकाची दर्जा, पिकाचे स्वरुप बाष्पीभवनाचे प्रमाण ईत्यादी गोष्ट लक्षात होऊन पिकाच्या गुळाचे जाळे पसरून तोटीच्या किंवा सुक्ष्मनळीव्दारे थेंबाथेंबाने किंवा बारीक धारेने पाणी देण्याचा पध्दतीला ठिबक सिंचन म्हणतात.

1986 मध्ये द्राक्षे पिकविणाच्या नाशिक जिल्हाला अवर्षणाचा तडाखा बसला तेव्हा पासुन त्यानी द्रक्षाच्या बागा वाचविण्यासाठी ठिबक सिंचनाचा आधार घेतला आणी आता राज्यात या सिंचन पध्दतीत नाशिक जिल्हा आघाडीवर आहे. महाराष्ट्राने सुक्ष्मलक्ष्मी जलसिंचन तंत्रज्ञान उच्च उत्पादन व सुधारीत दर्जा याबाबतीत देशात पाया घातला आहे. संपुर्ण राज्यातील ठिबक सिंचन एकटया महाराष्ट्रात आहेत. फळे भाजीपाले, फुले,उस ईत्यादीसाठी ठिबक सिंचनाचा वापर मोठया प्रमाणात केला जातो.

6. तुषार सिंचन :-

तुषार सिंचन पध्दतीत पंपाच्या साह्राने पाण्याचा आवश्यक तो दाब होवून लहान-लहान छिद्राव्दारे फवा-याने पिकाला पाणी दिले जाते. तुषार सिंचन पद्धतीने पावसाप्रमाणे जमिनीवर पाणी जमिनीवर पाणी पडते व त्याचे समान वितरण होते. तर त्याच्याद्वारे शेतक-यांच्या उत्पादनात वाढ होवुन उत्पादनात देखील 15% ते 19% नी वाढ होते. या पध्दतीमुळे पाण्याच्या फवा-याने पिकाची पाने सतत धुतली जातात. साहाजीकच रोगराई आणी किडीचे प्रमाण कमी होते. तसेच जमीनीचे खारट होण्याचे प्रमाण देखील कमी होते.

7. कालवे:-

महाराष्ट्र जलसिंचन प्रकारात विहीरीच्या खालोखाल हे कालवे याव्दारे अमलात आणले जाते. महाराष्ट्रात विशेषत: दख्खनच्या पठारावर कृष्णा, गोदावरी, भिमा तसेच त्याच्या उत्पादनाच्या क्षेत्रातील पाटबंधारेचा माध्यमातुन योजना अमलात आणुन कालव्याव्दारे जमिनीला पाणीपुरवठा केला जातो पाटबंधारे योजनेमध्ये मोठी, मध्यम तसेच लघुपाटबंधारे असे प्रकार ही पाडले जातात. त्याचप्रमाणे राज्यातील ईतर भागात देखील मोठया प्रमाणात या सिंचन पध्दतीचा वापर मोठया प्रमाणात अस्तित्वात येत असल्याचा दिसून येत आहे. अशा सर्व योजना शासनामार्फत राबविल्या जातात.

**लघुसिंचन प्रकल्प योजनेची वैशिष्टे/गुण** :-

1.महाराष्ट्र शासनाने लघुसिंचन प्रकल्प योजना ही अनुदान तत्वावर उपलब्ध करून दिली आहे. त्याच योजनेच्या माध्यमातून जमिनीत पाण्याची टक्केवारी वाढवावी याकरीता मागेल त्या शेतक-याला ही योजना प्रामुख्याने पुरविली जाते.

2.महाराष्ट्र राज्यातील दुष्काळ भागातील शेतक-यांना बारमाही पिके घेण्यास मदत होते.

3.या योजनेमुळे जास्तित जास्त क्षेत्र ओलिताखाली येत आहे.

4.या योजनेच्या माध्यमातून विशेषत: (ठिबक सिंचन) यासारख्या सिंचन प्रकारचा वापर होत असल्यामुळे कमी पाण्याचा वापर करून जास्तित जास्त क्षेत्रांना पाणी पुरवठा केला जातो.

5.शेतक-यांना या योजनेमुळे पाणी जास्त प्रमाणात आवश्यक असणारे पिके (तुर, कपाशीख, ऊस) इत्यादी पिके घेण्यास मदत होते.

6.या लघुसिंचन प्रकल्प योजनेमुळे पाण्याचा गैरवापर कमी होउन पाण्याची पातळी वाढत आहे.

7.या योजनेकरीता शेतक-यांना विहीरीसाठी धडक सिंचन योजनेअंतर्गत 200000/- रु. अनुदान मिळते तर तलावासाठी 50000/- ईतके शासनाचे अनुदान मिळते.

8.या योजनेच्या माध्यमातून मागेल त्या शेतक-यांना तळे, विहीर, पंप, पाईप ईत्यादी साहित्य सदर योजनेच्या माध्यमातुन उपलब्ध होते.

9.सदर लघुसिंचन योजनेच्या माध्यमातुन सामुहिक शेततळे सुध्दा दिले जातात.

**सर्वेक्षणात्मक दोष (अंदाजपत्रकानुसार ):-**

1.लघुसिंचन योजनेमुळे शेतीमध्ये सिंचनाचे प्रमाण वाढल्यामुळे शेती ही क्षारयुक्त होत आहे.

2.अंदाजपत्रकात मंजुर झालेल्या निधीचा खर्च लघुसिंचन योजनेवर होत नसल्याचा दिसुन येत आहे.

3.1 एप्रिल 2018 पासून शेतक-यांना लघुसिंचन योजनेसाठी वीज ऐवजी सोलर पंप उपलब्ध करून देत असल्यामुळे पाण्याची गती कमी झालेली आहे.

4.लघुसिंचन प्रकल्प योजनेच्या माध्यमातून शेतामध्ये बोरव्दारे केल्या जाणारे सिंचन हे काही

काळानंतर बंद पडत असल्याचे निदर्शनास आले.

5.शासकीय नियमानुसार जी फलनिष्पत्ती हवी ती होतांना काही ठिकाणी आढळुन येत नाही.

**योजनेतुन शासनामार्फत मिळणारे साहित्य :-**

1.ंस्पिकलर 2. पाईप 3. लाईट 4. डिझेल इंजिन 5. विज.

**लघुसिंचन योजनेतुन करण्यात येणारी कामे:-**

1. विहीर खोलीकरण .
2. तलावातील गाळ काढणे.
3. पाईप दूरूस्ती.
4. इंजिन दुरूस्ती.
5. समपातळी वाढविणे.
6. नाल्याचे खोलीकरण करणे.
7. धरणाची उंची, पाण्याची पातळी वाढविण्यावर भर देणे.

महाराष्ट्रच्या स्थापनेनंतर सिंचन धोरण व कार्यपध्दती ठरविण्यासाठी आवश्यकतेनुसार समित्या व आयोग याची नेमणुक करण्यात आली. त्यातील काही प्रमुख आयोग आणि त्याच्या महत्वपुर्ण शिफारशी पुढीलप्रमाणे :-

1.ज्या प्रदेशात प्रवाही सिंचन पध्दती राबविणे अशक्य आहे तेथे विहरी सारखी सिंचन साधने योजावी.

2.अधिक पाणी आवश्यक असणा-या उद्योगांना पुरेसे पाणी आहेत तेथेच केंद्रिभुत करावे.

3.सिंचनाचा विकास कालावधी हा बांधकाम सुरू झाल्यापासुन 8 वर्षे किंवा सिंचनास सुरुवात झाल्यावर 5 वर्ष इतका असावा.

4.कालवे ज्या भागातुन जातील त्या भागातील ग्रामिण जनतेच्या घरघुती पाणी पुरवठा बाबी विचारात घेतल्या जाव्यात.

5.प्रकल्पातील निर्वासीत लोकांचे प्रत्यक्ष पुर्नवसन करण्याची जवाबदारी शासनाने द्यावी.

6.दर 10 – 15 वर्षानी सिंचन धोरणाचे पुर्नविलोकन करण्यासाठी खास चौकशी आयोगाची नेमणुक करावी.

**अवर्षणप्रवण क्षेत्राची सत्याशोधन समिती 1973 :-**

1972-1974 मधील भिषण दुष्काळाच्या पाश्र्वभुमीवर ही समिती स्थापन करण्यात आली. यामध्ये भुजल व पिण्याचे पाणी यावर स्वातंत्र प्रकरणाचा समावेश करण्यात आला.

1.राज्यातील 83 तालुके अवर्षणप्रवण क्षेत्रात अंतर्भुत करावेत.
2.अवर्षणप्रवण क्षेत्रात मृदा व जलसंधारणाची कामे एकात्मिक पध्दतीने पाणलोट क्षेत्र आधारावर करण्यात यावी.
3.पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाअंतर्गत मृदा व जलसंधारणासाठी
लोकशिक्षणाला महत्व द्यावे.
4.लघुपाटबंधारे क्षेत्रात वनीकरण कार्यक्रम ही राबविण्यात यावी.
5.ठिबक सिंचनास उत्तेजन द्यावे.
6.सिंचन प्रकल्प लाभ क्षेत्रात भुसुधारणेची कामे करावीत. तसेच लाभक्षेत्रावरील सर्व जमिनीवर कर आकारण्यात यावा.
7.जलसंपत्तीची उपलब्धता व तिचा वापर याचा हिशेबासाठी कायमस्वरुपी संघटना स्थापन करावी.

**आठमही वापर समिती 1979 :-**

1.उपलब्ध पाण्याच्या साठयापैकी पाणी खरीप पिकासाठी तर पाणी रब्बी व उन्हाळी पिकासाठी द्यावे.
2.प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचे सर्व लाभक्षेत्रामध्ये मशागती योग्या क्षेत्राच्या प्रमाणात वाटप करणे.
3.लाभक्षेत्रातील शेतक-यांना द्यावयाच्या पाण्याचे प्रमाण निश्चित करून शेतक-याना पिके घेण्याचे स्वातंत्र द्यावे.

**सिंचना व्यवस्थापनाबाबत उच्चाधिकारी समिती 1981 :-**

1.जलसिंचनाचा कार्यक्षम वापरासाठी राज्यस्तरावर स्वायत्त महामंडळाची रचना असावी तसेच सिंचन क्षमता 60,000 हेक्टरपेक्षा अधिक असणा-या प्रकल्पासाठी स्वातंत्र स्वायत्त प्रकल्प स्तरीय प्राधिकरण निर्माण करावे.
2.मर्यादित जमिन धारणा कायदा लाभक्षेत्रात तातडीने देखभाल दुरूस्ती याबाबत खर्च दरवर्षी प्रसिध्द करावा.
3.विदर्भात रब्बी पाणी वापर वाढविण्यासाठी ब्लॉक सिंचन पध्दतीचा वापर सुरू करावा.
4.घनमापन पध्दतीने पाण्याचा वापर करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी शेतक-यांना वेगळा पाणी दर लावण्याचा विचार करावा.

5.शासनाच्या उपसा सिंचन योजनेतील 25% खर्च लाभधारकांनी उचलावा.
6.पाणीपट्टी वसूलीसाठी अधिक कडक धोरण शासनाने ठरवावे. सिंचन वसुलीसाठी संबंधित विभागात रोखपाल पदाची निर्मिती करावी.
7.प्रादेशिक अनुशेष विषयक दांडेकर समिती 1984 :-

- राज्याचा सर्वच प्रदेशातील सिंचनाबाबतची अनुशेष मोजणी तालुका पातळीवर करणे आवश्यक आहे.
- वेगवेगळ्या पिकाखाली असलेल्या सिंचन क्षेत्राची मोजणी समान निर्देशांक पध्दतीने व्हावी म्हणुन रब्बी समतुल्य पदाची निर्मीती करावी.

## संदर्भसूची :-

1.महराष्ट्र पाटबंधारे विभागाचा अहवाल.
2.डॉ. बी. एम. क-हाडे 2009 सामानिक संशोधन पुस्तिका.
3.कृषी विषयक पुस्तक - के सागर प्रकाशन.
4.महाराष्ट्र राज्य लघुसिंचन आयोग 1960
5.कृषी सेवक स्पर्धा परीक्षा मार्गदर्शिका.
6.कृषी दैनंदिनी कृषी विद्यापीठ अकोला.

## वर्तमानपत्रे :-

1. व्यापार विषयक दै. सकाळ.
2.वाणिज्य लोकमत
3.कृषी घटक लोकसत्ता
4.कृषी अॅग्रोवन

## संकेतस्थळ:-

1. www.panifoundation.com
2. www.agrilinamation.org
3. www.Economical Survey of irrigation.com
4. www.irrigation .com youtube.

***

# व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची ५० वर्षे - एक विश्लेषण

**वैभव रमेशराव अर्मळ**, प्रकल्प सहायक
वुमेन्स स्टडीज सेंटर,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**प्रस्तावना :**

भारताच्या अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून व्यापारी बँकाकडे पहिले जाते. देशाच्या आर्थिक विकासात बँकांची भूमिका ही महत्त्वपूर्ण आहे. देशाच्या अर्थकारणावर दूरगामी परिणाम करणाऱ्या काही निर्णयापैकी म्हणजे भारतात बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा निर्णय होय. राष्ट्रीयीकरण म्हणजे एखाद्या खाजगी व्यक्तीने अथवा संस्थेने संघटीत केलेला आणि ज्याची मालकी व व्यवस्थापनही अशा व्यक्ती अथवा संस्थेकडून केले जाणे होय. भारतात १९६९ साली १४ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले. प्रस्तुत संशोधन लेखात व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण होण्यापूर्वी भारतातील स्थिती, राष्ट्रीयीकरण करण्याची आवश्यकता तसेच व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर झालेले बदल या सर्व बाबींचा विचार करण्यात येणार आहे.

**भारतातील १९६९ पूर्वी व्यापारी बँकांची स्थिती :**

भारतात १९६९ पूर्वी बँका मोठ्या प्रमाणात खाजगी स्वरूपात होत्या. या सर्व खाजगी स्वरूपाच्या बँकांवर मोठे

सावकार, भांडवलदार यांचे वर्चस्व होते. या सर्व बँकांचे व्यवहार हे फारसे विश्वसनीय नव्हते. १९४७ ते १९६० पर्यंत जवळपास ३६१ बँकांचे व्यवहार अडचणीचे ठरत होते. या सर्व बँक त्यांच्या आर्थिक व्यवहारात अयशस्वी ठरले होते. हे व्यवहार पारदर्शक स्वरूपाचे नव्हते. त्यांच्याकडील सामान्य ठेवीदारांना त्यांचे पैसे गमवावे लागले होते. कारण या बँकांनी त्यांच्या खातेधारकांना कोणत्याही प्रकारची हमी दिलेली नव्हती. या सर्व बँकांना कोणत्याच प्रकारची आर्थिक शिस्त नव्हती. या सर्व बँकाचे कृषी क्षेत्राकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष होत होते. या सर्व बँकांचे अधिक लक्ष व्यवसाय व व्यावसायिक यांच्याकडेच होते. देशातील प्रमुख १४ बँकांकडे देशातील ८०% संपत्ती होती. यावर केवळ काही लोकांचा ताबा होता. सामान्य जनतेला या बँकेकडून कुठल्याही प्रकारची मदत केली जात नव्हती.

**व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता :**

व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता प्रामुख्याने शेती आणि ग्रामीण उद्योगांना कर्ज देण्याकरिता तयार नसलेल्या खाजगी भांडवलदारांचे वर्चस्व कमी करण्यासाठी होते. ग्रामीण भागातील लोकांना बँकेच्या कर्जाची सुविधा मिळणे आवश्यक होते. या राष्ट्रीयीकरणामागे बँक शाखांचे निमशहरी व ग्रामीण भागात विकेंद्रीकरण करणे, आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होण्यास प्रतिबंध घालणे, प्राधान्य क्षेत्राला अधिक कर्ज देणे, अग्रक्रम क्षेत्रातील दुर्लक्षित उद्योगांना प्राधान्य मिळणे, खाजगी क्षेत्राचे स्वार्थी व्यवस्थापन नष्ट करणे, श्रमिकांच्या सेवाशर्ती व किमान वेतन मिळणे व समाजवादी समाजरचना अंमलात आणणे इ. उदिष्टांचा विचार करून बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

**१४ व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची घोषणा :**

'बँकिंग कंपनीज ऑर्डीनन्स एक्ट' अंतर्गत १९ जुलै, १९६९ रोजी भारतातल्या १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा निर्णय

झाला. हा निर्णय तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आलेला होता. १०० कोटींपेक्षा अधिक भाग भांडवल असणाऱ्या १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकामध्ये सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, बँक ऑफ बडोदा, युनायटेड कमर्शिअल बँक, कॅनरा बँक, युनायटेड बँक ऑफ इंडिया, देना बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, अलाहाबाद बँक, सिंडीकेट बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, इंडियन बँक आणि बँक ऑफ महाराष्ट्र या बँकांचा समावेश होता.

**व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर झालेले बदल :**

१९६९ मध्ये १४ व्यापारी बँकांचे आणि १९८० मध्ये आणखी ६ बँकांचे राष्ट्रीयकरण घडून आलेत. राष्ट्रीयीकरणामुळे बँकांची मालकी खाजगी क्षेत्राकडून सरकारकडे हस्तांतरित झाली. त्यामुळे या बँकांच्या धोरणात आमुलाग्र बदल झाला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात घेतला गेलेला हा सर्वात महत्वपूर्ण आर्थिक निर्णय होता, असे म्हटल्या जाते. या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर काही प्रमुख बदल झालेत. ते काही बदल पुढीलप्रमाणे आहेत.

**(अ) शाखा विस्तार**

राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी बँकांच्या शाखांचा वेगाने विस्तार झाला. या व्यापारी बँकांनी त्यांचा व्यवसाय ग्रामीण व निमशहरी भागापर्यंत पोहचविला. जुलै १९६९ मध्ये व्यापारी बँकांच्या शाखा ८३२२ एवढ्या होत्या. त्या १९९४ मध्ये ६० हजारांच्यावर जावून पोहचल्या होत्या. सध्या व्यापारी बँकांच्या शाखा ९० हजाराच्या वर आहेत. देशहिताच्या दृष्टीने उचलण्यात आलेले हे देशाच्या आर्थिक क्षेत्रातील मोठे पाऊल मानल्या जाते.

**(ब) व्यापारी बँकांच्या ठेवी व कर्जात होणारी वाढ**

१९५१ मध्ये व्यापारी बँकांच्या ठेवी ९०८ कोटी रुपये होत्या. १९६९ मध्ये त्यामध्ये ५ पटीने वाढ होऊन ४६४६ कोटी रुपये ठेवी होत्या. १९८७ मध्ये १९६९ च्या तुलनेत २६ पटींनी

वाढ होऊन त्याची रक्कम १०७३४५ कोटी रुपये झाली आणि २०१४ मध्ये या ठेवींची रक्कम ८३३६१७५ कोटी रुपये झाली. तसेच व्यापारी बँकांच्या देण्यात येणाऱ्या कर्जातही वाढ झाल्याचे दिसून येते. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या अग्रक्रमी क्षेत्रातील कर्ज १९६९ मध्ये २.६० लाख इतकी होती, ती २०११ मध्ये ४८३.३९ लाख झाली. लघु उद्योगांना १९६९ मध्ये २५१ कोटी रुपये कर्ज पुरवठा करण्यात आला होता. २०१४ मध्ये ५९३४१० कोटी रुपये कर्ज पुरवठा करण्यात आलेला आहे. म्हणजे राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी बँकांच्या ठेवींमध्ये आणि विविध क्षेत्रातील कर्ज पुरवठ्यात लक्षणीय वाढ झाली. परंतु आर्थिक वर्ष २०१९ अखेरीस सार्वजनिक उद्योगातील बँकांचे बुडीत कर्जांचे प्रमाण एकूण कर्जाच्या १३ टक्के होते, तर खाजगी बँकांचे फक्त ४.२ टक्के होते. आर्थिक वर्ष २०१८ अखेरीस खाजगी बँकांनी ४० हजार कोटी रुपयांचा नफा कमविला तर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी ८५ हजार, ४०० कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला.

**(क) शेती क्षेत्राला दिलेले कर्ज**

शेती क्षेत्राला प्रत्यय पुरवठा १९६९ मध्ये १६२ कोटी रुपये होता. तो एकूण बँक प्रत्ययाच्या ५.४ टक्के एवढा होता. त्यामध्ये २०१४ मध्ये वाढ होऊन ७०२५४१ कोटी रुपये झाला. तो एकूण बँक प्रत्ययाच्या २९.८ टक्के झाल्याचे दिसून येते. शेती क्षेत्राला प्रत्यक्ष वित्तपुरवठा १९६९ मध्ये ४० कोटी रुपये होता. तो एकूण बँक प्रत्ययाच्या १.३ टक्के होता. २०१४ मध्ये ५२५६५२ कोटी रुपये झाला. तो एकूण बँक प्रत्ययाच्या १७.३ टक्के एवढा झाला.

**(ड) व्यापारी बँकांच्या कार्यक्षमतेत, पारदर्शकतेत झालेले बदल**

राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी बँकांच्या कार्यक्षमतेत व पारदर्शकतेत बदल झालेत. राष्ट्रीयीकरणानंतर भारताच्या नियोजित अर्थव्यवस्थेला अनुसरून व्यापारी बँकांनी बँक धोरणात विकासाभिमुख बदल केलेत. राष्ट्रीयीकरणापूर्वी व्यापारी बँका औद्योगिक क्षेत्राला

कर्ज पुरवठा करत होत्या. सद्यस्थितीत व्यापारी बँका शेती क्षेत्राला सुद्धा मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा करत आहेत. राष्ट्रीयीकरणापूर्वी व्यापारी बँका प्रामुख्याने श्रीमंत व उच्चवर्णीय तसेच जवळचे हितसबंध जोपासणाऱ्याना मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा करत होत्या. राष्ट्रीयीकरणानंतर यामध्ये बदल होऊन सद्य स्थितीत सर्व सामान्य जनतेला कमी व्याज दरावर अधिक प्रमाणात कर्ज उपलब्ध करून देत आहेत.

**मूल्यांकन :**

गेल्या काही वर्षापासून मोठ्या प्रमाणात व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण होत आहे. राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी बँकांचे केवळ नफा कमविणे एवढा उद्देश नसून सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हा झाला आहे. त्यामुळे अनेक क्षेत्रांना कर्ज पुरवठा करण्यात आलेला आहे. देशाच्या विकासाला जरी चालना मिळत असली तरी व्यापारी बँकांचे स्थगित कर्ज वाढले आहे. अशा स्थितीत राष्ट्रीयीकरण बँकांविषयी सर्वसामान्य जनतेला काळजी वाटत आहे. यावर कोणते धोरण व्यापारी बँकांच्या बाबतीत आखता येईल, याचा विचार होणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१ ) कानेटकर मेघा (२०१५). भारतीय बँकिंग प्रणाली.पुणे : श्री साईनाथ प्रकाशन.

२ ) कोळंबे रंजन (२०१४) भारतीय अर्थव्यवस्था.पुणे : भगीरथ प्रकाशन.

३) चोरे वनिता (२०२०) अर्थमीमांसा-खंड १३. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची संशोधन पत्रिका

४ ) देशपांडे प्राची (२०२०) अर्थमीमांसा-खंड १३. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची संशोधन पत्रिका

५) बडदे कुणाल व खटाळ बी. जी. (२०१४) भारतीय बँकिंग आणि वित्त प्रणाली.जळगाव : प्रशांत प्रकाशन.

** ** **

# कोविड-19 साथीच्या रोगाचा भारतीय शेती क्षेत्रावरील परिणाम - एक अवलोकन

**संशोधक विद्यार्थी : प्रा.दिपाली पडोळे मार्गदर्शक : प्रा.डॉ वनिता चोरे**
श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

## प्रस्तावना

मानव हा समाजशील प्राणी आहे. मानवाला जीवन जगताना आरोग्य विषयक संघटना सामोरे जावे लागते. एकविसाव्या शतकात जगत असताना मानवाने वैद्यकशास्त्रात प्रगती केली आहे. आजवर उद्भवलेल्या अनेक रोगांवर औषध व लस शोधून काढली आहे. तरीदेखील आज कोविड-19 आजारामुळे संपूर्ण जगात दहशत निर्माण झाली आहे. सन 1928 मधील पेनिसिलीन या प्रतिजैविकांच्या आणि 1960 मधील विषाणूवरोधक व औषधांच्या शोधापूर्वी वेगवेगळ्या जीवाणू व विषाणूमुळे पसरणाऱ्या साथींचे आजार आणि रोगांमुळे मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण खूप मोठे होते. सन 1928 ते 1920 दरम्यान च्या मुळे भारतात साधारणतः दीड कोटी तर जगभरात पाच कोटी मृत्यू झाल्याची नोंद आहे स्वातंत्र्यापूर्वी भारतात मृत्युदर जोर अधिक होता त्यामध्ये एका बाजूला साथीचे रोग तर दुसऱ्या बाजूला दारिद्य अज्ञान कुपोषण अनारोग्यता व वैद्यकीय सुविधांचा अभाव इत्यादी बाबींचा ही वाटा मोठा वाटा होता. सद्यस्थितीला काही दिवसांपूर्वी सार्स 1 व सार्स 2 म्हणजे कोविड -19 समूहातील विषाणू असून त्यामुळे ताप सर्दी खोकला श्वसनाचे आजार होतात. यावरती प्रभावी औषध न सापडल्यामुळे आज संपूर्ण जगात या साथीच्या रोगाची दहशत निर्माण झालेली आहे. या आरोग्यविषयक संकटाचा आर्थिक ,सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय असा धोका निर्माण झाला आहे. अनेक देशांमध्ये टाळे बंदीचा निर्णय घेतला गेल्यामुळे अर्थव्यवस्थेतील शेती क्षेत्र उद्योग

क्षेत्र आणि सेवा क्षेत्राला याचा गंभीर परिणाम सहन करावा लागत आहे. भारतासारख्या विकसनशील देशात ग्रामीण अर्थव्यवस्थेला खूप महत्त्व आहे कारण ग्रामीण क्षेत्राचा मुख्य व्यवसाय कृषी हा असून भारताच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. सन 2013 14 मध्ये कृषी क्षेत्राचा जी डी पी मधील वाटा 14 टक्के तर रोजगारातील वाटा जवळपास 50 टक्के इतका होता. कृषी क्षेत्राचे वर्चस्व हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मुख्य वैशिष्ट्य असल्याने ग्रामीण विकासावरच भारताचा सर्वांगीण विकास अवलंबून असल्याचे दिसते. कृषी क्षेत्राचा विकास झाल्यास पर्यायाने ग्रामीण आर्थिक क्षेत्राचा विकास होण्यास मदत होते. ग्रामीण विकासाचा विचार केंद्रस्थानी ठेवून शासनला ग्रामीण विकासाचा विचार करणे अपरिहार्य ठरते. परंतु सद्यस्थितीला भारतातील कृषी क्षेत्र अस्थिर झाले असून शेतकऱ्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.

भारतासारख्या कृषिप्रधान देशात ग्रामीण विकास महत्वपूर्व ठरततो. सामान्यतः ग्रामीण विकास म्हणजे गरीब लहान व मध्यम शेतकरी कष्टकरी मजदूर इत्यादींचा सामाजिक आणि आर्थिक सुधारणा होईल असे मानले जाते. परंतु कोरोना 19 या साथीच्या रोगांमुळे भारतातील शेती क्षेत्र हे संकटात सापडले आहे सदर संशोधन लेखन कोविड -19 साथीच्या रोगाचा शेती क्षेत्रात काय परिणाम झालेला आहे या मुद्द्यांचा विचार केलेला आहे. सद्यस्थितीचा होणाऱ्या गंभीर परिणाम याचा उहापोह करण्याचा प्रयत्न केलेला आहे

संपूर्ण जगात अनेक देशांमध्ये कोविड-19 साथीचा रोग पसरल्याने संपूर्ण मनुष्यप्राणी आरोग्यविषयक संकटात सापडला आहे या रोगापासून मुक्त होण्यासाठी विविध उपाय योजना आणि प्रतिबंध लादले जात आहेत. प्रत्येक देशात जवळील उपलब्ध साधन, सकल राष्ट्रीय उत्पादन ,पायाभूत सुविधा ,आरोग्यविषयक सुविधा या सर्व

बाबींचा कोविड -19 साथीचा रोगाचा प्रसार होऊ नये यासाठी प्रयत्न केला जात आहे. आज भारत देशात सद्यस्थितीला कोरोना संक्रमित जनसंख्या 26530132 असून 299266 मृत्यू झाला आहे. तर 2805399 इतकी रुग्णसंख्या उपचार घेत आहे. जगात दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या असणारा भारतात जनतेला आरोग्यविषयक सुविधा पुरविल्या जात आहेत.

**कोविड -19 साथीच्या रोगाचा शेती क्षेत्रावरील परिणाम**

1) शेती क्षेत्रावरील दुष्परिणाम - कोविड -19 च्या संकटामुळे शेती क्षेत्रातील उत्पादित मलाला स्थानिक भागामध्ये विक्री करण्याशिवाय पर्याय राहिला नाही. कृषी पुरवठा साखळी आणि कमी झालेल्या कार्यक्षेत्रामध्ये, असुरक्षिततेमुळे भारतातील सर्व प्रकारच्या शेतात व उच्च मूल्यांचा शेती उद्योगांना इजा झाली आहे. शेतीवर आधारित दुग्धव्यवसाय, फळबागा उत्पादन, फुल शेती, मत्स्यपालन, पोल्ट्री फार्म या सर्व क्षेत्रांवर वाईट परिणाम झाला आहे.

2) प्रभावी मागणीचा अभाव - भारतात कोरोना संकटकाळात करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे वस्तू व सेवांची मागणी कमी झाली आहे. सक्तीच्या बेरोजगारीमुळे भूमिहीन मजूर, शेतकरी व लहान व्यवसायिक यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. आर्थिक घटकांचा परस्परावलंबनात समाजातील प्रशासक, संशोधक इतर समाज यांच्यामध्ये अन्नधान्याची उपलब्धता अल्प प्रमाणात होत आहे. तसेच कोरोना रोगाचा प्रादुर्भावातून वाचवण्यासाठी अर्थव्यवस्था आर्थिक घटक गोठवण्यात आली आहेत .परिणामी मांस, फळ , भाजीपाला आणि फुलांचे पुरवठा करणारे बाजारात असलेले बंधन आणि मागणी घटल्याने बाजारपेठ शोधण्यास असमर्थ असल्याने पशुधन आणि फळबाग क्षेत्रातील परिस्थिती अधिकच वाईट आहे

3) कृषी क्षेत्रातील गुंतवणूक घट - सरकारसमोर साथीचा रोग आटोक्यात आणण्यासाठी यंत्रणा

व जनतेच्या किमान गरजा पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या वस्तू व सेवांचा पुरवठा करण्याचा भार येत आहे. जागतिक संकट काळात शेतीवर आधारित उद्योग तसेच अनेक जड उद्योगांना मंदीच्या अवस्थेला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे प्रकर्षाने भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असणारा शेती क्षेत्रामध्ये गुंतवणूक वाढ व्हावी यासाठी प्रयत्न करावे .शेतीसाठी मुख्य सिंचन सुविधा व सुलभ पतधोरण, खात्रीशीर बी-बियाणे शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन झाल्यास शेतीक्षेत्र स्थिर होऊन उत्पादनात वाढ होऊ शकते.

4) फळबाग व्यवसायातील अडचणी- सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ पोस्ट हार्वेस्ट इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजी च्या अभ्यासानुसार, फळबागा उत्पादनात सर्वात मोठी रक्कम कापणीच्या टप्प्यात, नंतर क्रमवारी लावणे आणि प्रत्यक्ष परिवहनामध्ये मालाचे नुकसान होऊन अपेक्षित लाभ होत नाही

5) रोजगारावरील प्रतिकूल परिणाम - कोविड -19 महामारीचा संपूर्ण देशातील प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सर्व क्षेत्रातील उत्पादक व विक्रेत्यांना त्याचा परिणाम सहन करावा लागला आहे. भारतात जवळजवळ 50 टक्के लोकसंख्या शेती क्षेत्रात काम करत असून जनतेचा भार वाढत आहे. साथीचा रोगाचा काळ हा सामान्य शेतकऱ्यांसाठी अत्यंत प्रतिकूल असला तरी निदान मुख्य गरजा पूर्ण होतील इतका शेती व्यवसाय सुरूच आहे. शेती क्षेत्र हे एक आधारभूत क्षेत्र म्हणून उदयास येत आहे. तसेच शेती क्षेत्रातील रोजगार वाढविण्यासाठी शेती पूरक व्यवसाय, खाद्य प्रक्रिया उद्योग अल्पमुदती गुंतवणूक करून उत्पादन व रोजगार वाढू शकतो. तसेच ग्रामीण पायाभूत सुविधा शेती व शेतीपूरक गोदामे, पाणी व्यवस्थापन आणि अन्न व चारा प्रक्रियेमध्ये मजूर कामगार देखील सहभागी होऊन रोजगार प्राप्त करू शकतात.

6) शेती व्यवसायाचा मागासलेपणा - अजूनही भारतीय शेतीचे आधुनिकीकरण झालेले नाही. आधुनिक सकस बियाण्यांचा अभाव, शेतकरी

पारंपरिक पद्धतीने शेती करतात. कीटकनाशके, खते यांचा संकुचित वापर यामुळे शेतीची उत्पादकता पूर्णपणे वाढलेली नाही. काही अंशी शेतकऱ्याचा शेतीमध्ये एकाधिकार निर्माण झाला आहे. जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी व्यापारीकरण केल्यामुळे भारतीय शेती हळूहळू एका अधिकारात बदलू लागली आहे हे पीक किंमत निश्चित करण्याच्या जोखमीची टक्केवारी वाढविते. कृषी क्षेत्रातील संकलनाला प्रोत्साहन देण्यासाठी भारत खूप मागे आहे. अनेक राज्यांमध्ये संग्रहाच्या अभावामुळे शेतकरी संकटात सापडले आहेत. कोविड -19 साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव होताना टाळेबंदी चा पर्याय निवडताना अनेक आर्थिक सामाजिक व्यवहार ऑनलाइन पद्धतीने झाले परंतु ग्रामीण क्षेत्रात जगणारा शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाच्या आकलना बाहेर होता अजूनही भारतातील शेती व्यवहार पारंपारिक पद्धतीने करताना दिसतात .सरकारने नवीन योजना आखताना ते शेतकऱ्यांच्या दारात आणण्याची गरज आहे.

7) पशुसंवर्धन क्षेत्र - कोविड - 19 च्या प्रभावामुळे मोठ्या प्रमाणात शेती क्षेत्रावर परिणाम झाला आहे शेतीशी निगडित पशुसंवर्धनावर त्याचा अत्यंत वाईट परिणाम झाल्याचा दिसतो. कुक्कुटपालन आणि मांस उत्पादन या उत्पादनामधून विषाणूचा प्रसार होऊ शकतो अशी लोकांमध्ये अफवा होऊन परिणामी व्यवसायाचे नुकसान झाले आहे. टाळेबंदिमुळे शेती क्षेत्रामध्ये वाईट परिणाम झाला आहे शेती क्षेत्रातील पिके आणि विपणन देशभर संकटात सापडले होते. सहकारी संस्थांकडून धान्य खरेदी करत आहोत, खासगी व्यापाऱ्यांकडून शेतातून पिके घेण्यासाठी अत्यंत अडथळे निर्माण झाले आहेत, रब्बीच्या पिकासाठी कामगारांची कमतरता तर वाहतूक क्षेत्रात, किरकोळ कृषी बाजारात बंद असल्याने शेती क्षेत्रात विपणन विषयक समस्या निर्माण झाल्या आहेत.

8)अपुरे शेती भांडवल -भारताला कृषी क्षेत्राला नवीन तंत्रज्ञानाचा

लाभ घेण्यासाठी पुरेसे भांडवल आवश्यक आहे जे शाश्वत शेतीचा मार्ग सुकर करेल.असंख्य शेतकरी औपचारिक आर्थिक स्रोतांमधून भांडवल घेण्यास असमर्थ आहेत. ज्याचा उत्पादन आणी महसुलावर गंभीर परिणाम होतो. शिवाय सावकार व्यापारी जमीनदार कमिशन एजंट यासारख्या व्यक्तींकडून शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होते.

9) शेतीवर जागतिक आर्थिक प्रभाव - संपूर्ण देशाला उपासमार आणि कुपोषना पासून सुरक्षित ठेवण्यासाठी संपूर्ण देशात अन्नपुरवठा साखळी व अन्नधान्य उत्पादन वितरण योग्य रित्या होणे आवश्यक आहे. अन्यथा कोविड -19 साथीचा रोगाचा अन्नाचा तुटवडा उपासमार परिस्थिती निर्माण होऊ शकते. ग्रामीण भागातील लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना त्याच्या उत्पादनाचा मोबदला मिळून पुनर्गुंतवणूक करण्यासाठी उपलब्ध होणे आवश्यक आहे.

11) कोविड-19 च्या काळात शेतीची उत्पादकता - कृषी क्षेत्रातील जीडीपी 3.4 टक्के वाढ नोंदवली गेली.कृषी क्षेत्रातील मजबूत कामगिरी नसती तर भारताचा जीडीपी याहीपेक्षा कमी झाला असता. शेतीच्या उत्पन्नासाठी शेतीवर अवलंबून लोकसंख्येचा हिस्सा जमीन मालक भाडेकरू शेतकरी आणि काही शेतमजूर यांचा समावेश आहे. मागील दहा वर्षात कृषी उत्पादन अस्थिर आहे. 2010-11 मध्ये 8.6 टक्के वाढ होते. 2014 -15 मध्ये 0.2%आणि 2016 17 मध्ये .8% होती.

सकल देशांतर्गत उत्पादनात कृषी क्षेत्राचे योगदान सन 50- 51 मध्ये 54% वरून 2015 16 मध्ये 15.4% कमी झाली आहे. तर सेवा क्षेत्राचे योगदान 30% वरून 53 % पर्यंत वाढले आहे. जीडीपीमध्ये कृषी क्षेत्राचे योगदान गेल्या काही कृषी क्षेत्राच्या विकासासाठी अपुरा सार्वजनिक गुंतवणूक आणि त्याशिवाय संख्यात्मक पतपुरवठा, अपुरी पडताळणी ,वारंवार दुष्काळ हे ग्रामीण रोजगारामध्ये कृषी क्षेत्राचा वाटा कमी होण्याचे

कारण आहे. खतांवरील अनुदान कमी झाली आहे. भारतातील अन्नधान्याचे उत्पादन दर वर्षी वाढते आहे आणि गहू तांदूळ डाळी ऊस आणि कापूस अशा अनेक पिकांच्या उत्पादनात भारत अव्वल आहे.

## समारोप

कोविड -19 या विषाणूजन्य आजाराची समस्या नसून त्यासोबतच आर्थिक, वैज्ञानिक, सामाजिक,राजकीय,पर्यावरणीय अशा मानवी जीवनाशी संबंधित अनेक बाबींशी संबंधित समस्या निर्माण झालेल्या आहेत. शेती क्षेत्र हे भारताचा कणा असून. शेती क्षेत्राचे संरक्षण व उपाय योजना करून अर्थव्यवस्था स्थिर करणे अत्यंत आवश्यक बाब झाली आहे. शेती क्षेत्रातील अनेक समस्या, सिंचन सुविधांचा अभाव, सकस बियाण्यांची उपलब्धता, विपणन विषयक सुविधा, दळण - वळण विषयक सुविधा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नैसर्गिक संकटांवर मात करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. या समस्यांवर उपाययोजना करून त्याचे प्रखर अंमलबजावणी झाल्यास भारतीय अर्थव्यवस्था विकास साध्य करू शकते. आणि निर्माण होणाऱ्या तत्कालीन संकटांना सामोरी जाऊ शकेल.

## संदर्भसूची

1) भरतकुमार सोलापुरे. कोविड -19 च्या आर्थिक मंदी. अर्थसंवाद त्रेमासिक, एप्रिल जून 2020 खंड 44 अंक 1.
2) श्रीनिवास खांदेवाले. भारतातील मंदिर 2019 20 कारणे व उपाय योजनांचे विश्लेषण. अर्थसंवाद ऑक्टोबर डिसेंबर 2019 खंड 43 अंक 3.
3) भारतीय अर्थव्यवस्था, डॉ. जी. एन झांबरे.
4) डॉ. निर्मल भालेराव, श्री. मु. देसाई. ग्रामीण अर्थशास्त्र, निराली प्रकाशन पुणे.
5) एन.एल.चव्हाण, भारतीय अर्थव्यवस्था. प्रशांत प्रकाशन जळगाव.
6) डॉ अनुप कुमार मिश्रा, टिचिंग लर्निंग सेन्टर ,रामानुजन कॉलेज दिल्ली.(रि,कोर्से.मार्गदर्शन)

** ** **

# राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या विचारातील ग्रामविकास

**संशोधक विद्यार्थी : निलेश मधुकरराव मोहकार**
**मार्गदर्शक : प्रा. डॉ.जे.व्ही.गायकवाड**
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.

**प्रस्तावना :**

विसाव्या शतकातील महान कर्मयोगी, मानवतेचे पुजारी, युगप्रवर्तक या विशेषणांनी ज्यांना ओळखले जाते ते संत म्हणजे वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज होय. त्यांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील यावली (शहीद) या गावी झाला. स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांनी राष्ट्रसंत या उपाधीने तुकडोजी महाराज यांचा गौरव केला. कारण की त्यांनी समाजासाठी, देशासाठी उद्धारक कार्य केले. वंदनीय तुकडोजी महाराजांनी १९०९ ते १९६८ या काळामध्ये भजन,कीर्तन तसेच साहित्य लेखनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये धर्मनिरपेक्षता, अंधश्रद्धा निर्मूलन, महिला सक्षमीकरण, सामाजिक समता,आर्थिक समता प्रस्थापित करण्याच्या हेतूने मोलाचे योगदान दिले आहे.

भारत देशाच्या आर्थिक विकासासाठी कौटिल्य, महात्मा गांधी, महात्मा फुले यांनी आर्थिक विचार मांडले आहे. देशाला विकासाच्या मार्गावर नेण्यास हे आर्थिक विचार अतिशय महत्त्वाचे आहे. याच पावलावर पाऊल ठेवून राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून ग्रामीण विकासाबाबत आर्थिक विचार मांडलेले आहे.भारत देशामध्ये आजही बहुसंख्य लोक शेती व्यवसाय करतात. भारतीय अर्थव्यस्थेत शेती चा समावेश प्राथमिक क्षेत्रात प्रामुख्याने केला जातो. पहिल्या पंचवार्षिक योजनेचा मुख्य भर हा शेती व्यवसायावर होता. शेती क्षेत्रात

झालेल्या प्रगतीमुळे देशाचा विकास होऊ शकतो हाच विचार राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या आर्थिक विचारांच्या माध्यमातून समाजापर्यंत ठेवला. आज ही मोठ्या प्रमाणात अन्नधान्याचा पुरवठा ग्रामीण भागातूनच केला जातो.आजही शिक्षित वर्ग मोठ्या प्रमाणात शेती हा व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करत आहे. राष्ट्रसंत संत तुकडोजी महाराज यांनी आपल्या ग्रामगीतेमध्ये ग्रामरक्षण, ग्रामशुद्धी, ग्रामनिर्माणकला, ग्राम-आरोग्य, गोवंश-सुधार, गरीब-श्रीमंती, श्रम-संपत्ती, ग्राम-कुटुंब या विशेष अध्यायातून राष्ट्रसंतांनी गाव कशी स्वयंपूर्ण व स्वावलंबी होतील यावर भर दिला. प्रत्येक व्यक्तीने श्रम करून स्वतःच्या उपजिविकेचे साधन निर्माण करावे. कोणीही मागासला राहू नये. तेव्हाच ग्रामसमृद्धी होईल असे त्यांचे मत आहे. आजच्या या कोरोना काळातील महाभयंकर परिस्थितीमध्ये सुद्धा ग्रामीण क्षेत्रात कृषी व कृषी संबंधित व्यवसायातून मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागामध्ये रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहे. म्हणूनच राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी आपल्या विचारातून ग्रामोद्योगातून ग्रामविकास हा आर्थिक विचार मांडला आहे.

**गृहितके :**

१) तुकडोजी महाराजांच्या आर्थिक विचारांमुळे ग्रामीण भागात बदल घडून आलेला आहे.

२) तुकडोजी महाराजांच्या सामाजिक विचारांमुळे ग्रामीण भागात परिवर्तन घडून आलेले आहे.

**तुकडोजी महाराज यांचे आर्थिक विचार:**

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या लेखनातून ठाई ठाई राष्ट्रवाद, राष्ट्रीय एकात्मता, स्वातंत्र्य, समता व बंधुता या संबंधीचे त्यांचे चिंतन प्रगट होते. हिंदुस्थान हा खेड्यांचा बनलेला देश आहे. तेव्हा खेड्याची सुधारणा झाली तरच देशाची प्रगती होईल हे ओळखून त्यांनी ग्राम सुधारण्याची मोहीम हाती घेतली. राष्ट्रसंतांनी ग्रामाचा अतिशय सूक्ष्म अभ्यास केला

होता. त्यांनी महात्मा गांधी यांच्या स्वराज्य संकल्पनेला सुराज्यात परिवर्तन करण्यासाठी हयातभर प्रयत्न केला आहे. ग्रामगीता या ग्रंथामध्ये तुकडोजी महाराज असे म्हणतात की,

**गाव हा विश्वाचा नकाशा ।**
**गावावरून देशाची परीक्षा।**
**गावची भंगता अवदशा । येईल देशा।।**

खेडी समृद्ध करण्याच्या योजना भरपूर आहे परंतु त्यातील भ्रष्टाचार थांबवणारी व्यवस्था नाही. गावागावात राज्यकर्त्यांनी घातलेला धुमाकूळ अतिशय गंभीर आहे. सामान्य जनतेची दिशाभूल करून चोर मुजोरा सारखे कुरण खात आहे. ही स्थिती बदलण्याची नितांत गरज आहे. राष्ट्रसंतांनी ग्रामविकासाचा दिलेला मूलमंत्र सज्जनांनी स्वीकारला पाहिजे. जो जाणत नाही त्याला सांगायचे, जेथे समजत आहे त्यांनी सोबती करणे, प्रत्येकाच्या कलेचा, भक्तीचा, ज्ञानाचा फायदा घ्यायचा आहे. गावाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी जे विचार ग्रामीण लोकांनी व अनुभवी सज्जनांनी करावयाचे आहे ते विचार दृढ करून आचरणाला सुरुवात करावयाची आहे. गावातील सुशिक्षित, विद्वान, पंडित, श्रीमंत, अभ्यासू मंडळींनी एकत्र येऊन आपल्या गावाच्या समस्येवर अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेत तसेच त्यांच्या रचनात्मक कार्यक्रमात ग्रामविकासाचे सूत्र दिले आहे. त्या सर्व बाबीवर कार्य करण्याची गरज आहे. शासनाच्या ज्या ग्रामीण विकासाच्या योजना आहे त्या ग्रामपंचायत व पंचायत समितीच्या माध्यमातून प्राप्त करून अंमलबजावणी केली पाहिजे. ग्रामसभा या अस्त्राचा योग्य वापर करून योजना राबविल्या गेल्या तरच विकास साध्य करता येतो. ग्रामगीता ही ग्रामीण योजनांचा खजाना आहे त्याचे अध्ययन करून कार्य केले जावे. देशात अनेक खेडी राष्ट्रसंतांच्या विचारातून 'आदर्श गाव' होत आहे. या सत्कार्यात सर्व ग्रामवासियांनी पुढाकार घेऊन कार्य केल्यास महात्मा गांधीजींचे स्वराज्याचे सुराज्य हे स्वप्न साध्य करता येऊ शकते.

गरीबी श्रीमंती यांच्यातल्या वर्गीय भेदाबाबत सुद्धा राष्ट्रसंतांची भूमिका एका उच्चतर पातळीवरील समन्वयाची राहिली आहे. उपेक्षित-पिडीत श्रमजीवींना समान दर्जाचे मानवप्राणी म्हणून न्याय्य वाटा मिळावा ही आकांक्षा त्यांना ग्राम निर्माणाच्या सुत्रापर्यंत घेऊन गेली असती तरी कम्युनिस्टांच्या धारणेप्रमाणे प्रचलित राज्यव्यवस्था नष्ट करून श्रमिकांचे राज्य यावे व त्यासाठी रक्तरंजित क्रांती करावी लागली तरी बेहतर अशी एकांगी धारणा राष्ट्रसंतांची नव्हती. "नांदोत सुखे गरीब-अमिर एक मताने" एकाचे धन दुसऱ्याचे श्रम यांच्या संयोगाने मानवहितैशी उद्योजकता भरभराटीस यावी आणि सारी मानवजात सुखी व समृद्ध होत जावी अशी त्यांची भूमिका आहे.याचा पुरावा देताना राष्ट्रसंत असे म्हणतात की,

**धन हे गरिबांचे रक्त ।**
**समजुनी वागोत श्रीमंत।**
**श्रम ही गावाची दौलत ।**
**म्हणोनि व्हावा मान तिचा।।**

विनोबा भावे यांनी १९५१ पासून भूदान चळवळ सुरू केली होती. ' सब भूमी गोपाल की ' हा मंत्र विनोबा लोकांना सांगत. भूदान चळवळीस सहकार्य करण्याच्या भूमिकेतून १ मे १९५३ रोजी तुकडोजी महाराजांनी यवतमाळ जिल्ह्यातील पारवा या गावापासून सुरुवात केली. केवळ दहा दिवसात महाराजांनी ११४१० एकर जमीन भूदानास मिळवून दिली. वैयक्तिक मालकी कायम ठेवून सर्व ग्रामजीवनातील शेती सामूहिक पद्धतीने करण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला होता. त्यामुळे उत्पादन खर्चात काटकसर होऊन उत्पादनाचा वेग वाढेल असे ते म्हणत.

शिक्षण, उद्योग, शिस्त, चारित्र्य या सर्वच बाबतीत आज जीवनात घातक उणिवा निर्माण झाल्या आहेत. त्या दूर करण्यासाठी सतत फिरून तुकडोजी महाराज भजन, भाषणाद्वारे खेडी व शहरे उज्वल केली आहे. ग्रामनिर्माणकला या अध्यायात गावाच्या दारिद्र्याचे कारण व स्वावलंबन महत्त्व, उपयुक्त स्वावलंबी कला व तिचा विकास, कलात्मक आदर्श ग्रामरचना हा विचार तर श्रम

संपत्ती या अध्यायातून ग्रामोद्योगातून ग्रामराज्य हा आर्थिक विचार मांडला आहे.

भारत हा खेड्यांचा देश आहे, हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला की राष्ट्राचा विकास होईल, अशी तुकडोजी महाराजांची श्रद्धा व विचारसरणी होती. तुकडोजी महाराजांनी ग्रामजीवनाचे विशालात्व अनुभवले व त्यावर प्रयोग करून पाहीले. आधी केले मग त्यांनी ग्रामगीतेत सांगितले. खेड्याचा प्रश्न विशाल आहे. तो सुटला की आपोआपच शहराचा प्रश्न सुटेल. असे गांधीजी म्हणत. तोच विचार तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता ग्रामासाठी, खेड्यासाठी आहे. खेड्याबरोबर शहरांचाही विचार यात आहे. ग्रामोन्नती व ग्रामविकास हा त्यांच्या विचारसरणीचा जणू केंद्रबिंदूच. खेडेगाव कसे स्वयंपूर्ण होईल, याविषयीची जी उपाय योजना तुकडोजी महाराजांनी सुचविली होती, ती अतिशय परिणामकारक ठरली आहे.

**सामाजिक विचार :**

महाराजांना देशातील ग्रामीण जनतेचे दुःख स्वस्त बसू देत नव्हते. गावच्या गाव उध्वस्त होत आहे तेथील जनतेला दळण वळणाचे रस्ते नाही, पिण्याचे शुद्ध पाणी नाही, शिक्षणाच्या सुविधा नाही, व्यवसायाची सोय नाही, उद्योग, आरोग्य, निरक्षरता, अंधश्रद्धा, शेतकरी बांधवांच्या समस्या, ग्रामीण भागात वाढलेली व्यसनाधीनता, भ्रष्टाचार अशा अनेक समस्यांनी जनता हवालदिल झालेली आहे. यांचा विकास झाला नाही तर देशाच्या विकासाचे स्वप्न पाहू शकत नाही म्हणून त्यांनी ग्रामविकासाचा ध्यास घेतला होता. देशाचा विकास करायचा असेल तर गावाचा विकास झाला पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते.

वंदनीय राष्ट्रसंतांनी आपल्या जन्मदिवसाला ग्रामजयंती म्हटले. याचा अर्थ सरळ, साधा, सोपा आहे. भारत देशातील ५ लाख ग्रामाचा उद्धार करण्यासाठी प्रत्येक ग्रामवासीयांनी पुढाकार घेऊन गावात सुख, समृद्धी, शांतता नांदावी याकरिता ग्रामजयंती प्रत्येक गावात साजरी व्हावी. हा

कोण्या व्यक्तीच्या जयंतीचा कार्यक्रम नाही तर गावाच्या उत्कर्षाचा उत्सव आहे. गाव हेच देऊळ आहे आणि त्या देवळातील देव म्हणजे गावातील लोक हे प्रतिपादित करताना तुकडोजी महाराज ग्रामगीतेमध्ये असे म्हणतात की,

**जाणावे ग्राम हेची मंदिर। ग्राम आतील जन सर्वेश्वर।**
**सेवा हेचि पूजा समग्र। हाची विचार निवेदावा।।**

सद्यस्थितीत संपूर्ण विश्वात अशांतता पसरलेली आहे. विज्ञानाच्या परमोच्च संशोधनामुळे मानव उन्नतीकडे जाण्या ऐवजी तो विनाशाकडे वाटचाल करीत आहे. विज्ञानाने प्रगती दिसत आहे परंतु माणसातील माणुसकी नष्ट होत आहे. मनावर होणारे अध्यात्मिक संस्कार ऱ्हास होणे हे विज्ञानाही घातक ठरणार आहे. ग्रामगीता ही फक्त वाचण्यासाठी नसून "वाचता वाट दावी जनाशी" ती आचरणात आणून त्यातील सुसंस्कार समाज मनावर बिंबवायचे आहे. अध्यात्म आणि विज्ञान यांचा संगम असलेल्या या ग्रंथातील विचाराने समाजमन घडवायचे आहे.

राष्ट्रसंतांनी ६५ वर्षापूर्वी केलेले भाष्य आज आपण अनुभवतो आहे. देशाच्या स्वातंत्र्याच्या ७२ वर्षानंतरचे चित्र अतिशय विदारक आहे. खेडीच्या खेडी ओस पडत आहे. खेड्यातील जनतेचे जीवन कठीण झाले आहे. आजही आमच्या देशातील ग्रामीण जनतेला शुद्ध पिण्याचे पाणी नाही, उद्योगाचे साधन नाही, रोजगार नाही, आरोग्याच्या सुविधा नाही, चांगल्या शिक्षणाची सोय नाही अशा अनेक समस्या आहे. त्यात प्रामुख्याने शेतकऱ्यांचा प्रश्न प्रचंड मोठा आहे. शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणात आत्महत्या करीत आहे, शेतकऱ्याच्या मालाला भाव नाही, त्यांच्या समस्या सोडविण्यापेक्षा त्यांच्या भावनांशी खेडण्याचे राजकारण सर्वत्र पाहायला मिळत आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी हे शिक्षणतज्ञ होते. शिक्षणाद्वारे माणसाच्या मनातील न्यूनगंड दूर झाला पाहिजेत, पुस्तकी शिक्षणातून समाजाचा विकास

होणार नाही, खेड्यातून वर्ग सुरू केले होते. विज्ञान शिक्षण शेतीसाठी आवश्यक आहे असे म्हणत. शिक्षणासोबतच श्रप्रतिष्ठा महत्वाची आहे. स्वच्छता हाच आनंदी जीवनाचा झरा आहे असे म्हणत. स्त्रियांनीच महापुरुष, लढवय्ये, थोर संत, समाजसुधारक यांना जन्म दिला आहे.राष्ट्रसंत स्त्री-पुरुष विषमतेवर प्रहार करतात.उलट स्त्रीयांच्या तेजावरीच मोठेपण आहे असा स्त्रियांविषयीचा आत्मविश्वास व्यक्त करतात.

आजच्या आधुनिक काळात तुकडोजी महाराजांच्या विचाराचा लोकांच्या मनावर चांगला प्रभाव पडलेला दिसून येतो. संत तुकडोजी महाराज द्वारा संस्थापित अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम, मोझरी जि.अमरावती र.न.एफ/१६२ या सेवेच्या वटवृक्षाखाली चिरंतर लोकसेवा सुरु आहे. प्रत्येक गावात श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून समाजपयोगी कार्य, ग्रामगीताप्रणित जीवन शिक्षणाचे धडे, शेती व्यवसायाबरोबरच लघु-कुटीर उद्योग सुरु करून शेती क्षेत्रातून निघालेल्या कच्या मालावर प्रक्रिया करून पक्का माल आज मोठ्या प्रमाणात शहरात विक्रीसाठी जात आहे. ते आपल्या शिक्षणाचा उपयोग शेती शेत्रात करत असल्याचे चित्र दिसत आहे. संत तुकडोजी महाराजांच्या विचारामुळे ग्रामीण भाग मोठ्याप्रमाणात विकसित होत आहे. ग्रामीण भागातील महिला सुद्धा आज लघु उद्योग करून आपल्या संसाराचास गाडा योग्य पद्धतीने चालवत आहे. एकंदरीत ह्या सर्व विचारामुळे समाजाचे जीवनमान उंचावलेले अनुभवास येते आहे. हे विषद करतांना तुकडोजी महाराज असे म्हणतात की,

**गावागावासी जागवा ।**
**भेदभाव हा समुळ मिटवा ।**
**उजळा ग्रामोन्नतीचा दिवा ।**
**तुकड्या म्हणे ।।**

ही व्यापक समन्वयाची भुमिका लोकांना अहं केंद्रीतता-कुटुंब केंद्रीतता-समुह केंद्रीतता यांच्या मर्यादामधून मुक्त करीत ग्राम केंद्रीततेशी जोडून देते.

**निष्कर्ष :**

१) तुकडोजी महाराज यांच्या आर्थिक विचारामुळे ग्रामीण विकास झालेला आहे.

२) ग्रामीण भागामध्ये आर्थिक समता प्राप्त झाली आहे.

३) ग्रामीण भागात लघु-कुटिर उद्योगांचा विकास होत आहे.

४) ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण झालेल्या आहेत.

५) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या आर्थिक विचारांमुळे गावे स्वावलंबी व आदर्श झालेली आहे.

६) ग्रामीण भाग विकसित झाला तर राष्ट्र विकसित होईल असे विचार संत तुकडोजी महारजांनी आपल्या ग्रामगीता ग्रंथात मांडले आहे.

६) ग्रामीण भागातील लोकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावलेला आहे.

७) तुकडोजी महाराज यांच्या प्रबोधनाचा लोकांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर चांगला प्रभाव पडलेला आहे.

**संदर्भ :**

१. कऱ्हाडे डॉ.बी.एम., सामाजिक संशोधन पद्धती, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, २०१८.

२. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महारज, ग्रामगीता, श्रीगुरुदेव प्रकाशन, नागपूर, २०१०.

३. गाठाळ डॉ. एस. एस., महाराष्ट्रातील समाजसुधारक, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१७.

४. पुनसे डॉ.दिपक बा. श्रीगुरुदेव मासिक, श्रीगुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज आश्रम, एप्रिल २०२१.

५ https://en.m.wikipedia.org/wiki/Tukdoji_Maharaj

****

# बंजारा समाजातील कृषी क्षेत्रातील स्त्री शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास

**संशोधक विद्यार्थी : उज्वला बाबुराव पवार**
**मार्गदर्शक : प्रा. डॉ.वनिता ज्ञा.चोरे**
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

## प्रस्तावना :-

भारतीय अर्थव्यवस्थेत मुख्य तीन क्षेत्रे ही आहेत, त्यात कृषी क्षेत्र, उद्योग क्षेत्र व सेवा क्षेत्र ही आहेत भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचा हिस्सा जवळपास 20% इतका असून इतर प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत अधिक असल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेस कृषिप्रधान अर्थव्यवस्था असे म्हणतात. कृषी क्षेत्रावर 56.4% लोकसंख्या अवलंबून आहे 2014 नुसार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कृषी क्षेत्रावर 73.6% लोकसंख्या अवलंबुन आहे

भारतातील कृषी आधारित उद्योगात कापड उद्योग, जुट उद्योग, साखर उद्योग हे प्रमुख उद्योग आहेत॰ स्वातंत्र्यानंतर नियोजनकारांनी नियोजनाच्या सुरुवातीपासुनच कृषी क्षेत्राकडे लक्ष दिले म्हणून त्याचाच परिणाम कृषी क्षेत्रात मुलभूत संरचनात्मक बदल घडून येण्यास सुरुवात झाली. ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध झाले, वाहतूक साधनात वाढ झाली. ग्रामीण भागात 81% प्रमाण हे भूमिहीन व अल्पभूधारकांचे आहे. अर्थव्यवस्थेत विविध प्रकारच्या सेवाचाही वाढता वाटा आहे. अलिकडे सेवांवर आधारित व्यवसाय ही अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. अधिकृत चाचणी नुसार 2004-05 नुसार भारतातील 27% लोक दारिद्र्य रेषेच्या खाली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत सन 2020-21 मध्ये एकूण उत्पन्न कृषी क्षेत्राचा हिस्सा 17.8% इतका आहे.

महाराष्ट्रातील 2001 च्या जनगणनेनुसार 83% बंजारा समाज डोंगरावर व पठारावर वसलेले आहेत. बंजारा समाजातील एकूण

लोकसंख्येपैकी 75% तांड्याचे कामाच्या निमित्ताने स्थलांतर होते.

**बंजारा समाजातील कृषी क्षेत्रातील स्त्री शेतमजुरांचे महत्व :-**

शेती कामात बंजारा समाजातील पुरुषांपेक्षा स्त्रियांचा वाटा मोठ्या प्रमाणात आहे. बंजारा समाज हा सामाजिक, आर्थिक दृष्ट्या मागासलेला आहे. बंजारा समाजात ज्या स्त्रिया घरच्या शेतीवर काम करतात. तेथे त्यांच्या श्रमाचे मूल्य गृहीत धरले जात नाही. स्त्रीने स्वत: कमावलेल्या संपत्तीवर तिचा हक्क नसतो. बंजारा समाजातील स्त्रियांना मजुरी शिवाय पर्याय नाही. म्हणून बंजारा समाजातील स्त्री शेतमजुरांचा अभ्यास करणे महत्वाचा वाटतो. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत इतर उद्योगापेक्षा साखर उद्योग, कापड उद्योग, शेती उद्योग हे महत्त्वाची भूमिका पार पाडतात. या उद्योगांमध्ये स्त्री कामगारांची भूमिका महत्वपूर्ण ठरते. म्हणून स्त्री शेतमजुरांचा अभ्यास करत असताना त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

1. बंजारा समाजातील स्त्री कामगारांना शेतीमध्ये काम करत असताना ऊस तोडणे, मोळ्या बांधणे, ऊस ट्रकपर्यंत डोक्यावर वाहून नेणे, गवत कापणे, कापूस वेचणी, बागायती पिकास पाणी देणे, भाजीपाला लावणे व तो काढून बाजारात विकण्यासाठी आणने इत्यादी कामे करावी लागतात.
2. पुरुष कामगारांपेक्षा स्त्री कामगार शेतीमध्ये जास्त श्रम करताना दिसून येते. बंजारा समाजातील स्त्री कामगार शेतीकामा व्यतिरिक्त इतर कामे पार पाडावी लागतात. त्यात पाणी आणने, स्वयंपाक करणे, कपडे धुणे, लहान मुलांचा सांभाळ करणे इत्यादी.

यावरून लक्षात येते की बंजारा समाजातील स्त्री कामगाराचे शेती क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान आहे.

बंजारा समाजातील कृषी क्षेत्रातील स्त्री शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास या विषयाची संशोधन करीत असताना काही उद्देश महत्त्वाचा वाटतो. बंजारा समाजातील कृषी क्षेत्रातील स्त्री शेतमजुरांच्या राहणीमानाचा अभ्यास, बंजारा समाजातील स्त्री शेतमजुरांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक समस्यांचा अभ्यास, बंजारा समाजातील स्त्री शेतमजुरांच्या समस्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, बंजारा कृषी क्षेत्रातील शेतमजुरांचा वरिल उद्देश ठेवून अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते.

**संशोधन पद्धती** :-

बंजारा समाजातील कृषी क्षेत्रातील स्त्री शेतमजुरांचा आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास या विषयावर संशोधन करत असताना विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. विश्लेषणात्मक संशोधन पद्धती उपलब्ध असणाऱ्या आधार सामुग्रीचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात आले आहे.

वर्णनात्मक संशोधन पद्धतीत बंजारा समाजातील स्त्री शेतमजुरांचे आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक बाबींच्या दृष्टीने असणारे स्वरुप त्यांच्या समस्या याचा अभ्यास करण्यात आला आहे.

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी तथ्य संकलनाकरीता प्राथमिक व तथ्यसंकलन व व्दितीय सामग्री तथ्य संकलनाचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक तथ्यसंकलनात निरीक्षण व अनुसूची या तथ्य संकलन साधनांचा वापर करण्यात आला आहे. व्दितीय तथ्य संकलनात संदर्भ ग्रंथ, शोधनिबंध, केंद्र शासन व राज्य शासन यांचे वार्षिक अहवाल वृत्तमानपत्रे इ. चा आधार घेण्यात आलेला आहे.

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी काही ठराविक नमुन्यांची यादृच्छीक पद्धतीने निवड करून तथ्याचे संकलन व विश्लेषण करण्यात आले आहे.

**बंजारा समाजातील कृषी क्षेत्रातील स्त्री**

**शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थिती:-**

बंजारा समाज हा भटका-विमुक्त असलेला समाज आहे. त्याचा व्यवसाय, आहार-विहार, बोली भाषा, राहणीमान, चालीरीती, विवाह, धार्मिक कार्यक्रम हे वेगवेगळे असलेले दिसुन येतात. या समाजाला विविध नावाने ओळखले जाते उदाहरणार्थ-बंजारा, गोरमाटी, लमान, मथुरा, चारण, ढालिया, जोगी इत्यादी स्वातंत्र्यानंतर मात्र हा बंजारा समाज परिवर्तनाच्या वाटेवर आहे. शिक्षण, दळणवळणाची साधने, विविध माध्यमे, औद्योगीकरण, नागरीकरण यासारख्या घटकांचा परिणाम बंजारा समाजावर झालेला दिसून येतो.

बंजारा समाज ग्रामीण भागात आणि घनदाट जंगलात राहतो. शेती व्यवसाया बरोबरच ते दुय्यम व्यवसाय म्हणून मासेमारी, शिकार करणे व बांधकाम व्यवसाय इत्यादीकडे वळलेले दिसुन येते.

**स्त्री शेतमजुरांच्या आर्थिक स्थिती :-**

बंजारा समाजातील स्त्री शेतमजुर आर्थिक समस्यांनी ग्रासलेले आहे. आर्थिक परिस्थिती नाजूक असल्यामुळे कित्येक आईवडील आपल्या मुलांना उच्च शिक्षण देण्यास समर्थ नसतात. त्यामुळे कमी कुशल कामगार रोजंदारी करून आर्थिक उदरनिर्वाह करावा लागतो. बहुसंख्य बंजारा स्त्री ही निरक्षर आहे. आर्थिक बाबतीत परावलंबी आहेत. कमी वेतनामध्ये त्यांना दिवसभर काम करावे लागते. दिवसा मजुरी करणे, शेतात काम करणे, जंगलातुन लाकडाच्या मोळ्या आणणे त्या मोळ्या विकुन त्यांना त्यांचा आर्थिक उदरनिर्वाह पूर्ण करावा लागतो.

बंजारा समाजातील 60 ते 70% स्त्रिया आपल्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी कर्ज घेतात. बंजारा समाजातील स्त्रियाच्या जमीनीचे प्रमाण खूपच कमी प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे त्यांना रोजंदारी करावी लागते. रोजगाराच्या अपुऱ्या संधी यामुळे बऱ्याच स्त्रियांना आपल्या कुटुंबाना आर्थिक उदरनिर्वाहासाठी

दुसऱ्या गावी स्थलांतर करावे लागते. बहुसंख्य स्त्रिया या कर्जाच्या सापळ्यात अडकलेल्या आहे. विशेषत: बंजारा समाजातील स्त्रियांचे ऊसतोड कामगारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे.

आपला देश 2025 पर्यंत आर्थिक महासत्ता बनेल असे काही तज्ञांचे मत आहे. परंतु आजही बंजारा समाजातील स्त्रियांना पुरूषांना दुसऱ्यांच्या आखाड्यावर दिवाळी साजरी करावी लागते. मजुरीसाठी गावोगावी भटकंती करावी लागते. घराचे कुड आजही निघालेले दिसून येत नाही, तर मग देश आर्थिक महासत्ता बनण्याला काय अर्थ आहे?

**सामाजिक स्थिती :-**

अंधश्रद्धा, हुंडापद्धती, व्यसनाधीनता, शिक्षणाचे अल्प प्रमाण हे बंजारा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे अडथळे आहेत. समाजाला योग्य दिशा देण्यासाठी निस्वार्थी समर्थ नेतृत्वाची आवश्यकता आहे. बंजारा समाजात स्त्रिला प्रमुखत्व प्रदान करण्याची प्रथा अस्तित्वात नाही. कुटुंबात जे निर्णय घेतले जातात त्यात पुरुष निर्णय अंतिम समजाल्या जातो. बंजारा समाजामध्ये कुटुंबात मुलीपेक्षा मुलाला जास्त महत्व प्राप्त झालेले आहे. स्त्रियांना कुटुंबात दुय्यम स्थान आहे. या समाजात स्त्रियांनी या विरोधात जागृत व्हायला पाहिजे. बंजारा समाजाची लोकसंख्या मराठवाडा, खानदेश, विदर्भात अधिक प्रमाणात आहेत. महाराष्ट्रातील 83% तांडे डोंगराळ भागात वसलेली आहे. स्वयंरोजगाराच्या उद्देशासाठी पायाभूत सुविधा, व्यवसायिक प्रशिक्षण देण्याचे काम शासन करीत आहे. बंजारा समाजाची आर्थिक व सामाजिक स्थिती अत्यंत बिकट आहे.

**शैक्षणिक स्थिती** :-

शिक्षण हा तिसरा डोळा आहे तसेच वाघीणीचे दुध मानले जाते. शिक्षणात क्रांतीची बीजे असतात. असे असून सुद्धा बंजारा समाजात शिक्षणाचा प्रसार अपेक्षेप्रमाणे झाला नाही. बंजारा समाजातील ग्रामीण भागातील स्त्रियांना, मुलींना उच्च शिक्षण देण्याकडे फारसा कल दिसत नाही. अनेक क्षेत्रात

शिक्षणाच्या संधी उपलब्ध असताना शुद्ध बंजारा समाजातील मुलींना त्याचा लाभ घेता येत नाही. परंतु आजच्या युगामध्ये मुला-मुलींमध्ये शिक्षणाच्या क्षेत्रात उदासीनता दिसून येते. बंजारा स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण सुद्धा खूपच कमी आहे. बोटावर मोजण्या इतक्या स्त्रिया उच्च शिक्षित आहे. म्हणून मुलींच्या शिक्षणाबाबत समाजात असणारा दृष्टिकोन बदलला पाहिजे.

**सारांश :-**

बंजारा समाजातील कृषी क्षेत्रातील स्त्री शेतमजुरांची आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करताना असे दिसून येते की, स्त्री शेत मजुरांमध्ये भूमिहीन अल्पभूधारकाचे प्रमाण अधिक आहे. त्यांचे वार्षिक उत्पन्न कमी आहे. निवास स्थीती, आहार व आरोग्य यांच्यावरुन त्यांचे राहणीमान निम्न दर्जाचे असल्याचे दिसून येते. कुटुंबात स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. स्त्री शेतमजुरांचे शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. तर उच्च शिक्षणात त्यांच्या मुला-मुलींचे प्रमाण नगण्य स्वरुपाचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ / सुची :-**


1. अहिराव व अलीझाड (प्रथमावृत्ती 1999) लोकसंख्या, निराली प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे 411002.
2. घाटगे ल.ना. आणि वावरे (प्रथमावृत्ती 2010) भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन शिवाजी नगर पुणे
3. झिमरे अलका (प्रथमावृत्ती 2005) कृषी अर्थशास्त्र, सुयश प्रकाशन, पुणे.
4. ऊस तोडणी व वाहतुक कामगार यांचा सर्वेक्षण अहवाल 1986.
5. बोधनकर सुधीर व अलोणी विवेक : सामाजिक संशोधन पध्दती, श्री.साईनाथ प्रकाशन, नागपुर.
6. आगलावे प्रदीप (2000) संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे, पिंपळापुरे पब्लीशर्स, नागपुर.
7. जंगले मंगला (2008) : महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लीकेशन, जळगांव.
8. कवीमंडन कृषी अर्थशास्त्र पुस्तिका
9. जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय, यवतमाळ

कार्यालयातील नोंद (2010-12)
10. कृषि विषयक स्पर्धा परिक्षा मार्गदर्शिका.
11. डॉ. बी.आर.कऱ्हाडे (2009) कृषी संधोधन.

- कृषिविषयक सर्वेक्षण अहवाल
- वर्तमानपत्र
- व्यापार विषयक दै.सकाळ.
- कृषी घटक दै. लोकसत्ता.

** ** **

# भारतीय अर्थव्यवस्था आणि कोविड-१९

**संशोधक विद्यार्थी : डॉ. सचिन भास्कर कुंभार मार्गदर्शक : डॉ. राजेंद्रकुमार रामराव गव्हाळे**
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.

**प्रास्ताविक -**

२०२० हे वर्ष जगासोबतच भारतासाठी अत्यंत त्रासाचे, कष्टदायी आणि विशेष म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल ठरले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची मागील दोन-तीन वर्षापासून आर्थिक स्थितीत घसरण सुरु असल्यामुळे यात कोविडची तीव्रता व व्याप्तीत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. याचा परिणाम म्हणजे देशाच्या सामाजिक आणि आर्थिक स्थिती ही अत्यंत वाईट झालेली दिसून येते. कोविड – १९ हे एक भयानक वास्तव स्थिती आहे. या महामारीने ३० जानेवारी २०१९ ला त्रिकुल(केरळ) मध्ये शिरकाव केला. मार्चच्या सुरुवातीलाच महाराष्ट्रात

कोरोनाचा पहिला रुग्ण सापडला आणि त्याचा फैलाव वाढतच गेला आणि २३ मार्च २०१९ रोजी भारतात लॉकडाऊन घोषित करण्यात आला. आज या महासंकटाने जगातील एक मोठा भाग व्यापला आहे आणि व्यापाराचा मार्ग पूर्णपणे थोपवून धरला आहे. याशिवाय, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लागू केलेल्या लॉकडाऊनमुळे देशांतर्गत क्षेत्रावर अवलंबून असलेले उद्योग ठप्प झालेत. लॉकडाऊनच्या अल्पकालीन आणि मध्यम कालावधीत भारतीय अर्थव्यवस्थेला प्रभावित करणाऱ्या किंवा अडथळा ठरणाऱ्या संभाव्य घटकांचा विचार केला तरी, जगभरातील अर्थक्षेत्रातील अनर्थ स्पष्ट दिसून येतो. लॉकडाऊनचा कालावधी वाढल्याने भारतातील सर्वात मोठ्या सेवा क्षेत्रातील नोकऱ्या कमी झाल्या आणि मागणी घटली तर उत्पादन निर्मिती क्षेत्राला मोठा फटका बसेल. मूलभूत पुरवठा आणि मागणीत कोणतेही बदल झालेले नाहीत. पण, आलेले संकट आणि त्याच्या संभाव्य वाढीच्या शक्यतेमुळे गुंतवणुकीच्या निर्णयातील आत्मविश्वासच नाही. तसेच दैनंदिन कामकाजामधील आत्मविश्वासही कमी झाला आहे. जोपर्यंत स्वीकारार्ह तोडगा किंवा आत्मविश्वास पुन्हा निर्माण करण्यासाठीचे उपाय शोधले जात नाहीत, तोपर्यंत मंदीचा काळ सुरूच राहील.

वर्तमानकाळातील संकट हे खूपच वेगळे आहे. कारण त्यात भीती, चिंता, अनिश्चितता निर्माण झाली आहे. पूर्वीच्या सर्व परिस्थितीच्या उलट, जिथे मागणी किंवा पुरवठा हे मूळ कारण होते आणि आत्मविश्वास हे संकट होते. मालाचे उत्पादन आणि पुरवठा किंवा वितरणाची साखळीच पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. कारण अत्यावश्यक सेवा वगळता, सर्वच कामे ठप्प झाली आहेत जोपर्यंत या विषाणूचा प्रादुर्भाव कमी होत नाही, तोपर्यंत वाट पाहावी लागणार आहे. अशीच परिस्थिती दीर्घकाळ राहिली तर, याचे गंभीर परिणाम होऊन अर्थव्यवस्थेला पुन्हा उभारी घेण्यासाठी अधिक काळ लागू शकतो. आज कोविड – १९ च्या

रुग्णसंख्येत घट होत असली तरी तो अजूनही संपलेला नाही आणि म्हणूनच संशोधकाने कोविड-१९ चा भारतीय अर्थव्यवस्थेत कोण-कोणत्या घटकावर परिणाम झालेला आहे आणि कोणते बदल झालेत याचा अभ्यास या शोध निबंधात केले जाणार आहे.

**उद्दिष्टे :-**

१) कोविड-१९ मुळे भारतात झालेले आर्थिक बदल अभ्यासणे.

**गृहीतक :-**

कोविड-१९ चा भारताच्या सामाजिक,आर्थिक परिस्थितीवर परिणाम झालेला दिसून आलेला आहे .

**संशोधन पध्दती :-**

संशोधक, प्रामुख्याने संशोधनात दुय्यम साधन सामुग्रीचा अभ्यास करून सदर संशोधनाची माहिती मिळविणार आहे.

## कोविड-१९ मुळे भारता वरील परिणाम आणि आर्थिक बदल

भारताच्या पंतप्रधानानी 29 मार्चला केलेल्या 'मन की बात' या कार्यक्रमात सर्व गरीबांची माफी मागितली. आणि या लॉकडाऊनमध्ये सर्वांत जास्त हाल याच वर्गाचे झाले. हा लढा जीवन आणि मृत्यूचा आहे असंही ते म्हणाले. केवळ भारतच नाही तर जगभरातले 190 हून अधिक देश कोरोनामुळे प्रभावित झाले आहेत. भारतात हजारो मजूर स्थलांतर करत आहेत, पण संपूर्ण जगात काय स्थिती आहे. संयुक्त राष्ट्रांशी संलग्न इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायजेशनने (ILO) म्हटलं आहे की, कोरोना व्हायरसच्या साथीमुळे अंदाजे अडीच कोटी रोजगार जातील. अर्थात, ज्याप्रमाणे 2008-09 मध्ये मंदी आल्यानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न करण्यात आले तसे झाले तर आपण या संकटातून बाहेर निघू, असं देखील ILO ने म्हटलं आहे. कोरोना व्हायरसमुळे लॉकडाउन, कामाचे तास कमी होणं तसेच पगारकपात या गोष्टींमुळे बेरोजगारी वाढू शकते. याचा सर्वांत जास्त फटका विकसनशील देशांना बसेल. 2020 मध्ये अडीच कोटी कामगारांचा अंदाजे 860 अब्ज डॉलर ते 3,400 अब्ज डॉलर इतका पगार निघाला असता. पण हे पैसे त्यांच्या खिशात

जाणार नाहीत. त्यांच्यावर अवलंबून असलेला दुकानदार वर्गालाही याचं नुकसान सोसावं लागणार आहे. बरं ज्या कामगार वर्गातील ज्या लोकांजवळ काम किंवा रोजगार असेल त्यांची स्थिती खूप चांगली असणार आहे का? तर त्याचं उत्तर ILO ने दिलं आहे की 90 लाख ते साडे तीन कोटी इतके लोक हे वर्किंग पॉवर्टीमध्ये असतील. म्हणजेच या लोकांकडे काम असेल पण आपल्या गरजा भागवण्याइतकाही पगार त्यांना मिळणार नाही. कोरोनाचं संकट येण्यापूर्वी जगभरात अशा गरिबांची संख्या 1 कोटी 40 लाख इतकी असावी, पण या कोरोनानंतर हीच संख्या दुप्पट होण्याची शक्यता त्यांनी सांगितली आहे. या संकटाचा सर्वाधिक फटका मजूर, कामगार वर्ग, महिला आणि स्थलांतरितांना होणार बसलेला दिसून येतो.

भारताच्या आर्थिक वृध्दीतही परिणाम झालेला दिसून येतो. कारण कोविड-१९ ची लागण नियंत्रित आणण्यासाठी इतर काही उपायानंबरोबरच टाळेबंदीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहिल्याने आर्थिक व्यवहार व उपक्रम बंद केल्याने त्याचा व्यापक परिणाम देशाच्या आर्थिक वृध्दीवर झाल्याचे चित्र आपल्या समोर आहे. आयात ३९% कमी झाली असून भारताचे स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP) जुलै २०१९ मध्ये ५.२%, जानेवारी २०२० मध्ये ४.१% आणि टाळेबंदीनंतरच्या काळात GDP मध्ये सातत्याने घट ही होतच राहिली होता परंतु सप्टेंबरपासून भारतीय अर्थव्यवस्था सावरू लागल्याने चालू आर्थिक वर्षातील विकासाचा दर उणे ७.७ % वरुण घसरला असून तो पुढच्या आर्थिक वर्षात GDP दर ११% असेल असा अंदाज कौशिक बसू व अरविन्द सूब्रह्मण्यम या मुख्य आर्थिक सल्लागारानी आपल्या अहवालात म्हटले आहे.

कोविड-१९ चा शेती व शेती पूरक व्यवसायावर व्यापक प्रतिकूल परिणाम झालेला दिसून येतो. यात पाऊसाच्या महापुरामुळे हंगामी पिकाची मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान

त्या सोबतच लॉकडाऊनमध्ये सर्व कामे बंद असल्या मुळे पीक काढणी , कापणी तसेच बंद असलेली बाजार पेठ , प्रक्रिया कृषि उद्योग बंद मुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले परिणामी शेती क्षेत्रावर अवलंबून असणारे शेत मजुरांची तर फार वाईट अशी अवस्था होऊन कोणतेही उत्पन्न हाती नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली तर शेतकऱ्यांचे ही मोठे आर्थिक नुकसान होऊन त्यांना सवकारांकडे कर्ज बाजारी व्हावे लागले. परंतु डिसेंबर च्या केंद्राच्या आर्थिक सर्व्हे अहवालानुसार, कृषि या एकमेव क्षेत्रात सकारात्मक वृद्धी झाली असून कृषिच्या विकास दर चालू वर्षी ३.४% राहण्याचा अंदाज व्यक्त केलाचे दिसून येते.

**कोव्हिड-१९ मुळे भारतात झालेले आर्थिक बदल**

'वर्क फ्रॉम होम' संकल्पनेचा उदय कोरोनामुळे झालेला आर्थिक जगतातील एक मोठा बदल म्हणजे अनेक कंपन्यांनी सुरु केलेली 'वर्क फ्रॉम होम' ही संकल्पना! कोरोनाच्या काळात जमावबंदी, लॉकडाऊन, मास्क, सोशल डिस्टन्सिंग अशा अनेक नियमांमुळे कंपन्यांना त्यांच्या कामकाजात मोठा बदल करावा लागला. बहुतांश क्षेत्रांमध्ये नोकरी म्हणजे प्रत्यक्ष ऑफिसमध्ये जाऊन काम करायचे, या वर्षानुवर्षे चालत आलेल्या पद्धतीची सवय असल्याने, कोव्हिड-१९ पूर्वी 'वर्क फ्रॉम होम' या संकल्पनेचा फारसा विचारच करण्यात आला नव्हता. वर्क फ्रॉम होमची संकल्पना कंपन्या आणि कर्मचारी या दोघांसाठीही लाभदायक ठरली. कंपन्यांचा खर्चात झालेली कपात आणि कर्मचाऱ्यांचा प्रवासातील वाचलेला वेळ, यामुळे या संकल्पनेला खुल्या मनाने स्वीकारण्यात आले. कर्मचारी घरातूनच काम करत असल्यामुळे त्यांच्या वैयक्तिक खर्चाचे आकडेही कमी झाले, तर दुसरीकडे कंपन्यांना भाडे किंवा इतर सेवांसाठीचा खर्चात कपात करता आला. हीच संकल्पना कायम राहिल्यास छोट्या शहरांमधील तरुणांना

नोकरीसाठी स्थलांतर करण्याची गरज नाही. कारण त्यांची कंपनी दुसऱ्या शहरात असली तरी त्यांना आपल्या घरी राहूनच काम करणे सहज शक्य आहे.

ऑनलाईन व्यवहारांना चालना आणि आरोग्य क्षेत्राचे डिजिटलायझेशन कोरोनाच्या काळात खरेदी करताना ग्राहकांनी होम डिलिव्हरी आणि ऑनलाईन व्यवहार या दोन गोष्टींना प्राधान्य दिलं. या कालावधीत आर्थिक नियोजनासोबत अजून एका गोष्टीचा गांभीर्याने विचार केला गेला, तो म्हणजे फिटनेस! जिम बंद असल्या तरी ऑनलाईन फिटनेस क्लासेस, कन्सल्टन्सी या संकल्पनांनी एक नवीन क्रांती अनुभवली. आरोग्य क्षेत्राने या कालावधीत आसू आणि हसू या दोन्हीचा अनुभव घेतला. फार्म कंपन्यांनी या कालावधीत सॅनिटायझर, मास्क, फिटनेस साहित्य, इ. वस्तूंच्या विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात नफा कमावला. यामुळे आरोग्य व फार्मा क्षेत्रातील शेअर्सच्या किंमतीतही मोठी वाढ दिसून आली. या कालावधीमध्ये नागरिकांनी 'ऑनलाईन' संकल्पनेला पसंती दिल्याने फिटनेस सोबतच इतर आरोग्य सेवा व फार्मा क्षेत्राने कन्सल्टेशन, उपचार, औषध खरेदी आदी गोष्टींसाठी ऑनलाईन सुविधा पुरवायला सुरुवात केली. अर्थात कोरोनाच्या प्रसारापूर्वीही या क्षेत्राने डिजिटल युगात पाऊल ठेवले होतेच, पण कोव्हीड-१९ दरम्यान याचा खऱ्या अर्थाने प्रसार आणि प्रचार झाला.

परदेशी संस्थात्मक गुंतवणुकीचा (FII) प्रवाह वाढला कोव्हिड-१९ चा प्रसार, लॉकडाऊन या परिस्थितीमध्ये सरकारने प्रोत्साहनपर आर्थिक पॅकेज जाहीर केल्यामुळे, तसेच आत्मनिर्भर भारत संकल्पनेमुळे भारतामध्ये परदेशी संस्थात्मक गुंतवणुकीचा ओघ वाढला. भारतात २०२१ या आर्थिक वर्षासाठी २ लाख कोटीं रुपयांची गुंतवणूक झाली. या साऱ्याचा एकत्रित परिणाम म्हणजे स्टॉक मार्केटमध्येही मजबूत 'बूलरन' दिसली आणि गुंतवणुकदारांनी या संधीचा लाभ घेतला. परिणामी बाजारात रिटेल भागीदारांच्या

प्रमाणात लक्षणीय वाढ झाली. कोव्हिड-१९ हे सन २०२० मधले एक भयानक वास्तव आहे. यामुळे संपूर्ण जगाचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. २०२० हे वर्ष आता संपेल आणि ते परतून पुन्हा कधीही येणार नाही.या सरत्या वर्षाबरोबर कोरोनाही कायमचा जाऊदे हीच इच्छा प्रत्येकाच्या मनात असेल. पुढे काय होईल ते सांगता येणं कठीण असलं, तरी झालेले आर्थिक बदल पाहता कोरोनानंतरचं जग वेगळं असेल यात शंकाच नाही

**निष्कर्ष :-**

१) केंद्र व राज्य सरकारांनी सामाजिक क्षेत्र म्हणजे आरोग्य, रोजगार, निवारा, बेकरी, गरीबी यांना विकास धोरणात आणि राज्यवित्तीय धोरणात प्राध्यान्य द्यावे.

२) भारतीय अर्थव्यवस्थेची सामाजिक व आर्थिक विकासाची गाडी रुळावर आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकारानी आर्थिक उत्तेजनपर पॅकेज जाहीर करावे.

३) केंद्र सरकार व भारतीय रिजर्व्ह बॅंकेचे आर्थिक उत्तेजन पॅकेज पुरवठा केंद्रित असल्याने आणि मागणीकडे दुर्लक्ष असल्याने देशाचे अर्थचक्र रुळावर आणण्यास व गतिमान करण्यास उपयुक्त ठरणार नाही.

४) कोविड-१९ सारख्या संसर्जन्य आजार सारख्या आजारासाठी आरोग्य क्षेत्राच स्वतंत्र निधी, देणग्या, मदत, कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सबिलिटीतून खाजगी व सरकारी क्षेत्रातून निधी निर्माण करावा.

**संदर्भ :-**

१. दिव्य मराठी , सकाळ , लोकसत्ता वर्तमानपत्रे जानेवारी २०२१

२. https://www.orfonline.org/marathi/covid-19-and-the-likely-economic-impact-64743/

३. https://www.bbc.com/marathi/india-52097708

४. अर्थसंवाद (मराठी अर्थशास्त्र परिषद नियतकालिन त्रिमसिक २०२०)

५. https://arthasakshar.com/covid-19-5-major-changes-in-indian-economy-marathi-info-arthasakshar/

६. दिव्य मराठी , सकाळ , लोकसत्ता वर्तमानपत्रे मे ,जून, सप्टेंबर , डिसेंबर २०२०

७. https://arthasakshar.com/corona-and-economy-purchasing-power-of-indian-consumer-marathi info-arthasakshar/___

# संघटित क्षेत्रातील श्रमिकांची स्थिती आणि आव्हाने

**संशोधक विद्यार्थी : विशाल प्रकाशराव वातिले**
**मार्गदर्शक : प्रा. डॉ. प्रशांत हरमकर**
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.

## प्रास्ताविक -

श्रमिक जेव्हा मोठ्या संख्येने एकत्र येऊन कारखानदारासाठी काम करू लागतात. त्यावेळी संघटनेची गरज निर्माण होते. मजुरीचे दर, कामाचे तास, कामाची पद्धत वगैरे गोष्टींत प्रत्येकाने वेगवेगळे बोलणे करून ठरविण्याऐवजी सर्वांनी एकत्र मिळून सामुदायिक पद्धतीने ठरविणे इष्ट असे अनुभवाने पटल्यामुळे श्रमिकांनी त्यासाठी स्वतःची संघटना स्थापन केली. त्यांनाच नंतर 'श्रमिक संघटना' हे नामाभिधान प्राप्त झाले. आधुनिक उद्योग प्रथम इंग्लंडमध्ये सुरू झाले म्हणून त्या उद्योगात काम करणाऱ्या श्रमिकांच्या 'संघटना' ही प्रथमतः इंग्लंडमध्ये सुरू झाल्या. नंतर उद्योग जसे जगभर पसरले, तशी श्रमिक संघटनांची चळवळ जगभर पसरली. संघटना म्हणजे सोयी-सवलती देणारी संस्था नसून श्रमिकांच्या अस्मितेचे प्रतिक आहे. भावना व्यक्त करणे, स्वतःचा असा काही आग्रह धरणे एक महत्त्वाची गरज असते. पितृछत्रवादी स्वरूपाने श्रमिकांच्या अनेक गरजांचा विचार करते. श्रमाला वस्तू न समजता कायदेशीर उद्दिष्टे साध्य करून देण्यासाठी संघटना निर्माण करण्याचे श्रमिकांना व संयोजकांना अधिकार आहेत, हे

श्रमिक संघटनेचे ठाम मत आहे. सामुदायिक वाटाघाटीच्या मार्गाने श्रमिकांना त्यांच्या मागण्या मिळवून देणे हे संघटनेचे मुख्य कार्य आणि उद्दिष्टे आहे. सुरुवातीच्या काळात मागण्याचे क्षेत्र मर्यादित होते; परंतु आता ते खूपच विस्तृत झाले आहेत. श्रमिकांचा दृष्टिकोन विकसित होत चालला आहे. त्यांच्या समाजाच्या जीवनाशी संबंध अशा अनेक मागण्या आपल्या संघटनेमार्फत ते आता करू लागले आहेत. काही मागण्या औद्योगिक स्वरूपाचे असतात. या सर्व मागण्यांना वाचा फोडणे व त्यांच्या प्राप्तीसाठी झटत राहणे. हे श्रमिक संघटनेच्या कार्यक्षेत्रात मोडते.

जगातील इतर देशाप्रमाणे भारतात देखील श्रमिक संघटनाचा विकास देशाच्या औद्योगिक प्रगती नंतर झाला. भारतामध्ये सन १८९० मध्ये श्री. एन. एम. लोखंडे यांनी मुंबईच्या कापड गिरणीतील श्रमिकांची एक संघटना स्थापन केली. ही संघटना 'बॉम्बे मिल असोसिएशन' या नावाने ओळखली जाऊ लागले. सुरुवातीला या संघटनेला मान्यता नसल्याने या संघटनेतील कार्यकर्त्यांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागले. प्रसंगी स्वतःच्या नोकरीला मुकावे लागले. परंतु सन 1996 मध्ये 'भारतीय श्रमिक संघ अधिनियम' पारित करण्यात आला. या कायद्यामुळे श्रमिक संघटनेला कायदेशीर मान्यता मिळाली. तेव्हापासून संघटनेची नोंदणी करणे अनिवार्य झाले. सद्यस्थितीत भारतामध्ये प्रत्येक संघटित क्षेत्रांमध्ये श्रमिकांच्या संघटना कार्यरत आहेत. 2017-18 च्या रोजगार सर्वेक्षण नुसार 18.10 कोटी श्रमिक असंघटित क्षेत्रात कार्यरत असून 7.67 कोटी श्रमिक संघटित आहेत. आणि त्या संघटना श्रमिकांच्या समस्या सोडवण्यात प्रयत्नरत आहेत. संघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या समस्या, श्रमिकांची स्थिती, श्रमिकांसमोरील आव्हाने, श्रमिक संघटनेची स्थापना, संघटनेची आवश्यकता इ. बाबी समजून घेणे हा या विषयाचा मुख्य उद्देश आहेत.

**संघटनेची व्याख्या -**

डॉ. आल्फ्रेड मार्शल श्रमाची व्याख्या पुढीलप्रमाणे करतात,

"आनंदाशिवाय इतर काही आर्थिक मोबदला मिळविण्यासाठी करण्यात आलेले मनुष्याचे शारीरिक किंवा मानसिक पर्यंत किंवा क्रिया म्हणजे श्रम होय."

कार्ल मार्क्सने एक बुलंद नारा दिला की,

"जागतिक श्रमिकांनो एकत्र व्हा, जर तुमच्यात एकदा राहिली तर तुम्हाला कोणती हानी होणार नाही."

भारतीय श्रमिक संघ विधान सन १९२६ नुसार श्रमिक संघाचे व्याख्या पुढीलप्रमाणे, "ज्याची निर्मिती ऐच्छीक रुपात सामूहिक शक्तीचा आधार श्रमिकांच्या कल्याणाची सुरक्षा करण्यासाठी केली जाते, ती 'श्रमिक संघटना' होय."

**संघटनेचा इतिहास -**

श्रमिकांना आपल्या नोकरीविषयक हितसंबंधाच्या रक्षणासाठी व संवर्धनासाठी स्थापन केलेला स्थायी स्वरुपाचा संघ म्हणजेच 'संघटना' होय. अशा संघटना जगातील सर्व देशात श्रमिकांनी स्थापन केलेल्या आहे.

कारखानदारीच्या सुरुवातीच्या काळात श्रमिकांना संघटना बनविण्याचा अधिकार नव्हता. श्रमिकांच्या संघटना बेकायदेशीर समजल्या जात होत्या. इंग्लंडमध्ये सन 1824 पर्यंत 'कॉबिनेशन ॲक्ट' नावाने संघटनाविरोधी कायदे होते. संघटना बनविणाऱ्या श्रमिकांना या कायद्यानुसार गुन्हेगार ठरवून शिक्षा दिल्या जात असत. त्यामुळे त्या काळात ज्या संघटना बनवल्या त्या गुप्त मंडळाच्या स्वरूपाच्या होत्या.

कॉबिनेशन कायदे 1824 साली रद्द झाले आणि उघडपणे आपली संघटना बनवण्याचा मार्ग श्रमिकांना मोकळा झाला. तरीदेखील संघटनांच्या मार्गावरील साऱ्या कायदेशीर अडचणी दूर झाल्या नाहीत.

श्रमिकांनी संघटना बनवणे म्हणजे कारखानदारांच्या मन मानेल त्या पद्धतीने आपला धंदा चालविण्याच्या स्वातंत्र्यावर अतिक्रमण करण्यासारखे आहे. असे समजले जात असे. संघटनेच्या स्थापनेच्या परिणामी

करार भंगाला उत्तेजन लाभते, असा दुसरा एक आक्षेप होता. या सर्व अडचणींचा श्रमिक संघटनांना अनेक वर्ष त्रास भोगावा लागला. लोकशाहीचा जसा प्रसार होत गेला, तसे श्रमिक संघटनांचे सामर्थ्य वाढले. त्याचवेळी श्रमिक संघटनांसोबत कायदे होऊन संघटनेस कायद्याचे संरक्षण लाभले.

कायदेशीर अडचणीच्या बरोबरीने कारखानदारांचा विरोध हे देखील मोठी अडचण होती. या विरोधामुळे संघटना बनवण्याच्या कामात पुढाकार घेणाऱ्या अनेक श्रमिकांना हाल-अपेष्टा काढाव्या लागल्या व काही काळ नोकरीला मुकावे लागेल. काही काळानंतर कारखानदारांचा संघटनेविषयीचा दृष्टिकोन बदलला. पण हे घडून येण्यासाठी ५० वर्ष उलटावी लागली आणि एकंदर सामाजिक परिस्थितीत मूलभूत स्वरूपाचे बदल घडून आले.

आधुनिक उद्योग प्रथम इंग्लंडमध्ये सुरु होऊन तेथेच उद्योगांचा विस्तारही झाला. देशातील वेगवेगळ्या उद्योगातील सर्व श्रमिकांना एकत्रित, संघटित करण्याचे पहिले प्रयत्न हे इंग्लंडमध्ये झाले. परंतु ही देशव्यापी स्वरूपाची, सर्व श्रमिकांची संघटना अयशस्वी ठरली. तेव्हा वेगवेगळ्या संघटना बनवण्याचे प्रयत्न सुरू झाले. हे प्रयत्न अधिक यशस्वी व चिरस्थायी ठरले.

या प्रयत्नात पुढाकार घेतला तो कुशल श्रमिकांनी. सुरुवातीला त्यांनीच आपल्या संघटना बनवल्या आणि थोड्याच काळात त्या मजबूत बनल्या. कुशल श्रमिकांची संख्या मर्यादित होती. आणि त्यांच्याविना कारखान्याचे काम अडत असे. त्यांचे सहकार्य मिळावे म्हणून कारखानदारांनी त्यांच्या संघटनांना मान्यता दिली. त्यानंतर कारखानदार आणि कुशल श्रमिकांच्या संघटना यांच्यामध्ये मजुरी भत्ते, कामाचे तास, नोकरीचे नियम याबद्दल सामुदायिक स्वरुपाचे करार होऊ लागले. त्या दिवसात उद्योगांची भरभराट होती. त्यामुळे संघटनांमार्फत केलेल्या बऱ्याच मागण्या श्रमिकांना मिळत गेल्या. मागण्या मान्य झाल्यामुळे संघटनाची सभासद संख्या वाढली आणि श्रमिकांशी

सामुदायिक वाटाघाटी करण्याच्या बाबतीत अधिक समर्थ बनत गेल्या. कुशल श्रमिकांनंतर अकुशल व सर्वसाधारण श्रमिकही संघटना, चळवळीमध्ये ओढले गेले आणि उद्योगनिहाय अशा वेगवेगळ्या श्रमिक संघटना बनत गेल्या.

**श्रमिक संघटनेचा उदय -**

- बॉम्बे मिल असोसिएशन (1 फेब्रुवारी 1875),
- नारायण मेघाजी लोखंडे यांनी भारतातील पहिली श्रमिक संघटना स्थापन केली.
- मद्रास लेबर युनियन -
- इ. स. 1918 मध्ये अँनी बेझंट यांचे सहकारी बी. पी. वाडिया यांनी स्थापन केली.
- अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेस (आयटक),
- इ. स. 1920 साली स्थापना झाली लाला लजपतराय संघटनेचे अध्यक्ष होते.
- इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस (इटक),
- साम्यवादाचे वर्चस्व कमी करण्यासाठी स्थापन करण्यात आली.
- हिंदू मजदूर संघ -
- समाजवादी विचारसरणी निर्माण झाली.

**संघटित क्षेत्राची भूमिका -**

कुठल्याही क्षेत्रातील श्रमिकांना आपल्या हक्काबद्दल दाद मागण्यासाठी संघटित असणे गरजेचे असते. आजपर्यंत श्रमिकांना योग्य नेतृत्व न लाभल्याने त्यांना अधिकार प्राप्त होऊ शकले नव्हते. मात्र श्रमिकांनी संघटित झाल्याने कामगार विषयक कायदे अस्तित्वात येऊन श्रमिकांना अधिकार मिळाले. श्रमिकांना योग्य प्रशिक्षण देण्यासाठी संघटित क्षेत्राची गरज आहे. संघटित क्षेत्रामुळे वेगवेगळ्या व्यावसायिक क्षेत्रातील श्रमिक संघटित झाल्यास त्यांच्यात एकता निर्माण होऊन पक्ष, जात, पंथ, प्रदेश इत्यादी भेद नाहीशे होऊन सर्वांमध्ये एकता निर्माण होते. जे श्रमिक हिताचे सिद्ध होतात. संघटन क्षेत्रांमध्ये खंबीर व सुयोग्य नेतृत्व निर्माण होते. श्रमिकांची आर्थिक, सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी संघटित क्षेत्राची गरज आहे. व्यवस्थापनाचे कार्य सुलभपणे होण्यास संघटित क्षेत्राची गरज

आहे. व्यवसायाच्या आकारात वाढ झाल्यास, आर्थिक गुंतागुंत निर्माण झाल्यास व्यवस्थापन कार्यात अनेक अडचणी येतात. या दृष्टीने ही संघटित क्षेत्राची गरज प्रकर्षाने जाणवते. श्रमिकांचे संरक्षण सर्वांगीण दृष्टीने व्हावे यासाठी संघटित क्षेत्राचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. बदलत्या काळानुसार श्रमिकांच्या प्रश्नाचे स्वरूपही बदललेले दिसून येते. जसे वेतन, सेवेत कायम करणे, बोनस, विमा योजना, अपघात, नुकसान भरपाई आदी हक्कासंबंधी जे प्रश्न येतात. यासाठी श्रमिक संघटनांनी किमान हक्काचे तरतुदी करणारे कायदे संबंधित अधिकाऱ्यांकडे धाव घेऊन ते कायदे अंमलात आणण्यासाठी संघटित असणे गरजेचे आहे. श्रमिकांच्या विविध मागण्यांसाठी आर्थिक, वस्तू व सेवा विषयक, माहिती विषयक आणि पद्धती विषयक मागणी असतात. यावर संघटनांनी उभयपक्षी तोडगा काढून प्रश्न निकाली काढणे अथवा तोडगा न निघाल्यास तो सोडविण्यास यंत्रणेचा फायदेशीर उपयोग करून घेणे श्रमिकांना या काळात आर्थिक सहाय्य करण्याबरोबरच कौटुंबिक प्रश्न सोडवण्याचे कार्य सुद्धा श्रमिक संघटना करीत असतात.

तक्रार निवारण हे श्रमिक संघटनेचे नित्यक्रम आहेत. रजा, बढती, बदली कामातील अडचणी, कामाची परिस्थिती वागणूक अशा अनेक तक्रारी निवडण्याच्या दृष्टीने संघटित क्षेत्र महत्त्वाचे आहेत. श्रमिक लढ्यातून उद्भवणारी गैरवर्तन, संप, टाळेबंदी, कायदेशीरपणा या काळातील पगार, लढ्यातून उद्भवणारे फौजदारी खटले याबाबतीत संघटना योग्य मार्ग धोरणे आखतात. एकंदरीत श्रमिकांच्या हितार्थ संघटना अतिशय महत्त्वाच्या दिसून येतात.

श्रमिकांना सामाजिक, आर्थिक शोषणापासून संरक्षण देणे तसेच त्यांना सामाजिक न्याय मिळवून देणे. श्रमिकात परस्पर बंधुत्वाच्या व सहकार्याच्या भावनेचा विकास करणे. श्रमिकांना संघटित करणे. श्रमिकांच्या काम व मजुरी संबंधित विविध प्रकारच्या गैरसोयी विचारात घेऊन त्या

गैरसोयी कायदेशीरपणे दूर करणे. श्रमिकांसाठी भविष्य निधी, सरकारी कर्ज, वैद्यकीय सोयीची व्यवस्था करणे. श्रमिकांना शिक्षण देण्याची व्यवस्था करणे. त्यांना त्यांच्या कर्तव्य, हक्क, अधिकाराची जाणीव निर्माण करणे. आजार, अपघात, बेकारी इ. काळात श्रमिकांना आर्थिक मदत देण्याची व्यवस्था करणे. श्रमिक संघटनेमार्फत तज्ञांचे सहकार्य घेऊन श्रमिकांची राहणीमान आणि त्यांच्या कामाचा दर्जा वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात.

**संघटित क्षेत्राची सद्यस्थिती -**

संघटित क्षेत्रातील श्रमिकांची सद्यस्थिती पाहता त्यांच्या समस्या, अडचणींचे निवारण करण्यासाठी सामुदायिक वाटाघाटींमध्ये अर्ज, विनंत्या, शिष्टमंडळे आदींचा समावेश होतो. मालकाबरोबरच्या श्रमिक प्रतिनिधींचा वाटाघाटी यशस्वी झाल्या नाहीत. तर संघटना श्रमिकांना संपाचा आदेश देऊ शकतात. वाटाघाटी करण्याचा अधिकार लाभल्यामुळे त्या संपल्याखेरीज व आगाऊ कळविल्या खेरीज संघटना संपाचा आदेश देणार नाहीत, एवढेच पुष्कळवेळा संघटना लवादाची पद्धती मान्य करतात. पण असा एखादा मार्ग उपलब्ध झाल्याखेरीज आपला संपाचा अधिकार सोडायला संघटना तयार होत नाही.

श्रमिकांच्या मागण्या मिळवण्यासाठी संघटना पुष्कळवेळा कायद्याच्या मार्गाचाही अवलंब करतात. काही मागण्या अशा असतात की, त्यांच्या पूर्तीसाठी कायदे होणेच योग्य असते. कामाचे तास, कारखान्यातील सुरक्षितता व इतर सुखसोयी, स्त्रिया व मुले यांच्या नोकरीवरील निर्बंध किमान मजुरी इ. बद्दल अनेक देशांनी कायदे मंजूर केले. त्यांच्या योगाने श्रमिकांच्याही काही मागण्या त्यांच्या पदरात पडल्या आहेत. हे कायदे मंजूर करून घेण्यासाठी व त्यांच्यामध्ये वेगवेगळी सुधारणा घडवून आणण्यासाठी संघटनांना सतत प्रयत्न करावे लागतात. संघटनांनी तसे प्रयत्न करणे, हे त्यांच्या नेहमीच्या कार्यक्षेत्रात मोडते हे

आता सर्वांनी मान्य केले आहेत. कायदे करून घ्यावयाचे अगर सुधारणा घडवून आणावयाचे, तसेच देशाचे आर्थिक व सामाजिक धोरण श्रमिक हितवर्धक राहील अशी दक्षता घ्यावयाची; म्हणजे श्रमिक संघटनांना राजकारणाकडेही लक्ष पुरवावे लागतात. ब्रिटिश श्रमिक संघटनांनी तर श्रमिकांचा वेगळा पक्ष स्थापन केला. 'लेबर पार्टी' या नावाने पक्ष वाढला आणि कित्येक वेळा अधिकार रुढही झाला. श्रमिक संघटनेचे सभासद हेच पक्षाचे बहूसंख्य सभासद असून पक्षाला लागणारा पैसा मुख्यत्वेकरून श्रमिक संघटनेकडून पुरविला जातो.

इतर देशांमध्ये श्रमिक संघटनांच्या औद्योगिक व राजकीय कार्यामध्ये अशी स्पष्ट विभागणी झाली नाही. फ्रान्स, इटली आदीकरून युरोप खंडातील देशांमध्ये श्रमिक संघटनांवर राजकारणाचा गडद रंग चढला आहे. अविकसित व नव्याने स्वतंत्र झालेल्या देशातील श्रमिक संघटनांच्या बाबतीत तो प्रकार अधिकच मोठ्या प्रमाणात घडल्या आहे. त्या देशातील आर्थिक व सामाजिक परिस्थितीमध्ये या घटनेचे मूळ सापडते. तिच्यामुळे श्रमिक संघटनावरही काही दुष्परिणाम घडले आहेत. राजकारणाकडे जास्त लक्ष पुरवल्यामुळे श्रमिकांच्या औद्योगिक अडचणीकडे दुर्लक्ष होत..

**संघटित क्षेत्रातील आव्हाने -**

- श्रमिकांचे सामाजिक आणि आर्थिक शोषण होत असल्याने त्यांना संरक्षण व सामाजिक न्याय मिळवून देणे हे संघटित क्षेत्रातील एक मोठे आव्हान आहे.
- श्रमिकामध्ये परस्पर संबंधी सहकार्याची भावना निर्माण करणे.
- सर्व श्रमिकांना संघटित करून त्यांच्यामध्ये एकता निर्माण करणे.
- श्रमिकांच्या काम व मजुरी संबंधात विविध प्रकारच्या गैरसोयी विचारात घेऊन त्यावर तोडगा काढणे.
- श्रमिकांसाठी भविष्य निधी, सरकारी कर्ज, वैद्यकीय सोयीची व्यवस्थेचा करणे.
- श्रमिकांना शिक्षण देण्याची व्यवस्था करणे. त्यांना

त्यांच्या कर्तव्य, अधिकाराची जाणीव निर्माण करणे.

- आजार, अपघात, बेकारी इ. काळात श्रमिकांना आर्थिक मदत देण्याची व्यवस्था करणे.
- श्रमिक संघटनेमार्फत तज्ज्ञांचे सहकार्य घेऊन श्रमिकांची राहणीमान आणि त्यांच्या कामाचा दर्जा वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे.

**संघटित क्षेत्रातील आव्हानांची उपाय योजना -**

श्रमिक संघटनेमध्ये कोणत्याही राजकीय पक्षाचा शिरकाव होऊ देणे, शिरकाव झाल्यास संघटनेमध्ये दुर्बल निर्माण होण्याची शक्यता अधिक प्रमाणात असते. 'हम सब एक है' या घोषणेनुसार व्यवस्थापन मंडळात सहभागी करून घेतले पाहिजे. संघटनेमध्ये फूट पडू नये यासाठी नवीन विचारांचा समावेश करण्यात आला. प्रत्येक संघटित श्रमिकाला त्याच्या योग्यतेनुसार व कार्यानुसार योग्य तो मोबदला मिळाला पाहिजे यावर संघटनेने लक्ष दिले पाहिजे.

समारोप -

श्रमिक संघटनेस योग्य दिशेने वाटचाल करण्यात यावी याकरिता श्रमिक संघटनेचे प्रतिनिधी आणि व्यवस्थापनाचे प्रतिनिधी एकत्र येऊन उत्पादन क्षमता समिती स्थापन करावी. कंपनीचे उत्पादन क्षमता वाढवण्यात यावी प्रशिक्षण सुविधा आणि श्रमिकांचे कौशल्य वाढवणारे कार्यक्रम कर्मचारी व कंपन्या दोन्ही घटकासाठी उपयुक्त ठरतात.

श्रमिक संघटनेच्या बाबतीत संप व काम बंद यासारख्या गोष्टी चिंतेच्या मानल्या जातात. कर्मचाऱ्यांच्या समस्यांचे निराकरण, विश्वासाचे वातावरण निर्माण करावे.

**संदर्भ ग्रंथ -**

1. Bhagoliwal T. N. (Dr.) - ‘Economics of Labour and Industrial Relations’: Sahitya Bhavan Area. 1986.
2. उत्तम कांबळे (संपा.) – ‘श्रमिकांचे जग : काल, आज आणि उद्या’:

लोकवाङ्यगृह, मुंबई, प्रथमावृत्ती, २०१२.
3. कर्णिक वसंत भगवंत - ‘कामगार संघ आणि औद्योगिक संबंध’: कॉन्टिनन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९७३.
4. जहागीरदार, प्रा. मुक्ता. - 'अर्थवेध', प्रकाशन कौटिल्य ज्ञान प्रबोधिनी संचालित, सेंटर फोर इकॉनोमिक अंड सोशल स्टडीज, अमरावती. नोव्हेंबर २०११.
5. जहागीरदार, प्रा. दि. व्यं. - 'महाराष्ट्र: ५० वर्षातील विकासाचा धांडोळा', कौटिल्य ज्ञान प्रबोधिनी संचालित, सेंटर फोर इकॉनोमिक अंड सोशल स्टडीज, अमरावती. मार्च २०१२.
6. जैन, प्रा. डॉ. एस. सी. - 'औद्योगिक अर्थशास्त्र', प्रकाशन कैलास पुस्तक सदन, भोपाल.
7. जंगले, डॉ. मंगला - 'औद्योगिक अर्थशास्त्र', प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
8. बोधनकर, प्रा. डॉ. सुधीर. चव्हाण, प्रा. डॉ. साहेबराव. - 'श्रम अर्थशास्त्र', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर. दुसरी आवृत्ती जून २०१२.
9. देशमुख, डॉ. प्रभाकर - ‘श्रमाचे अर्थशात्र’: विद्या प्रकाशन, नागपूर, तृतीयावृत्ती १९८७.
10. देशपांडे, प्रा. डॉ. जोत्स्ना, - 'श्रमाचे अर्थशास्त्र', पिंपळापुरे अँड कंपनी लिमिटेड पब्लिशर्स, नागपूर. जुलै २०१९.
11. रसाळ, प्रा. डॉ. राजेंद्र अ. - 'श्रम अर्थशास्त्र', सक्सेस पब्लिकेशन, पुणे. २०१०.
12. सक्सेना, प्रा. डॉ. आर. सी. - 'श्रम समस्यायें एवं समाज कल्याण', जय प्रकाश नाथ अँड कंपनी, मेरठ, जानेवारी १९५२.
13. सुर्वे नारायण (संपा.) - ‘कामगार साहित्य : दहा भाषणे’: कल्याण आयुक्त (प्रकाशक), महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती २००१.

14. श्रीवास्तव, प्रा. डॉ. चंद्रदेव; वाजपेयी, प्रा. डॉ. शिवरतन; अष्ठाना, प्रा. डॉ. पद्माकर, - 'औद्योगिक संघटन एवं प्रबंध', किशोर पब्लिशिंग हाऊस, परेड, कानपूर १९६१.

Shri Shivaji Education Society, Amravati's

# SHRI SHIVAJI ARTS AND COMMERCE COLLEGE, AMRAVATI

**Established in 1946**

## Platinum Jubilee Year

**Recognition under UGC - 2F & 12 B**



**Re-accredited with 'A' Grade by NAAC**
**Third Cycle (CGPA 3.08)**



ISSN 2455-9504

# RESEARCH AWAKENING

**National Multi - Disciplinary Peer Reviewed and Refereed Journal**

Published by : The Principal, Shri Shivaji Arts & Commerce College, Amravati